# घटक - १

# सामाजिक समस्या

## ( Social Problems)


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ सामाजिक समस्याचे स्वरूप

१.२.२.सामाजिक समस्यांचे वर्गीकरण

१.२.३ सामाजिक समस्येच्या अध्यायनाची गरज

१.३ सारांश

१.४ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

१.५ सरावासाठीचे प्रश्न

१.६ अधिक वाचनासाठी पुस्तके


**१.० उद्दिष्ट्ये :**

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास-

१. सामाजिक समस्येचे स्वरूप समजून घेता येईल .

२. सामाजिक समस्येचे वर्गीकरण करता येईल.

३. सामाजिक समस्येच्या अध्ययनाची गरज समजावून घेता येईल.

**१.१ प्रास्ताविक :**

सामाजिक समस्या हा समाजशास्त्रातील अतिशय महत्त्वाचा असा विषय मानला जातो. सामाजिक समस्येचा व्यक्तीवर परिणाम होतो. तसेच त्याचा परिणाम संपूर्ण अथवा समग्र समाजावर होऊन समाजातील प्रत्येक व्यक्ती ही समस्याग्रस्त बनते. सामाजिक समस्यांचे स्वरूप हे व्यापक आहे. जगामध्ये असा कोणताही देश सामाजिक समस्या पासून अलग नाही किंवा त्या समस्येतून सुटलेला नाही. या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहणे गरजेचे असते. सामाजिक समस्या मानवनिर्मित असल्यामुळे त्याचे परिणाम मानवी समाजाला

भोगावेच लागतात. यातून सामाजिक विस्कळीतपणा निर्माण होऊन सामाजिक स्वास्थ्य बिघडते. प्राचीन काळात ज्याप्रमाणे सामाजिक समस्या होत्या त्याप्रमाणे आधुनिक समाजातही विविध सामाजिक समस्या आहेत. काळानुरूप प्राचीन काळातील समस्या आज असतीलच असे नाही परंतु बदलत्या काळात सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय या परिस्थिती नुसार सामाजिक समस्यांचे स्वरूप बदलले आहे. १९ व्या शतकात सती प्रथा, बालविवाह, अस्पृश्यता, केशवपन, विधवा विवाह इत्यादी सामाजिक समस्या होत्या. मात्र अलीकडे या सामाजिक समस्या कमी प्रमाणात आढळून येतात. सामाजिक बदलानुसार कुटुंब विघटन, बालगुन्हेगारी, लोकसंख्येची समस्या, बेकारी, घटस्फोट, काळाबाजार, भ्रष्टाचार, शेतकरी आत्महत्या, नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या इत्यादी अनेक नवीन समस्या निर्माण झाल्या. यावरुन हे सांगता येते की, प्रत्येक कालखंडात सामाजिक समस्या पहावयास मिळतात. समाजशास्त्रात अशा सामाजिक समस्यांचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययन केले जाते.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ सामाजिक समस्याचे स्वरूप

भारतातील सामाजिक समस्यांचा विचार करणे हे आधुनिक काळात फारच गरजेचे आहे. कारण भारतातील सामाजिक प्रश्न दिवसागणिक अधिक गंभीर होत जात आहेत. सामाजिक समस्या मानवनिर्मित असतात. भारतातील बहुतांशी सामाजिक समस्या गुंतागुंतीच्या समाजरचनेमुळेच निर्माण झालेल्या दिसून येतात. सामाजिक समस्या मानवी समाजाइतक्या प्राचीन आहेत. मानवी जीवनाच्या प्रत्येक कालखंडामध्ये सामाजिक समस्यांचे स्वरूप हे निरनिराळे आहे. उदा. गरीबी, बेकारी हे प्रश्न समाजातील बहुसंख्य लोकांना भेडसावत असल्यामुळे या प्रश्नांना सामाजिक समस्या म्हणून ओळखले जाते. दिवसेदिवस माणसाच्या गरजा वाढत आहेत. मानवी समाजाच्या गरजा एखाद्या समाजातील संस्था आणि संस्कृती या प्रसंगी समायोजन करण्यात अयशस्वी ठरतात तेव्हा त्या अशा समाजात विविध स्वरूपाच्या सामाजिक समस्या निर्माण होतात. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेच्या माध्यमातून समाज व्यवस्थेमध्ये सामाजिक विघटन घडून येते. या विघटनाच्या प्रक्रियेमुळे किंवा प्रभावामुळे सामाजिक समस्या निर्माण होतात. सामाजिक समस्येकडे लोकांना आकर्षित करण्यामध्ये जनसंचार माध्यमे, टेलिव्हिजन, वृत्तपत्रे, रेडिओ यांची भूमिका ही महत्वपूर्ण आहे.

**सामाजिक समस्यांचा अर्थ : (Meaning of Social Problems)**

सामाजिक समस्यांचा अभ्यास करत असताना सर्वप्रथम सामाजिक समस्या म्हणजे काय याविषयी जाणून घेणे महत्त्वाचे आहे. कोणतीही समस्या ही सामाजिक समस्या असेलच असे नाही. परंतु समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून सदर समस्यांचे निराकारण करणे गरजेचे असते. व्यक्ती, समूह दैनंदिन जीवनात समस्या हा शब्द नेहमी वापरत असतात. परंतु कोणतीही समस्या ही सामाजिक समस्या होऊ शकत नाही. म्हणून सामाजिक समस्येचे आकलन करत असताना त्या समस्यांचा अभ्यास करणे गरजेचे बनते. सामाजिक समस्या समजून घेत असताना विविध समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक समस्यांच्या व्याख्या स्पष्ट केल्या आहेत. त्या व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर सामाजिक समस्यांचा अर्थ स्पष्ट होतो.

### १) मर्टन आणि निसबेट : (Murton and Nisbet)

सामाजिक समस्या म्हणजे, ''एखाद्या समाजातील लक्षणीय संख्येच्या व्यक्तीच्या सामाजिक वर्तनातील बिघाड किंवा पथभ्रष्टता, जी त्या समाजातील इतर अनेक सदस्यांना गंभीर परिणाम भोगावयास लावते. मूलत: सामाजिक समस्या या नैतिक समस्या होत.''

(Breakdowns or deviations in social behaviour involving a considerable number of people, which are serious concern to many members of the society in which the abbreviations occur. At bottom social problems are problems of moral value - **(Murton and Nisbet)**.

### २) फुल्लर आणि मेयर्स : (Fuller and Myers)

एखाद्या समाजातील बहुसंख्य सदस्य जेव्हां व्यवहाराच्या पद्धतीला किंवा परिस्थितीला आपत्ती कारक अथवा अयोग्य मानतात, तेव्हा त्या सामाजिक समस्या होत. तसेच त्या समस्येचे निराकरण करण्यासाठी आणि त्याची व्याप्ती कमी करण्यासाठी सुधारात्मक धोरणे, योजना व प्रत्यक्ष सेवा कार्याची आवश्यकता आहे अशी त्या सदस्यांची मान्यता असते. (Social problems are behaviour patterns or conditions that are considered objectionable or underdesirable by many members of a society. Dear members recognise that the corrective policies, programs and services are necessary to cope with and reduce the scope of this problem. (R.C.Fuller and Myers).

### ३) हॉर्टन आणि लेस्ली – (Horton and Leslie)

समाजातील लक्षात घेण्यायोग्य बहुसंख्य व्यक्तीवर परिणाम करणारी अवांछनीय अशी परिस्थिती की, ज्या संदर्भात सामूहिक सामाजिक क्रियेद्वारे काहीतरी उपाययोजना करण्याची आवश्यकता वाटू लागते अशा परिस्थितीला सामाजिक समस्या म्हणतात. (A social problem is a s affecting a significant number of people in waves considered undesirable, about which please felt something can be done through collective social action(Hurton and Leslie).

### ४) विल्यम स्कॉट : William Scoot

अशी कोणतीही अनिष्ठ परिस्थिती, की जी समुदायातील बहुसंख्य लोकांना अयोग्य वाटते आणि तिच्या पुनर्रचनेसाठी सामूहिक कृतीची आवश्यकता असते.

### ५) तपन मोहंती :

समाजातील एखाद्या भागात एकोपा टिकून ठेवण्याच्या बाबतीत समाजव्यवस्थेला आलेल्या अपयशामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीस सामाजिक समस्या समजतात.

### ७) वॉलेस विव्हर :

उद्दिष्टपूर्तीच्या मार्गात होणारे अडथळे, संघर्ष, तणाव अथवा नैराश्य निर्माण करणारी कोणतीही परिस्थिती म्हणजे सामाजिक समस्या होय.

## सामाजिक समस्याचे स्वरूप : (Nature of social problems)

### १) बहुसंख्य लोकांची स्वीकृती :

एखाद्या व्यक्तीचे वर्तन अयोग्य आहे असे दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला वाटल्याने ते वर्तन अयोग्य आहे किंवा सामाजिक समस्या आहे हे समजणे बरोबर नाही. जर ते वर्तन अयोग्य आहे असे समाजातील बहुसंख्य लोकांनी स्विकारले तर त्या वर्तनास सामाजिक समस्या म्हणता येईल. कोणतीही परिस्थिती जोपर्यंत समाजातील बहुसंख्य लोकांना घातक वाटत नाही तोपर्यंत तिला सामाजिक समस्या मानले जात नाही. भारतीय समाजामध्ये अशाच प्रकारच्या अनेक समस्या आजही अस्तित्वात आहेत. त्यामध्ये निरक्षरता, अंधश्रद्धा, जातीयता, अस्पृश्यता इ. या समस्या समाजातील बहुसंख्य लोक समूहाला सामाजिक समस्या आहेत याची जाणीवच नाही. भारतीय समाजात अशा विविध प्रश्नाविषयी तज्ञ व्यक्ती अथवा प्रभावशाली व्यक्ती विवेचन करतात, या प्रथेवर टीका करतात. त्यासाठी बैठका, सभा, दूरचित्रवाणी, समाजमाध्यमे, वृत्तपत्रे या माध्यमातून आपले मत प्रसारित करतात यातून त्या समस्यांची दाहकता आणि अनिष्टता उघड होते आणि बहुसंख्य लोकांकडून त्यांच्या समस्या म्हणून स्विकार केला जातो.

### २) सामाजिक मूल्यांशी विसंगती :

मूल्य हे व्यक्तीचे नैतिक वर्तन ठरते ते व्यक्तीसाठी आदर्श असते. मूल्यानुसार व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वामध्ये परिवर्तन घडून येत असते व व्यक्तीच्या जीवनाला स्वतंत्र दिशा प्राप्त होत असते. समाजातील सभासदाचे कोणते वर्तन योग्य किंवा अयोग्य आहे याचे निर्धारण सामान्यपणे केलेल्या सामाजिक मूल्याच्या आधारे निश्चित केले जाते. त्यामुळे लोकांनी सामाजिक प्रमाणके व मुल्ये यांना लक्षात ठेवून आपले वर्तन करावे अशी समाजाची अपेक्षा असते. समाजातील काही व्यक्ती सामाजिक मूल्यांच्या विरुद्ध वर्तन करतात. त्यामुळे समाजात अनेक प्रश्न निर्माण होतात. थोडक्यात सामाजिक मूल्यांच्या विरोधी वर्तन केल्यामुळे जी सामाजिक विघटन करणारी परिस्थिती निर्माण होते ती म्हणजे सामाजिक समस्या होय.

### ३) उपाययोजनाची जाणीव :

सामाजिक समस्येचे स्वरूप ठरवीत असताना. कोणत्याही समस्येवर उपाययोजना ठरवणे गरजेचे असते. जो पर्यंत उपायाची योग्य वेळी जाणीव होत नाही किंवा बहुसंख्य लोकांना त्यांची गरज वाटत नाही तोपर्यंत विशिष्ट सामाजिक परिस्थितीला सामाजिक समस्या म्हणता येणार नाही. समाजात विविध प्रकारच्या सामाजिक समस्या निर्माण झालेल्या असतात. परंतु त्या समस्या आपोआपच नष्ट होत नाहीत. समस्यांचे निवारण करण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या उपाययोजनांची गरज भासते. उदा. वाढती लोकसंख्या ही एक सामाजिक समस्या आहे. ही समस्या सोडवण्यासाठी विविध स्वरूपाच्या उपाययोजना कराव्यां लागतात.

### ४) सामाजिक सापेक्षता :

सामाजिक समस्यांचे स्वरूप समाज समाजानुसार भिन्न भिन्न असू शकते. नीती आणि अनितीच्या कल्पना वेगवेगळ्या असतात. उदा. भारतातील काही राज्यांमध्ये मध्यपान करणे हा गुन्हा समजला जातो. परंतु अमेरिकेसारख्या देशामध्ये मद्यपान करणे ही समाजमान्य गोष्ट आहे. म्हणून सामाजिक समस्यांचे स्वरूप समाजसापेक्ष असते.

### ५) सामाजिक आणि नैसर्गिक समस्या :

काही विचारवंतांच्या मते गुन्हेगारी, मद्यपान, भिक्षा वृत्ती, लोकसंख्या वाढ, बेरोजगारी यासारख्या सामाजिक समस्या मानवनिर्मित आहेत. तर दुष्काळ, महापूर, चक्रीवादळ, भूकंप यातून निर्माण होणाऱ्या ज्या समस्या आहेत त्या समस्या नैसर्गिक स्वरूपाच्या आहेत. त्यांना सामाजिक समस्या म्हणता येणार नाही. परंतु काही विचारवंतांच्या मते नैसर्गिक समस्यातूनच सामाजिक समस्यांची निर्मिती होत असते व त्यातून समाजामध्ये पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होतो. म्हणून त्याला सामाजिक समस्या संबोधता येईल.

### ६) समाजावर अनिष्ट परिणाम :

प्रमाणकांचे उल्लंघन करणारे वर्तन हे सामाजिक समस्येच्या निर्मितीला कारणीभूत ठरते. समाजाची व्यवस्था सुरळीत असावी या करता विविध प्रकारची प्रमाणके असतात. या प्रमाणकानुसार समाजातील सभासदांनी वर्तन केल्यास समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण होते. परंतु जेव्हा या मूल्यांच्या विरोधात वर्तन केले जाते त्याचा अनिष्ट परिणाम समाजातील बहुसंख्य लोकांवर पडतो. म्हणूनच निर्माण झालेली ही परिस्थिती समाजातील सभासदांना अयोग्य वाटते. निर्माण झालेली ही परिस्थिती नष्ट कशी करता येईल याचा विचार केला जातो. सामाजिक समस्येचा अनिष्ट परिणाम हा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या समाजावर पडतो.

### ७) सामूहिक सामाजिक क्रिया :

समाजातील विविध सामाजिक समस्या व्यक्तिगत पातळीवर सोडवता येत नाहीत. सामाजिक समस्या सामाजिक कारणामुळे निर्माण झालेल्या असतात. त्यामुळे त्या समस्या सोडवण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक असते. सामूहिक क्रियेच्या माध्यमातून समस्या सोडवण्याचे प्रयत्न झाल्यास ती समस्या सोडवणे सहज शक्य होते. उदाहरणार्थ भ्रष्टाचार, मद्यपान, बालगुन्हेगारी, वाढती लोकसंख्या इत्यादी सामाजिक समस्या या व्यक्तिगत पातळीवर सोडवणे अशक्य आहे. त्यासाठी सामूहिक सामाजिक क्रियेची आवश्यकता भासते.

## सामाजिक समस्येची कारणे : Causes of Social Problems

सामाजिक समस्या या मानवनिर्मित असतात. त्या समाजातून उत्पन्न झालेल्या असतात. साहजिकच कोणतीही सामाजिक समस्या निर्माण होण्यामागे त्या समाजातील सामाजिक परिस्थिती जबाबदार असते. कोणत्याही एका विशिष्ट प्रकारच्या कारणातून व त्याच्या परिणामातून सामाजिक समस्या निर्माण होत नाही. तर विविध घटकाच्या प्रभावातून या समस्या निर्माण होत असतात. अनेक घटक त्यासाठी जबाबदार असतात. त्या घटकांचे विश्लेषण खालीलप्रमाणे करता येईल.

**१) सामाजिक परिवर्तन :**

सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजाच्या संरचनेत झालेला बदल होय. परिवर्तनशीलता ही प्रत्येक समाजाची प्रवृत्ती आहे. त्याशिवाय कोणत्याही समाजात स्थिरता राहू शकत नाही. म्हणजे समाज हा एकाच अवस्थेत अधिक काळ राहण्यासाठी त्यामध्ये सातत्याने परिवर्तन होत असते. कारण परिवर्तन हा निसर्गाचा एक नियम आहे. समाज व्यवस्था ही देखील त्याला अपवाद असू शकत नाही. १९९१ च्या जागतिकीकरणाने विविध व्यवसायवरती म्हणजेच हस्त उद्योगावरती त्याचा विपरीत परिणाम झाला. त्यामुळे एकीकडे प्रगती तर दुसरीकडे बेकारीच्या समस्या निर्माण झाली. जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण या धोरणामुळे संपूर्ण समाजामध्ये संरचनात्मक बदल घडून आला.

**२) सामाजिक विघटन :**

हिंदू समाज हा संघटन आणि विघटन यासारख्या प्रक्रियेतून जात आहे. विघटन म्हणजे संघटित नाही. जेव्हा समाजाची व्यवस्था विस्कळीत होते त्यावेळी समाजात विघटन घडून येते. नैसर्गिक संकटाबरोबर सामाजिक, आर्थिक संकटामुळे विघटनाची प्रक्रिया जोर धरते. राजकीय संकटामुळे १९४७ मध्ये हिंदुस्तानची जी फाळणी झाली त्यातून भारत आणि पाकिस्तान अशा दोन राष्ट्राची निर्मिती झाली. राजकीय धोरणामुळे हिंदू आणि मुस्लिम यांचे भारत आणि पाकिस्तानमध्ये स्थलांतर झाले. या स्थलांतरामुळे भारतामध्ये मोठ्या प्रमाणात पाकिस्तान मधील लोक निर्वासित म्हणून आले. अशा लोकांची पुनर्वसनाची समस्या मोठ्या प्रमाणात भारतामध्ये निर्माण झाली. याबरोबरच नैसर्गिक कारणामुळे देखील सामाजिक समस्यांची निर्मिती होते.

**३) व्यक्तिगत विघटन :**

व्यसनाधीन लोक, मानसिक विकृती असलेले लोक, जुगारी आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा भरणा समाजामध्ये अधिक झाल्यास समाजात विविध प्रकारच्या समस्या उद्भवतात. अशा व्यक्ती आपल्या व्यक्तिगत जीवनात वैफल्य भावनेने पछाडलेले असल्यामुळे त्यांची वर्तणूक समाज विघातक बनते. त्यामुळे समाजात सामाजिक समस्या निर्माण होण्यास पोषक वातावरण तयार होते.

**४) मूल्यसंघर्ष :**

कोणत्याही समाजव्यवस्थेत व्यक्तीने मूल्य, प्रमाणक व्यवस्थेनुसार वर्तन करणे अपेक्षित असते. ही वर्तन प्रणाली सामाजिकरण प्रक्रियेद्वारा व्यक्तीवर बिंबवली जाते. परंतु समाज हा परिवर्तनशील आहे. ज्या वेळेस समाजात परिवर्तन घडून येते त्या वेळी समाजातील जुनी प्रमाणक व्यवस्था व नवीन प्रमाणक व्यवस्था यात संघर्ष घडून येतो. प्रत्येक समाजामध्ये अनेक प्रकारचे गट आणि उपगट असतात. त्या सर्वांची मूल्ये सारखीच असत नाहीत. त्यामुळे परस्परांमध्ये मूल्यसंघर्ष निर्माण होतो. उदाहरणार्थ धर्म, जात, भाषा, प्रदेश घटकांवर आधारीत मूल्य संघर्ष निर्माण होतो. त्यातून समाजात जातीय दंगली, धार्मिक, भाषिक आणि प्रांतिक संघर्ष यासारख्या समस्या निर्माण होतात. समाजातील बहुसंख्य लोक जुन्या मूल्य व्यवस्थेला चिकटून असतात. त्यामुळे समाजात मूल्य संघर्ष निर्माण होतो.

**५) नियमबाह्य वर्तन :**

सामाजिक नियमांचे समाजातील सर्वच व्यक्ती कडून काटेकोरपणे पालन होऊ शकते असे नाही. अशा व्यक्ती कायद्याचे उल्लंघन करू शकतात. याचा अर्थ असा की, ज्या व्यक्ती नियमबाह्य वर्तन करतात त्या शारीरिक व मानसिकदृष्ट्या निरोगी असू शकत नाहीत. अशा पध्दतीने रॉबर्ट मर्टन यांनी नियमबाह्य वर्तनाचे समाजशास्त्रीय विवेचन केलेले आहे. काही वेळेस मानसिक अस्वस्थता विचलित असलेल्या व्यक्तीकडून नियमबाह्य वर्तन घडते. कारण त्या व्यक्तीस सामाजिक नियमांचे भान राहत नाही. बऱ्याचदा व्यक्ती नियमबाह्य मार्गाने आपल्या मर्यादा तोडत असतात. त्यामुळे समाज व्यवस्था कोलमडते. त्यातून समाजात अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात. उदा. गुन्हेगारी आणि भ्रष्टाचार ही प्रवृत्ती नियमबाह्य वर्तनातूनच उद्भवलेली समस्या आहे.

**६) सांस्कृतिक पश्चायन :**

कोणत्याही समाजात सांस्कृतिक परिवर्तन होताना संस्कृतीचे सर्व भाग समान गतीने बदलत नाहीत. संस्कृती जीवनव्यापी असून जीवनाच्या सर्व भागांमध्ये होणारे परिवर्तने समान गतीने न होता काही भाग पुढे जातात किंवा काही भाग तसेच म्हणजे मागे राहतात. यालाच सांस्कृतिक पश्चायन म्हटले जाते. भारतीय समाजात तर सांस्कृतिक पश्चायनाने अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्याचे आढळते. ब्रिटिश राज्य सत्तेत भौतिक संस्कृती झपाट्याने बदल झाला. आगगाडी, बस यांनी वाहतूक सुरू झाली. पण त्यासाठी लागणारी शस्त्र, नियम पालन, सामाजिकता लोकांनी स्वीकारलेली नाही. औद्योगिकरणाने सर्व लोकांना काम मिळाले. त्याचबरोबर रिकाम्या वेळेचा उपयोग करण्याची साधने उपलब्ध झाली नाहीत. स्त्रियांनी शिकून नोकरी करण्याच्या बाबतीत समाज बदलला. पण अन्य बाबतीत स्त्री-पुरुषांची जुनीच मापे राहिली आहेत.

**७) सामाजिक कायदे आणि बंधने :**

सध्याचे राज्य स्वतःला कल्याणकारी राज्य म्हणून घेते. सामाजिक सुधारणा, पुनर्रचना, विकास करण्याची जबाबदारी आज राज्यावर आहे. समाज हित डोळ्यासमोर ठेवून राज्य अनेक कायदे करते. पण तो कायदा होताच त्यातून नवीन समस्या जन्माला येतात. उदा. मद्यपान बंदी केल्याने चोरून दारू पिणाऱ्यांची, विकणाऱ्यांची संख्या वाढली व गुन्हेगारीचे प्रमाण वाढले. सुवर्ण नियंत्रकांच्या कायद्याने सोनारांना बेकार केले व सोन्याचा चोरटा व्यापार सुरू झाला. बेकारी भत्ता दिल्याने लोकांची इतका वृत्ती वाढीस लागली असेही लोक म्हणू लागले. थोडक्यात जसे कायदे करतील, बंधने घातली जातील, तसतशा सामाजिक समस्या निर्माण होताना आढळतात. सामाजिक समस्यांची उपज ही विविध मुद्यांच्या आधारे होत असते. त्याला काही सांस्कृतिक घटक, सामाजिक घटक, आर्थिक घटक, राजकीय घटक व संरचनात्मक घटक जबाबदार असतात. या कारणातून सामाजिक समस्या निर्माण होत असतात.

### १.२.२ सामाजिक समस्यांचे वर्गीकरण

समाज हा सामाजिक संबंधांचे जाळे आहे. समाज हा याच सामाजिक संबंधातून निर्माण होत असतो. समाज निर्मितीची प्रक्रिया प्रदीर्घ, गुंतागुंतीची आणि दीर्घकालीन असते. व्यक्तीच्या अस्तित्व आणि सातत्यासाठी

तसेच व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासासाठी काही मूलभूत गरजा असतात आणि या गरजांची पूर्तता करण्यासाठी समाजामध्ये सामाजिक संबंध निर्माण होत असतात. परस्परांच्या आंतरक्रियेतून आणि सामाजिक संबंधातून समाज अस्तित्वात येत असतो. सामान्यपणे समाज आणि सामाजिक संबंधांमध्ये आदर्श अशा आचार विचार आणि त्यांच्या विरोधी परिस्थिती निर्माण होते. त्या परिस्थितीला सामाजिक समस्या म्हणून संबोधले जाते. समाज सातत्याच्या निर्मितीबरोबरच सामाजिक समस्या निर्माण झालेल्या आहेत. सहाजिकच, सामाजिक समस्या मानवी समाजाइतक्याच प्राचीन आहेत. मानवी समाजाच्या विकासाच्या प्रत्येक कालखंडात कमी-अधिक प्रमाणात सामाजिक समस्या प्रचलित होत्या. भारतात एकोणिसाव्या शतकात सती प्रथा, बालविवाह, अस्पृश्यता या सारख्या अनेक गंभीर सामाजिक समस्या होत्या. तर आज कौटुंबिक हिंसाचार, बेकारी, बाल गुन्हेगारी, भ्रष्टाचार यासारख्या समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. सामाजिक समस्या सार्वत्रिक आणि सर्वकालिक आहेत. परंतु प्रत्येक समाजात आणि प्रत्येक कालखंडात सामाजिक समस्यांचे स्वरूप सारखे नसते याची चर्चा आपण केलीच आहे. नैसर्गिक आणि सामाजिक परिस्थितीमध्ये सतत परिवर्तन होत असल्यामुळे समाजाची मूल्ये व प्रमाणके यामध्ये बदल होतात वा नव्या जुन्या मूल्यात संघर्ष निर्माण होतो व त्यातून काही समस्या निर्माण होतात. जगातील सर्वच देशात प्रत्येक मानवी समाजात कोणत्या ना कोणत्या सामाजिक समस्याला त्या देशाला, व्यक्तीला आणि त्या राज्याला जावे लागतेच. इतर देशांपेक्षा भारतीय समाजात काही विशिष्ट सामाजिक समस्या समोर आहेत, ज्या आपल्या विशिष्ट सांस्कृतिक व सामाजिक संरचनेमुळे निर्माण झालेल्या आहेत. समाज ज्या सामाजिक समस्यांचा सामना करतो त्या सर्वसाधारण विविध स्वरूपाच्या असतात. या सर्व सामाजिक समस्या विविध भागात विभागल्या जातात. सामाजिक समस्यांचे प्रकार केस आणि फुल्लर व मायर्स यांनी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**अ) कलॅरेन्स मार्शल केस :** यांनी सामाजिक समस्यांच्या संरचनात्मक आधारावर सामाजिक समस्येचे वर्गीकरण चार भागात केले आहे.

१) भौतिक पर्यावरणाच्या घटकातून उद्‌भवणाऱ्या समस्या.

२) लोकसंख्येमुळे उगम पावणाऱ्या समस्या.

३) अशक्त सामाजिक संघटनामुळे निर्माण झालेल्या समस्या.

४) समाजाच्या सांस्कृतिक मुल्यातून निर्माण झालेल्या अथवा संघर्षातून उद्‌भवणाऱ्या समस्या.

**ब) फुल्लर व मायर्स :** यांच्या मते प्राथमिक आधारावर सामाजिक समस्याची तीन प्रकारात विभागणी करता येते.

**१) भौतिक समस्या :** भौतिक प्रकारच्या समस्या सर्वसाधारणपणे पर्यावरणीय प्रकारच्या परिस्थितीमुळे निर्माण होतात. या समस्या मुल्यसंघर्षावर आधारित नसतात. उदाहरणार्थ भूकंप, दुष्काळ, महापूर, अवर्षण, वादळ इत्यादी.

**२) सुधारात्मक समस्या :** सुधारात्मक समस्यांच्या दुष्परिणामांची जाणीव समाजातील लोकांकडे असते. या समस्या विरोधी लोकाकडे कोणतीच निश्चित अशी उपाययोजना असत नाही. उदाहरणार्थ गुन्हेगारी, दारिद्र्य, एड्स, मादक पदार्थ सेवन वैगेरे.

**३) नैतिक समस्या :** नैतिक समस्या समाज मूल्यांशी संबंधित असतात. या समस्यांच्या कारणांशी सामान्य लोकांमध्ये सहमती असत नाही जुगार,घटस्फोट वगैरे. समाजामध्ये सर्व प्रकारच्या सामाजिक समस्या आढळत असतात. या सामाजिक समस्या पासून मुक्त असा कोणताही समाज नाही. सामाजिक समस्यांचे स्वरूप हे संमिश्र स्वरूपाचे असते. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय घटकांच्यामुळे सुद्धा सामाजिक समस्या निर्माण होतात. तर काही तज्ञांच्या मते, जलद परिवर्तन, दोन पिढ्यांतील अंतर, सामाजिक संस्थांचे असमायोजन, मूल्य संघर्ष अशा प्रकारच्या परिस्थितीमुळे समाजामध्ये विविध सामाजिक समस्या उद्‌भवत असतात. केस आणि फुलर व मायर्स यांनी केलेल्या सामाजिक समस्यांच्या वर्गीकरणावरून सर्वसाधारणपणे सामाजिक समस्या पुढील प्रकारांमध्ये विभागता येतील.

**१) भौतिक किंवा पर्यावरणीय समस्या :**

भौगोलिक किंवा भौतिक परिस्थिती मध्ये जेव्हा कमी–अधिक प्रमाणात बदल होतात त्यातून पर्यावरणीय समस्या निर्माण होत असतात. ज्वालामुखी उद्रेक, पूर, भूकंप, दुष्काळ, महापूर, वादळ, यासारख्या समस्या या निसर्गातील होणाऱ्या बदलामुळे अस्तित्वात येत असतात. त्याचबरोबर पर्यावरण प्रदूषणाची परिस्थिती जेव्हा अस्तित्वात येते तेव्हाही विविध सामाजिक समस्यांची निर्मिती होत असते. उदा. वैश्विक तापमान वाढ, महापुर, महामारी, इत्यादी.

**२) परंपरागत समस्या :**

भारतीय समाज व्यवस्था किंवा कोणत्याही मानवी समाजात काही पारंपारिक समस्या भेडसावतात. त्यामध्ये अंधश्रद्धा, स्त्रीभ्रूण हत्या, बुवाबाजी, भोंदूगिरी, भिक्षा वृत्ती, अवैज्ञानिकता यांचा समावेश होतो.

**३) आर्थिक प्रकारच्या समस्या :**

भारत हा विकसनशील देश असल्यामुळे भारतामध्ये जगातील लोकसंख्येचे प्रमाण दुसऱ्या क्रमांकावर आहे. प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात संसाधनांच्या उपलब्धते नुसार प्रतिकूल आर्थिक समस्या निर्माण होऊ शकतात. याच परिस्थितीतून या समस्या निर्माण झालेल्या आहेत. भारतामध्ये संपत्तीचे असमान वितरण होत असल्यामुळे दारिद्र्य, बेकारी, गुन्हेगारी, भिक्षा, चोरी, झोपडपट्टी अशा अनेक समस्या निर्माण होतात.

**४) औद्योगिकीकरण आणि नागरीकरण यातून निर्माण झालेल्या समस्या :**

औद्योगिकीकरणामुळे नवनवीन उद्योगधंद्याची निर्मिती होते. त्यामुळे नागरिकीकरणाला चालना मिळते. नवनवीन तंत्रज्ञानामुळे कुटीर उद्योग बंद पडतात आणि अद्यावत तंत्रज्ञान व प्रचंड प्रमाणात असलेली यंत्रसामग्री यामुळे बेकारीची समस्या निर्माण होते. वाढत्या शहरीकरणातून झोपडपट्टी, घरांची टंचाई, ऊर्जा टंचाई, वाहतुकीचा ताण, अपघात, कामगार समस्या, आरोग्याचे प्रश्न, जल प्रदूषण, हवा प्रदूषण, पाणी प्रदूषण, सामाजिक विघटन अशा विविध समस्या निर्माण होतात.

**५) राजकीय स्वरूपाच्या सामाजिक समस्या :**

राजकीय सत्ता प्राप्त करण्याच्या अनुषंगाने अनेक सामाजिक समस्यांना प्रोत्साहन दिले जाते. हे प्रोत्साहन राजकीय हेतूने दिले जाते. त्यामुळे अनेक गंभीर स्वरूपाच्या समस्या निर्माण होतात. राजकीय पक्ष, निवडणुका, राजकीय सत्ता, राजकीय महत्वकांक्षा यातून राजकीय प्रकारच्या विविध समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते. उदा. सांप्रदायिकता, दहशतवाद, प्रांतवाद इत्यादी.

**६) धार्मिक समस्या :**

धर्म माणसाचे वर्तन नियंत्रित करत असतो. जगात असा एकही देश नाही ज्या देशांमध्ये धर्माचे अस्तित्व नाही. धर्म माणसाच्या अस्तित्वाचे मुख्य अंग मानले जाते. वास्तविकपणे अलौकिक शक्ती वरील श्रद्धा म्हणजे धर्म होय. धर्मामुळे व्यक्ती वर्तनामध्ये आपलेपणा प्रेम-भाव, मानवता, समता प्रस्थापित होणे अपेक्षित असते. परंतु या धार्मिकतेतून अनेक सामाजिक समस्या उद्भवताना दिसून येतात. स्वतःचे स्वार्थी वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी समाजामध्ये धार्मिक तेढ निर्माण केली जाते. त्याच बरोबर धार्मिकता, मूलतत्त्ववाद, सांप्रदायिक दंगली, अंधश्रद्धा, भिक्षा वृत्ती आणि दहशतवाद पसरवला जातो.

**७) नैतिक समस्या :**

समाजामध्ये नैतिकता ही समाज मूल्यांशी निगडित असते. मूल्यांच्या विरोधी वर्तन केल्यामुळे काही समस्या निर्माण होतात. उदा. व्यसनाधीनता, वेश्यावृत्ति, बाल दुरुपयोग, बलात्कार इत्यादी.

**८) सामाजिक स्वरूपाच्या समस्या :**

व्यक्ती समूह यांच्या परस्पर संबंधातून समाजाचे अस्तित्व टिकून राहते. सामाजिक संबंधांमध्ये बाधा आल्यास सामाजिक संबंधामध्ये विस्कळीतपणा निर्माण होऊन सामाजिक संरचनेला बाधा होते आणि सामाजिक विघटन घडून येत असते. समाजव्यवस्थेतील सामाजिक नियंत्रणाची साधने प्रभावहीन बनू लागतात. परिणामी, सामाजिक समस्यांची निर्मिती होते. गुन्हेगारी, भ्रष्टाचार, काळाबाजार, हुंडाबळी, स्त्रिया विरोधी, हिंसात्मक कृत्य या सारख्या अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. थोडक्यात, सामाजिक समस्या ही एकूण समाजाला धोका किंवा अडथळा निर्माण करणारी सामाजिक बाब मानली जाते. सामाजिक समस्या ही राष्ट्रहितामध्ये अडथळे आणते. सामाजिक समस्यामुळे मानवी हक्कांचे उल्लंघन होते. त्यामुळे त्याचे निराकरण करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते, समाजशास्त्रज्ञ यांचे सातत्याने प्रयत्न सुरू असतात.

### १.२.३ सामाजिक समस्येच्या अध्ययनाची गरज : (Need of study of Social Issues)

सामाजिक समस्यांचे अस्तित्व हे समाजामध्ये चिरकाल असते. समाजामध्ये अनेक सामाजिक समस्या असतात. उदा. गरीबी, बेरोजगारी, जातीभेद, दारिद्र्य, कुपोषण, महागाई, हुंडा, अंधश्रद्धा, निरक्षरता ज्या देशात, राज्यात अनेक सामाजिक समस्या निर्माण होत असतात अशा ठिकाणी या समस्येविषयी निश्चित अशी ध्येयधोरणे आखलेली नसतात. सामाजिक परिवर्तनही मंदगतीने होत असते. सहाजिकच या प्रक्रिया वरती अनेक

सामाजिक घटकांचा प्रभाव होत असतो. त्यामुळे सामाजिक समस्यांचे प्रमाण हे कमी होते. सामाजिक समस्यांची जाणीव ही भारतीय समाज व्यवस्थेमध्ये फारच उशिराने झाल्याचे दिसून येते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे जेव्हा बुद्धिप्रामाण्यवादास महत्त्व देण्यात येऊ लागले तेव्हा या समस्यांचे प्रकटीकरण झाले. सामाजिक समस्याकडे स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणावे तितके लक्ष दिले गेले नाही. कारण भारतीय समाज हा रुढीप्रिय, दैववादी विचारांच्या कक्षेत अडकला होता. त्याचबरोबर समाजात उद्‌भवणाऱ्या समस्या दैवी कोपाने वाढतात, या श्रद्धेतून त्याचे निराकरण होते अशाही धारणा होती. कर्म तसे फळ भोगावे लागते अशा भावनेतून सामाजिक समस्यांना प्रोत्साहन मिळाल्याचे दिसून येते. परंतु भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये समाजशास्त्र या विषयाच्या अध्ययनाची सुरुवात १९१९ पासून झाली. त्यानंतर अनेक सामाजिक समस्यावरती प्रकाश टाकण्यात आला. समाजशास्त्रामध्ये समाजाचा अभ्यास तार्किकदृष्ट्या केला जातो, त्याचे स्वरूप व्यापक असते. समाजशास्त्रामध्ये सामाजिक संबंध, समूह, संस्था, सामाजिक प्रक्रिया, सामाजिक परिवर्तन या विविध अंगाने समाजाचा अभ्यास केला जातो. मानवी समाजात स्थैर्य आणि व्यवस्था निर्माण करणाऱ्या घटकांचा अभ्यास सामाजिक शास्त्रांमध्ये होत असतो. कारण समाजशास्त्र हे सामाजिक स्थिती आणि गती याचा अभ्यास करते. ज्या समाजात वेगाने परिवर्तन होते त्या समाजात सामाजिक विघटनाची प्रक्रियाही वेग घेत असते. या प्रक्रियेत अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. त्यामुळे समाजात अस्थैर्य निर्माण होते. सामाजिक समस्येने अनेक लोकांचे कौटुंबिक विघटन घडून येते. म्हणून अशा सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे हे समाजशास्त्राचे अत्यंत महत्त्वाचे अभ्यास क्षेत्र बनले आहे. समाजशास्त्राचा उदय एकोणिसाव्या शतकात झाला. हा उदय एकोणिसाव्या शतकात प्रामुख्याने यूरोपात झाला. नंतर जगभरात समाजशास्त्राचा विकास झाला. पुढे भांडवलशाही अर्थव्यवस्था, औद्योगिकीकरण, नागरीकरण यासारख्या प्रक्रियांमधून सामाजिक परिवर्तन वेगाने होऊ लागले. पण त्याचबरोबर नव्या बदलांनी सामाजिक जीवन अस्थैय, शांतता व अव्यवस्था अशा समस्या निर्माण झाल्या. सामाजिक विघटनातून अनेक नव्या समस्या निर्माण झाल्या. समाजात नेमके काय घडत आहे हे जाणून घेण्याची आणि नव्या बदलाशी जुळवून कसे घेता येईल याविषयी गंभीरपणे विचार करण्याची आवश्यकता अनेक समाजशास्त्रज्ञांना जाणवू लागली. त्यातून समाजाविषयीचे नवीन शास्त्र समाजशास्त्र उदयाला आले आणि विकसित झाले. समाजशास्त्राच्या विकासामागील प्रमुख प्रेरणा म्हणजे त्या काळात सामाजिक समस्या जाणून घेणे व त्याचे निराकरण करून त्यावर उपाययोजना शोधून काढणे हे होय. आज भारतातील सामाजिक समस्या पैकी काही समस्या या सार्वत्रिक स्वरूपाच्या आहेत. यामध्ये कौटुंबिक विघटन, बेकारी, बेरोजगारी, दारिद्र्य, कुपोषण, महागाई, अनारोग्य, घटस्फोट, बाल गुन्हेगारी, भ्रष्टाचार, झोपडपट्टी, मद्यपान, जुगार, भिक्षावृत्ती, वृद्धांच्या समस्या इत्यादी. या समस्या बरोबरच भारतीय समाजात इतर समस्याही आहेत. त्यामध्ये लोकसंख्याचा स्फोट, अनुसूचित जाती जमातीच्या समस्या, अस्पृश्यता, जातीयता, हुंडाबळी अल्पसंख्यांकांचे प्रश्न, भाषावार प्रांत रचना, राष्ट्रीय एकात्मता, विविध सामाजिक समस्याचे अध्ययन करणे आणि साऱ्या समस्या समजून घेऊन त्याचे निराकरण करण्यासाठी उपाय शोधून काढणे या दृष्टीने समाजशास्त्र सतत अध्ययन करत असते. सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी सामाजिक विचारवंतांनी आपले योगदान विविध सिद्धांताच्या आधारे दिले आहे. त्यामध्ये बी. आर. आंबेडकर, ऑगस्त कॉम्स, मॅक्स वेबर, ईमील डुरखैम, कार्ल मार्क्स या विचारवंतानी

सामाजिक समस्यांचे निराकरण करण्याचे तसेच सामाजिक सिद्धांताच्या व सामाजिक पुनर्निर्मितीचा विचार मांडला. महात्मा गांधी व तत्कालीन लोकांनी मध्यपान, जातीयता, स्त्रियांची दुःखे यासारख्या प्रश्नाकडे लक्ष वेधून घेतले. तथापि ब्रिटिश राज्यकर्ते याबाबत उदासीन राहिले. त्यामुळे हे प्रश्न कायम राहिले. जलद गतीने होणारे औद्योगीकरण आणि नागरीकरण, त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्या तितक्या प्रखरतेने पाश्चात्य राष्ट्रातून जाणवल्या नाहीत. कारण पाश्चात्य राष्ट्रामध्ये कल्याणकारी राज्याच्या कल्पनेची सुरुवात झाली. त्यामुळे सामाजिक समस्यांची चिकित्सा करून निराकरण करण्याचे प्रयत्न या राष्ट्रातून झाले. सुरुवातीला भारतात औद्योगिकीकरणाची प्रक्रिया संथ गतीने होत होती. स्वातंत्र्योत्तर कालखंडात सरकारने जरी कल्याणकारी राज्याची कल्पना स्वीकारली असली तरी देशासमोरील विविध सामाजिक समस्यांचे निराकरण करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली असली तरी निर्वासितांचा प्रश्न, अन्नधान्याचा प्रश्न, संस्थांन विलीनीकरणाचा प्रश्न यासारख्या ज्वलंत प्रश्नांना त्यावेळच्या सरकारांना सामोरे जावे लागत होते. उपरोक्त प्रकारच्या कारणांमुळे सामाजिक समस्यांचा विचार करणे, त्याकडे लक्ष केंद्रित करण्यास दिरंगाई झाली. असे असले तरी आता मात्र सामाजिक समस्यांच्या अध्ययनाची नितांत आवश्यकता असल्याचे दिसून येते. समाजशास्त्र सामाजिक समस्यांचा अभ्यास करतच असते. पण त्याचबरोबर सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते, पत्रकार, सामान्य लोक हे सामाजिक समस्यांची दाहकता समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न करतात. त्यावरील उपायाबाबतचा महत्वाचा विचार ही करतात. इतर सामाजिक शास्त्रे सामाजिक समस्यांचा अभ्यास करत असली तरी त्यांच्या अभ्यासाला विशिष्ट बाजूच्या मर्यादा असतात. समाजशास्त्र असे शास्त्र आहे की, त्यामध्ये मानवाच्या सर्वच प्रकारच्या सामाजिक समस्यांची कारणे, समाजावरील त्यांचे परिणाम यांचे वस्तुनिष्ठ विश्लेषण देतो. समाजातील व्यक्ती, समूह, संस्था तसेच समग्र समाजावर सामाजिक समस्यांचे कोणते ना कोणते परिणाम होतात याचे अध्ययन समाजशास्त्रज्ञ करतात. मानवी समाजातील सामाजिक समस्यांचे गांभीर्य लक्षात घेता सामाजिक समस्यांच्या अध्ययनाची आवश्यकता लक्षात येते. समाज विकासासाठी सामाजिक पुनर्निर्मितीसाठी सामाजिक प्रश्नांच्या अध्ययनाची नितांत आवश्यकता आहे. भारतीय संविधानात कल्याणकारी राज्य, त्याच बरोबर मार्गदर्शक तत्वे हे राज्याच्या कल्पनेचे ध्येय बाळगले असून लोकांना अधिकाधिक सेवा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सोपवली आहे. आधुनिक कल्याणकारी राज्याच्या कल्पनेत आर्थिक राहणीमान, सार्वजनिक आरोग्य व स्वास्थ, वैद्यकीय मदत, कामगार कल्याण, समाज कल्याण व समान शिक्षण यासारख्या विधायक संरक्षणात्मक सोयीची उभारणी यांचा समावेश होतो.

**१) सामाजिक परिवर्तन :**

मानवी समाज हा परिवर्तनशील आहे. मानवी समाजामध्ये सातत्याने परिवर्तन होत असते सामाजिक विकासाला गती मिळत असते. ह्या या गतिशील तेथूनच अनेक समस्या निर्माण होत असतात. या निर्माण होणाऱ्या समस्याकडे लक्ष केंद्रीत करणे गरजेचे असते. समाजाचा विकास साध्य करायचा असेल तर येणाऱ्या समस्यांचे निराकरण शोधले पाहिजे म्हणूनच सामाजिक समस्यांच्या अध्ययनाची निकड आहे. त्यामुळे समाजाच्या विकासाची पावले गतिशील बनतील.

**२) बदलती मूल्य व्यवस्था :**

सामाजिक मूल्ये सामाजिक वर्तनामध्ये परिवर्तन घडवून आणत असतात. सामाजिक मूल्यात बाधा झाल्यास समाज जीवन विस्कळीत होते. सामाजिक जीवन विस्कळीत झाल्यास संघटन निर्माण होणार नाही. सामाजिक मूल्ये बदलली की व्यक्तीचा दर्जा भूमिका यामध्ये बदल होतो. जुन्या व नव्या मूल्यात संघर्ष निर्माण झाला की सामाजिक विघटनाची प्रक्रिया सुरू होते. या प्रक्रिये बरोबरच कौटुंबिक विघटन, वृद्धांच्या समस्या, ताणतणाव, घटस्पोट अशा अनेक समस्या त्यांचे निराकरण करण्यासाठी सामाजिक समस्या अभ्यासावे लागतात.

**३) आर्थिक विकास :**

सामाजिक समस्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी आर्थिक प्रतिकूल परिस्थिती ही जबाबदार असते. समाजात असणाऱ्या आर्थिक विषमता, वाढती लोकसंख्या, यातून अनेक आर्थिक समस्या निर्माण होतात त्यामध्ये भ्रष्टाचार गुन्हेगारी बेकारी दारिद्र्य या प्रकारच्या समस्या यांचा समावेश होतो. देशाच्या आर्थिक विकासात या समस्या अडथळा आणतात म्हणून सामाजिक समस्यांच्या अध्ययनाची आवश्यकता आहे.

**४) सामाजिक व राजकीय सुरक्षा :**

व्यक्ती आणि समाज यांच्या परस्पर संबंधातून आणि सहकार्यातून कोणताही समाज आकाराला येत असतो. परस्पर संबंधाच्या सानिध्यातून विविध सामाजिक प्रक्रिया निर्माण होत असतात. दर्जा आणि भूमिका, नियोजन व प्रमाणके, मुल्ये किंवा सांस्कृतिक मुल्ये वगैरे माध्यमातून सामाजिक संरचना अस्तित्वात येते. परंतु जेव्हा व्यक्ती व समाजाचे परस्पर संबंध विस्कळीत होतात, तेव्हा सामाजिक समस्या निर्माण होतात. हुंडाबळी भ्रष्टाचार या समस्या निर्माण होतात. सामाजिक समस्या सोडवण्याचे प्रभावी साधन म्हणून राजकीय घटकाकडे पाहिले जाते. यासाठीच तर सामाजिक समस्यांच्या अध्ययनाचे आवश्यकता आहे त्यामुळे समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण होण्यास मदत होते.

**५) शासकीय योजना :**

समाजात उद्‌भवणाऱ्या समस्या सर्वव्यापी असतात या समस्या विविध असू शकतात त्यामध्ये मानसिक रोग, ताणतणाव, आत्महत्या, बेरोजगारी, दारिद्र्य, कुपोषण, भ्रष्टाचार, कौटुंबिक विघटन ,घटस्फोट. इत्यादी. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी समाजशास्त्र दृष्टिकोनातून अध्ययनाची गरज असते. या समस्यांच्या अभ्यासाच्या आधारावरच शासकीय पातळीवर ती धोरण राबवण्यास मदत होऊ शकते.

**६) कायदेशिर दक्षता :**

सामाजिक समस्यांच्या अध्ययनामुळे समाजातील वास्तविक परिस्थितीची जाणीव शासनापर्यंत पोहोचवली जाऊ शकते व तिथे आवश्यक अशा प्रकारच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी कायदेशीर इलाजही करता येऊ शकतो. समाजातील उद्भवणाऱ्या समस्या यांचे निराकरण करण्यासाठी कायदेशीर मार्ग हा अंतिम असतो. त्यामुळे सामाजिक समस्याच्या अभ्यासाची मदत अशा परिस्थितीत नक्की होऊ शकते. सर्वच कायद्यांची निर्मिती

सामाजिक समस्या व परिस्थितीत नक्की होऊ शकते त्यामुळे कायदेतज्ञांना सामाजिक समस्यांचे अध्ययन करणे नितांत गरजेचे असते.

थोडक्यात, समाजाची जडण-घडण करण्यासाठी व समाज विकास करण्यासाठी त्याचबरोबर समाजाची गरजांची पूर्ती करण्यासाठी सामाजिक समस्यांच्या अध्ययनाची आवश्यकता आहे. वंचित, गरजू, अपंग, असमायोजित यांना सहाय्य करण्यासाठी आणि संरक्षण देण्यासाठी त्यांचे अध्ययन करणे गरजेचे असते. कल्याणकारी राज्यात ही जबाबदारी सर्व राज्यांची म्हणून स्वीकारण्यात आलेली आहे. सर्वांची किमान मूलभूत गरज, सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय सुविधा,कामगार कल्याण, समाज शिक्षण या सर्व गोष्टीचा विचार समाजशास्त्रात केला जातो. या सर्व क्षेत्रांमध्ये सुधारणा आणि परिवर्तन व्हावे यादृष्टीने समाजशास्त्रात व समाजकार्य यांची ओळख आपल्याला दिसुन येते. समाजशास्त्र हे आता उपयोजित शास्त्र झाल्यामुळे त्याची व्याप्ती वाढली आहे त्याचबरोबर समाजशास्त्र मध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनातून व बुद्धिप्रामाण्याच्या आधारावर अध्ययन होते. सहाजीकच समाजकार्याप्रमाणे समाजशास्त्रातील अभ्यासात वैज्ञानिक दृष्टिकोनातून समस्यांचे अध्ययन यांची आवश्यकता निर्माण झाली आहे. दारिद्र्य, बेकारी, वेश्यावृत्ति, कौटुंबिक समस्या, वांशिक समस्या, गुन्हेगारी, अस्पृश्यता वंचितांचे प्रश्न दहशतवाद इत्यादी समस्या यांचे विश्लेषण करून त्यांची सोडवणूक करण्यासाठी व त्यावर उपाययोजना करण्यासाठी सामाजिक समस्यांचे अध्ययन करणे आवश्यक बनले आहे. आणि हे समाजशास्त्राच करू शकते त्यासाठी समाज समजून घेणे महत्त्वाचे असते. समाजशास्त्राच्या माध्यमातून त्याचा सुव्यवस्थित अभ्यास करता येतो. सामाजिक समस्यांच्या अध्ययनामध्ये समाजशास्त्रज्ञांची अशी भूमिका असते की, समस्या विषयी जाणीव जागृती निर्माण करणे, सामाजिक समस्यांचे निराकरण याचे स्पष्टीकरण देणे. समाजात उत्पन्न होणाऱ्या समस्या यांचे तटस्थ आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून अध्ययन करणे अत्यावश्यक आहे.

### १.३ सारांश

सामाजिक समस्यांचे स्वरूप हे व्यापक असते. समाजशास्त्राच्या अभ्यासामध्ये सामाजिक समस्या महत्वपूर्ण असा एक विषय आहे. दारिद्र्य, बेकारी, गरिबी, भ्रष्टाचार याविषयी आपण सविस्तर आढावा घेतला आहे. समाजशास्त्रज्ञ प्रस्तुत समस्यांचे तटस्थरित्या आणि वैज्ञानिक दृष्टीकोनातून अध्ययन करत असतात आणि त्या समस्याचे निराकरण व्हावे या दृष्टीकोनातून प्रयत्न करत असतात. सामाजिक समस्या देशाच्या, व्यक्तीच्या आणि समाजाच्या विकासामध्ये अडथळा असतात. वास्तविकपणे सामाजिक समस्या मानवतेला धोकादायक असतात. म्हणून सामाजिक समस्यांचा निपटारा करण्यासाठी शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला जातो. म्हणून या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणे गरजेचे असते. कारण या समस्या मानव निर्मित असल्यामुळे त्याचे परिणाम माणसालाच भोगावे लागतात. यातून अनेक समस्या व कौटुंबिक विघटन घडून येत असते.

## १.४ (अ) स्वयं अध्ययन प्रश्न (खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा)

१) सामाजिक समस्यांचे स्वरूप कोणत्या प्रकारचे असते?

२) कोणत्या बाबींमुळे समाज स्वास्थ्य बिघडते?

३) एकोणिसाव्या शतकात कोणत्या सामाजिक समस्या होत्या?

४) सामाजिक समस्या म्हणजे एखाद्या समाजातील लक्षणीय संख्येच्या व्यक्तीच्या सामाजिक वर्तनातील बिघाड किंवा पथभ्रष्टता, जी त्या समाजातील इतर अनेक सदस्यांना गंभीर परिणाम भोगावयास लावते. मूलत: सामाजिक समस्या या नैतिक समस्या होत ही व्याख्या कोणी दिली?

५) 'समाजातील लक्षात घेण्या योग्य क्रियाशील विचारवंतांचे लक्ष ज्या सामाजिक परिस्थितीकडे वेधले जाते आणि त्या संदर्भात सामूहिक किंवा इतर कोणतीही क्रिया वा इतर उपाय करण्याची आवश्यकता असते' ही व्याख्या कोणी दिली?

६) 'अशी कोणतीही अनिष्ठ परिस्थिती की, जी समुदायातील बहुसंख्य लोकांना अयोग्य वाटते आणि तिच्या पुनर्रचनेसाठी सामूहिक कृतीची आवश्यकता असते' ही व्याख्या कोणी दिली?

## १.४ (ब) स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

१) व्यापक

२) सामाजिक

३) सती प्रथा, बालविवाह, अस्पृश्यता, केशवपन, विधवा विवाह.

४) रॉबर्ट मर्टन आणि निसबेट

५) केस

६) विल्यम स्कॉट : **William Scoot.**

## १.५ सरावासाठीचे प्रश्न (दीर्घोत्तरी प्रश्न )

१) सामाजिक समस्यांचे स्वरूप स्पष्ट करा.

२) सामाजिक समस्यांच्या वर्गीकरणाची चर्चा करा.

३) सामाजिक समस्यांच्या अध्ययनाची गरज याविषयी चर्चा करा.

## १.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) जी. एल. शर्मा : सामाजिक मुद्दे, २०१७. रावत पब्लिकेशन जयपुर.

२) राम आहुजा : सामाजिक समस्या २०००, रावत पब्लिकेशन,जयपुर.

३) राम आहुजा : सोशल प्रॉब्लेम इंन  इंडिया, रावत पब्लिकेशन, जयपुर.

४) राजविवेक एस. : समकालीन भारतीय मुद्दे (समस्या एवं समाधान), २०१३-१४ सिविल सर्विसेस, टाइम्स न्यू दिल्ली.

❑❑❑

# घटक – २

# सामाजिक – आर्थिक समस्या

# (Socio - Economic Problems)

## अनुक्रमणिका

३.० प्रस्तावना

३.१ उद्दिष्टे

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ दारिद्र्य : अर्थ, कारणे आणि उपाययोजना

    दारिद्र्याची संकल्पना/अर्थ

  ३.२.२ बेरोजगारी : अर्थ, कारणे आणि उपाययोजना

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठीचे प्रश्न

३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

### ३.१ प्रस्तावना ( Introduction) :

या प्रकरणामध्ये आपण सामाजिक–आर्थिक समस्या/मुद्दे म्हणून दारिद्र्य व बेरोजगारी या दोन समस्यांचा आढावा घेणार आहोत. या दोन्हीही समस्या भारताच्या सामाजिक–आर्थिक समस्या आहेत. त्यात प्रामुख्याने दारिद्र्य हा भारतीय समाज व्यवस्थेचा स्थायीभाव असलेला दिसून येतो. भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये दारिद्र्य ही एक प्रमुख समस्या म्हणून समाविष्ट झाली आहे. दारिद्र्याचे स्वरूप केवळ आर्थिक नसून ते राजकीय–मानसिक, श्रमिक, वैज्ञानिक, सामाजिक अशा घटकांवर अवलंबून असते. दारिद्र्याचा परिणाम हा व्यक्तीचे आरोग्य, तिचे राहणीमान, शिक्षणाचे प्रमाण, सामाजिक परिस्थिती यासारख्या बहुतेक सर्वच घटकांवर होत असतो. समाजातील प्रमुख सामाजिक–आर्थिक प्रश्न म्हणून या घटकांत आपण दारिद्र्याचा अर्थ, दारिद्र्याची कारणे व दारिद्र्य

निर्मुलनासाठी उपाय यांचा अभ्यास करणार आहोत.

तसेच दुसरी सामाजिक-आर्थिक समस्या म्हणून बेरोजगारी या समस्येचा अभ्यास करणार आहोत. भारतीय अर्थव्यवस्थेसमोर निर्माण झालेल्या समस्यामुळे देशाच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होतो आणि या सर्व समस्यांचे मूळ बेरोजगारीत आढळते. भारत देशात शेती, उद्योग व सेवा क्षेत्रात पुरेशा प्रमाणात रोजगार संधी निर्माण न होऊ शकल्याने देशातील बेरोजगारीचे प्रमाण वाढत गेले. ११ व्या पंचवार्षिक योजनाकाळात देशातील उपलब्ध श्रमशक्तीपैकी ८.२ कोटी लोक बेरोजगार होते. बेरोजगारीमुळे व्यक्तीचे उत्पन्न, उत्पादकता, आरोग्य व मानसिकतेवर प्रतिकूल परिणाम होतात. त्याचा परिणाम समाज व्यवस्था व अर्थव्यवस्थेवर होतो. म्हणून एक प्रमुख सामाजिक-आर्थिक प्रश्न म्हणून या घटकात आपण बेरोजगारीचा अर्थ, बेरोजगारीची कारणे व बेरोजगारीवरील उपाय-योजना यांचा अभ्यास करणार आहोत. या घटकांच्या अभ्यासामुळे दारिद्र्य व बेरोजगारी या दोन प्रमुख समस्यांच्या अभ्यासाला मदत होणार आहे.

### ३.२ उद्दिष्टये (Objectives) :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास

१) दारिद्र्याची संकल्पना, कारणे आणि उपाययोजना समजून घेता येईल.

२) बेरोजगारीचा अर्थ आणि उपाययोजना समजून घेता येईल.

### ३.२ विषय विवेचन (Presentation of Subject Matter) :

भारतीय समाजातील सामाजिक-आर्थिक समस्या म्हणून दारिद्र्य व बेरोजगारी या दोन समस्यांचा अभ्यास या घटकात करणार आहोत. दारिद्र्य ही एक गंभीर सामाजिक समस्या आहे. मनुष्याच्या प्रमुख मुलभूत गरजा यामुळे पूर्ण होत नाहीत. सर्वसामान्य जीवन जगताना अनेक मुलभूत गोष्टींची कमतरता दारिद्र्यामुळे निर्माण होत असते. या घटकात आपण दारिद्र्याची संकल्पना, दारिद्र्याची कारणे व दारिद्र्य निर्मुलनाचे उपाय यांचा अभ्यास करणार आहोत. यामुळे आपणास दारिद्र्याची संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होईल.

बेरोजगारी ही एक प्रमुख सामाजिक समस्या आहे. बेरोजगारी, दारिद्र्य, गुन्हेगारी, व्यसनाधिनता अशा अनेक समस्यांना चालना देऊ शकते. बेरोजगारीमुळे सर्वसामान्य आर्थिक जीवन जगणेही शक्य नसते त्यामुळे या घटकात आपण बेरोजगारीचा अर्थ, बेरोजगारीची कारणे व बेरोजगारीवरील उपायांचा अभ्यास करणार आहोत. या अभ्यासामुळे आपणास बेरोजगारीचे मुळ स्वरूप स्पष्ट होण्यास मदत होईल.

### * दारिद्र्याची समस्या :

दारिद्र्य ही आर्थिक समस्या आहे. त्याचप्रमाणे सामाजिक समस्यादेखील आहे. दारिद्र्य किंवा गरीबी व्यक्तीला मिळणाऱ्या अत्यल्प उत्पन्नामुळे निर्माण होते. उलट कमी असल्यामुळे व्यक्ती आपल्या जीवनावश्यक गरजांची पूर्तता करू शकत नाही. सामान्यपणे ज्यांना आपल्या मुलभूत स्वरूपाच्या जीवनावश्यक अशा गरजांची

पूर्तता करता येत नाही. अशांचा समावेश 'दरिद्री व्यक्ती' या सदरात करावा लागतो. या समाजातील बहुसंख्य लोकांना किमान पातळीवरचे आर्थिक जीवन जगता येत नाही. अशा समाजाला 'दरिद्री समाज' म्हणता येईल.

विसाव्या शतकातील ज्या समस्येने अर्थतज्ञ व समाजशास्त्रज्ञांचे सर्वाधिक लक्ष वेधले आहे आणि ज्या समस्येची सोडवणूक योग्य प्रकारे केली गेली नाही तर सर्वांच्या चिंतेची व चिंतनाची समस्या बनणार आहे ती समस्या म्हणजे दारिद्र्याची समस्या होय. दारिद्र्याची समस्या निर्माण होण्यास आर्थिक कारणांबरोबरच सामाजिक कारणेदेखील जबाबदार आहेत. दारिद्र्याच्या समस्येतून गुन्हेगारी, व्यसनाधिनता, आत्महत्या, भिक्षावृत्ती, अनारोग्य अशा अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. म्हणून समाजशास्त्रज्ञांच्या मते, दारिद्र्य ही केवळ आर्थिक समस्या नाही तर ती एक सामाजिक समस्या देखील आहे. दारिद्र्यातून व्यक्तिगत आणि सामाजिक विघटनाला चालना मिळू शकते. म्हणून दारिद्र्य ही गंभीर सामाजिक समस्या आहे. यानंतर आपण दारिद्र्याची संभाव्यता, कारणे व उपायांचा अभ्यास करणार आहोत.

*** दारिद्र्याची संकल्पना/अर्थ :**

दारिद्र्य ही एक सामाजिक आर्थिक समस्या आहे. त्यामुळे तिचा अभ्यास समाजशास्त्राबरोबर अर्थशास्त्रातही केला जातो. व्यक्तीचे एकूण उत्पन्न, खर्च, उपभोग, मुलभूत गरजा आणि उत्पन्नाची साधने यामुळे अर्थशास्त्रात दारिद्र्याचा विचार होतो. तर व्यक्तीचे राहणीमान, शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, सामाजिक संबंध, सामाजिक दर्जा व सामाजिक संरचना यावर एकूण सांपत्तिक स्थितीचा प्रभाव पडत असल्यामुळे समाजशास्त्रात ही समस्या महत्त्वाची मानली जाते. प्रत्येक व्यक्तीला जीवंत राहण्यासाठी किंवा सामान्य जीवन जगण्यासाठी काही आवश्यक गरजांची पूर्तता होणे महत्त्वाचे आहे. मोटार, स्कूटर, फ्रिज, टी. व्ही., मनोरंजन या गोष्टी आवश्यक आहेत. परंतु या वस्तू जीवनावश्यक नाहीत. व्यक्तीला आपल्या जीवनाचा एक किमान स्तर टिकवून ठेवण्यासाठी अन्न, वस्त्र आणि निवारा या गोष्टी आवश्यक असतात. जेव्हा स्वत: व्यक्ती आणि तिच्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या या आवश्यक गरजांची पूर्तता होत नाही. त्यामुळे व्यक्तीला किमान आर्थिक पातळीवरचे जीवन देखील जगता येत नाही. तेव्हा या अवस्थेस 'दारिद्र्य' असे म्हणतात.

अनेक विचारवंतांनी दारिद्र्याची समस्या व संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. सामान्यपणे दारिद्र्य ही एक अशी स्थिती आहे, कि जी एखाद्याकडे काय आहे व काय असावे, याबाबतीत विसंगती निर्माण करते. हेन्री बरस्टेन यांनी दारिद्र्याचे निदर्शक मांडले आहेत. त्यात प्रामुख्याने उपजिवीकेच्या साधनांची कमतरता, पैसा-जमीन यासारख्या साधनसंपत्तीचा अभाव, असुरक्षिततेची व नैराश्याची भावना तसेच साधन-संपत्तीच्या अभावामुळे सामाजिक संबंधात येणारे अडथळे इ. गोष्टी निदर्शक मांडल्या आहेत. दारिद्र्याच्या संदर्भात आर्थिक दृष्टीकोनातून अर्थशास्त्रज्ञांनी व्याख्या दिल्या आहेत. त्याचप्रमाणे गिलिन व गोडार्ड यांनी समाजशास्त्रीय दृष्टीने व्याख्या दिल्या आहेत. सामाजिक समस्या या दृष्टीने दारिद्र्याचा अभ्यास करीत असताना या व्याख्या लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

### ※ दारिद्र्याची व्याख्या :

**१) गिलीन आणि गिलीन :** ''दारिद्र्य ही एक अशी परिस्थिती आहे की, ज्यामुळे कोणतीही व्यक्ती अपुरे उत्पन्न किंवा गैरवाजवी खर्चामुळे स्वत:चा जीवनस्तर उंचावू शकत नाही. व्यक्ती स्वत:ची मानसिक तंदुरूस्ती टिकवून ठेवू शकत नाही. तसेच ते ज्या समाजाचे सदस्य आहेत त्या समाजाच्या जीवनमुल्याप्रमाणे योग्य प्रकारे काम करू शकत नाहीत. ''

**२) गोडार्ड :** ''एक व्यक्ती आणि तिच्यावर अवलंबून असणारे इतर लोक यांचे स्वास्थ्य, आरोग्य व त्यांची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तुंचा अपुरा पुरवठा म्हणजे दारिद्र्य होय.''

**३) मायकेल हॅरिंग्टंन :–** ''विशिष्ट समाजातील मुल्ये, विश्वास आणि प्रचलित तंत्रज्ञानाशी मिळत्या–जुळत्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण आणि मनोरंजनापासून वंचित असणे म्हणजे दारिद्र्य होय.''

**४) अमर्त्य सेन :–** ''एखाद्या व्यक्तिला त्यांनी जोपासलेल्या मुल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्र्य होय.''

**५) ॲडम स्मिथ :–** ''ज्या व्यक्ती उत्तम प्रकारे जीवन जगण्यासाठी आवश्यक वस्तूंचा पुरवठा करता येत नसल्यामुळे गुणवत्ताहीन वस्तुंवर जगतात त्यांना दरिद्री असे म्हणतात.''

वरील व्याख्येवरून दारिद्र्याचा अर्थ स्पष्ट होतो. दारिद्र्य ही अशी परिस्थिती किंवा अवस्था असते की, ज्यावेळी व्यक्तीच्या उत्पन्नामध्ये व्यक्ती स्वत:च्या आणि आपल्या कुटुंबातील सदस्यांच्या आवश्यक गरजांची पूर्तता करू शकत नाहीत. त्यामुळे व्यक्ती व तिच्या कुटुंबातील सदस्य किमान आर्थिक जीवन व्यतित करू शकत नाहीत. दारिद्र्यामुळे लोकांना आपल्या मुलभूत गरजादेखील पूर्ण करता न आल्याने जीवनाचा एक न्यूनतम स्तर देखील टिकवून ठेवता येवू शकत नाही. त्यामुळे, अशा लोकांना योग्य आहार, पुरेशी जीवनसत्त्वे, प्रथिने व उष्मांक मिळत नसल्याने त्यांचे आरोग्य धोक्याचे बनते. त्यामुळे दारिद्र्य ही गंभीर सामाजिक समस्या आहे.

### दारिद्र्याचे प्रकार :

जगातील अनेक देशांत मोठ्या प्रमाणात दारिद्र्य आहे. या दारिद्र्याचे मोजमाप करणे सोपे नाही. वरील व्याख्येवरून दारिद्र्याचा अर्थ स्पष्ट होतो. मात्र, निरपेक्ष दारिद्र्य व सापेक्ष दारिद्र्य या दोन संकल्पना अभ्यासल्यानंतर दारिद्र्याचा अर्थ स्पष्ट होईल.

**१) निरपेक्ष दारिद्र्य :–** व्यक्तीला आपल्या किमान मुलभूत गरजा भागविण्यासाठी काही किमान उत्पन्न मिळणे गरजेचे असते. जर त्या व्यक्तीचे उत्पन्न किमान पातळीपेक्षाही कमी असेल तर ती व्यक्ती निरपेक्ष दृष्टीने दरिद्री समजली जाते. दारिद्र्यरेषा निश्चित करताना किमान मुलभूत गरजा किंवा किमान राहणीमानाची पातळी निश्चित केली जाते. याचाच अर्थ दारिद्र्यरेषा निश्चित करावी लागते. दारिद्र्य रेषेच्याखाली उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीला गरीब मानले जाते. व्यक्तीला किती कॅलरीज अन्न मिळाले पाहिजे, किमान वस्त्र व निवारा यांची

उपलब्धता झाली पाहिजे हे त्यांच्या किमान मुलभूत गरजांच्या निश्चितीसाठी आवश्यक असते. या किमान गरजा भागविण्यासाठी किती खर्च लागेल हे दारिद्र्यरेषेच्या निश्चितीने ठरविले जाते. अशाप्रकारे निरपेक्ष दारिद्र्यामुळे दरडोई उत्पन्न, दरडोई उपभोग खर्च, अन्नधान्याचा दरडोई उपभोग, व्यक्तीला मिळणाऱ्या दरडोई कॅलरीज इत्यादींची कल्पना येते.

**२) सापेक्ष दारिद्र्य :–** समाजातील आर्थिक स्तरावरील असमानता किंवा विषमतेवर सापेक्ष दारिद्र्य अवलंबून असते. एक व्यक्ती किंवा गटाच्या आर्थिक क्षमतेची तुलना जेव्हा दुसऱ्या व्यक्ती किंवा गटाशी केली जाते तेव्हा परस्पर तुलनेच्या आधारे कमी किंवा निम्न स्तरातील उत्पन्न गटातील व्यक्ती किंवा समुहाला दरिद्री मानले जाते. यालाच 'सापेक्ष दारिद्र्य' म्हटले जाते. उदा– 'अ' नावाच्या उद्योगपतीकडे ५० लाख रू. ची कार आहे. सापेक्ष अर्थाने 'ब' नावाचा उद्योगपती स्वत:ला 'अ' नावाच्या उद्योगपतीपेक्षा गरीब मानतो. अमेरिकेतील गरीबांचे उत्पन्न देखील भारतीय मध्यम वर्गीयापेक्षा जास्त आढळते. ही सापेक्ष दारिद्र्याची उदाहरणे आहेत. दारिद्र्य ही संकल्पना खऱ्या अर्थाने श्रीमंत–गरीब या भेदावरून ठरत असली तरी 'सापेक्ष दारिद्र्य' ही संकल्पना दारिद्र्याचे निश्चित स्पष्टीकरण करण्यास असमर्थ ठरते.

**दारिद्र्य रेषा** (Poverty Line) **:**

दारिद्र्याची संकल्पना नेमकी स्पष्ट होण्यासाठी दारिद्र्यरेषेचा वापर केला जातो. प्रत्येक व्यक्तीला तिच्या शरीरासाठी आवश्यक असणारे उष्मांक (Calories) देणाऱ्या आहारासाठी महिन्याला जो मासिक उपभोग खर्च येतो. यावरून दारिद्र्यरेषा निश्चित केली जाते. म्हणजेच किमान जीवन जगण्यासाठी मुलभूत प्राथमिक वस्तू व सेवांची उपभोग खर्चाची कमीत–कमी पातळी ज्या रेषेने दर्शविली जाते तिला 'दारिद्र्य रेषा' म्हणतात. एखाद्या कुटुंबाला महिन्याकाठी किमान आवश्यक असणाऱ्या अन्न, वस्त्र, निवारा, पाणी, शिक्षण, आरोग्य इत्यादी वस्तुंचे प्रमाण ठरविले जाते. नंतर त्याच किंमतीत रूपांतर करून जगण्यासाठी किती किमान रक्कम आवश्यक आहे हे निश्चित केले जाते. ती निश्चित रक्कम दारिद्र्य रेषा निश्चित करते. ज्यांचे उत्पन्न या रक्कमेपेक्षा कमी आहे. अशी व्यक्ती दारिद्र्यरेषेखाली आहे असे मानले जाते.

दारिद्र्याचे मापन करण्यासाठी काही निकष ठरवून त्या आधारे दारिद्र्याची पातळी ठरविली जाते. ते निकष पुढीलप्रमाणे आहेत.

**(अ) दरडोई उष्मांकाचे सेवन :–** डॉ. वि. म. दांडेकर यांनी हा निकष मांडला. मनुष्याला जगण्यासाठी उष्मांकांची (Calories) गरज असते. उष्मांकाच्या आधारे दारिद्र्यरेषा निश्चित करता येते. योजना आयोगाच्या मते ग्रामीण भागात प्रत्येक व्यक्तीला रोजच्या आहारातून २४०० उष्मांक प्रत्येक दिवशी तर शहरी भागात २१०० उष्मांक प्रत्येक दिवशी मिळाले पाहिजेत. म्हणून ज्यांना एवढा उष्मांक मिळत नाही त्यांना दरिद्री समजले जाते.

**(ब) दरडोई उपभोग खर्च :–** अर्थशास्त्रज्ञांच्या मते, प्रत्येक व्यक्तीला अन्नाबरोबरच वस्त्र, निवारा, आरोग्य, मनोरंजन अशा बाबींची गरज असते. त्यामुळे दारिद्र्यरेषा निश्चित करताना उष्मांकाबरोबरच या बाबींचा

विचार करणे महत्त्वाचे आहे.

**(क) दरडोई उत्पन्न :–** डॉ. रथ यांनी दरडोई उत्पन्नाचा निकष वापरून एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या देशातील लोकसंख्येने भाग दिल्यास दरडोई उत्पन्न मिळते. डॉ. दांडेकर व रथ यांनी दरडोई उत्पन्नाच्या निकषावरून १९६८–६९ मध्ये दारिद्र्यरेषा निश्चित केली.

**(ड) राहणीमानाचा दर्जा :–** एखादी व्यक्ती आवश्यक सुखसोई किती प्रमाणात पूर्ण करते त्यावर व्यक्तीचे राहणीमान अवलंबून असते. अपुरे अन्न, हलके कपडे, अयोग्य निवास, कमकुवत आरोग्य, आजारपण ही निम्न राहणीमानाची लक्षणे आहेत. ही लक्षणे दरिद्री लोकात आढळतात. दारिद्र्याचे मोजमाप करण्यासाठी हा निकष योग्य वाटला तरी लोकांचे राहणीमान दर्जाचे मोजमाप करणे कठीण आहे.

वरील सर्व दारिद्र्य निश्चितीचे निकष विचारात घेतल्यास असे दिसून येते की, ज्या व्यक्तींना किमान आर्थिक पातळीवरचे जीवन जगता येत नाही त्यांना 'दरिद्री' म्हटले जाते. त्यात त्या व्यक्तीचे दरडोई उष्मांकाचे सेवन, दरडोई उत्पन्न व दरडोई उपभोग खर्च व एकूण राहणीमान याचा विचार करून दारिद्र्यरेषा निश्चित केली जाते.

वरीलप्रमाणे आपण दारिद्र्याचा अर्थ, व्याख्या, प्रकार व दारिद्र्य रेषा याचा अभ्यास करून दारिद्र्याची संकल्पना समजून घेतली आहे.

**दारिद्र्याची कारणे :**

दारिद्र्याच्या कारणांचा विचार वेगवेगळ्या दृष्टीकोनातून केला जातो. सर्व सामाजिक समस्यांमध्ये दारिद्र्य ही एक गंभीर सामाजिक–आर्थिक समस्या आहे. पारंपरिक समाजात दारिद्र्याकडे एक शाप म्हणून पाहिले जात होते. मात्र, आधुनिक समाजात व्यक्तीला रोजगार मिळविण्यात आलेले अपयश, आर्थिक विषमता, संधीचा अभाव, शिक्षणाचा अभाव, अन्याय अशा अनेक अर्थाने दारिद्र्याकडे पाहिले जाते. व्यक्तीगत जीवन व सामाजिक परिस्थिती या दृष्टीकोनातून दारिद्र्याच्या कारणांचा आढावा घ्यावा लागेल. दारिद्र्य समस्या सोडविण्यासाठी अनेक शासकीय प्रयत्न, शोध व संशोधकाकडून प्रयत्न झाले आहेत. त्यात प्रामुख्याने डेव्हिड एल्श व राम आहुजा यांनी दारिद्र्याच्या कारणांचा आढावा घेतला आहे. त्याचा आपण विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

**(अ) डेव्हिड एल्श :** यांनी दारिद्र्याची व्यक्ती, संस्कृती किंवा उपसंस्कृती आणि समाजरचना अशी तीन कारणे सांगितली आहेत ती पुढीलप्रमाणे.

**१) व्यक्ती :–** व्यक्तीच्या व्यक्तिगत जीवनावर आधारीत व्याप्तीसाठी जी विचारसरणी सांगितली जाते त्यावरून दारिद्र्य निश्चित होवू शकते. सर्वसाधारणपणे व्यक्तीचे कौशल्य, कार्यक्षमता, प्रयत्नशीलता, ध्येयवादी वृत्ती, नकारात्मक दृष्टीकोन, मिळणारी संधी अशा अनेक गोष्टीवर व्यक्तीचे यश–अपयश अवलंबून असते. मात्र व्यक्तीने आर्थिक स्थिती सुधारण्याचे प्रयत्न न करणे, आळशी असणे, निर्णय क्षमतेचा अभाव, आलेली संधी सोडून देणे, दैववादी असणे अशा विविध बाबींमुळे व्यक्तीची आर्थिक स्थिती दरिद्री बनते. म्हणजेच व्यक्ती

दारिद्र्यासाठी कारणीभूत ठरते.

**२) दारिद्र्याची संस्कृती अथवा उपसंस्कृती :–** समाजातील व्यक्तींच्या राहणीमानाचे स्वरूप कसे आहे याच्याशी दारिद्र्याचा संबंध येतो. समाजातील अनेक लहान–मोठ्या समुहातील अनेक व्यक्ती कपडे, राहणीमान, विचार श्रद्धा व जीवनमुल्यात सहजासहजी बदल करीत नाहीत. उलट आहे त्या परिस्थितीत राहण्याचा प्रयत्न करतात. त्यांना ते राहणीमान सुरक्षित वाटते. 'ऑक्सर लुईस' यांनी १९५९ मध्ये मेक्सिकोमधील झोपडपट्टयात केलेल्या अभ्यासात असे आढळून आले की, गरीब लोक आपले राहणीमान बदलू नये म्हणून आपल्या आर्थिक दर्जात बदल करण्याचे टाळतात आणि त्यामुळेच अशा व्यक्ती नेहमीच दारिद्र्यात राहतात. म्हणजेच गरीबांची जीवन जगण्याची स्वत:ची संस्कृती अथवा उपसंस्कृती असते. त्यामुळेच लुईस यांनी गरीबांच्या प्रतिकूल जीवन जगण्याच्या पद्धतीला दारिद्र्याची संस्कृती म्हटले आहे. अशाप्रकारे गरीबांना त्यांचे स्वत:चे एक प्रकारचे राहणीमान असते व ते टिकविण्याचा प्रयत्न देखील केला जातो. यालाच दारिद्र्याची संस्कृती/उपसंस्कृती म्हटले जाते.

**३) समाज रचना :–** आधुनिक समाजशास्त्रज्ञ समाज रचना हे दारिद्र्याचे कारण मानतात. समाजातील गरीबीला पोषक सामाजिक परिस्थिती, बेरोजगारी, कमी वेतनावर करावे लागणारे काम, कुशल मनुष्यबळाचा अभाव, कौशल्यांचा अभाव, पारंपरिक व्यवसाय व समाजातील सामाजिक संस्था यामुळे दारिद्र्य कमी होत नाही. समाजातील काही घटक आपल्या सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय स्वार्थासाठी दारिद्र्याची परिस्थिती टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. उदा. भारतात अनेकवेळा विविध राजकीय पक्ष दारिद्र्य निर्मुलनासाठी विशेष प्रयत्न करीत नाहीत. कारण दारिद्र्यात असणारा वर्ग त्यांना मतदानासाठी सहजपणे वापरता येवू शकतो. म्हणजेच दारिद्र्य असणारी एक विशिष्ट समाज रचना टिकवून ठेवण्याचा केला गेलेला प्रयत्न हे दारिद्र्याचे एक प्रमुख कारण आहे.

**(ब) राम आहुजा :** यांनी दारिद्र्याची आर्थिक, लोकसंख्यात्मक व सामाजिक कारणे सांगितली आहेत. ती पुढीलप्रमाणे.

**१) आर्थिक कारणे :–** सामान्यपणे दारिद्र्याची आर्थिक कारणे संबंधित असतात. व्यक्तीचे उत्पन्न, कार्यक्षमता व राहणीमानाचा दर्जा अशा घटकांवर दारिद्र्याचे स्वरूप निश्चित होत असते. व्यक्तीचा आर्थिक दर्जा ठरवणारे घटक पुढीलप्रमाणे आहेत.

**(अ) अपुरा विकास :**

भारतातील दारिद्र्याला सर्वच क्षेत्रातील अपुरा विकास हे आर्थिक कारण जबाबदार आहे. विविध पंचवार्षिक योजना तसेच राज्यांचे विविध प्रकल्प याद्वारे देशात विकासाचे विविध प्रकल्प राबविण्यात आले तसेच दारिद्र्यातील व्यक्तींचा आर्थिक दर्जा सुधारण्यासाठी विविध कार्यक्रम आखले गेले होते. यातील अनेक कार्यक्रमाला आलेले अपयश दारिद्र्य कारणीभूत ठरले आहे. अर्थव्यवस्थेचा विकास होण्यासाठी औद्योगिक उत्पन्न वाहतूक आणि दळणवळण साधनांत वाढ, रोजगार व्यवसायाचा विकास, लघुउद्योगांना चालना,

कर्जपुरवठा, अनुदान, शेती क्षेत्राचा विकास, सेवा क्षेत्राचा विस्तार तसेच मानवी साधनसंपत्तीचा विकास अशा घटकांचे योगदान आवश्यक असते. याबरोबरच आर्थिक विकासाच्या विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी शासकीय पातळीवर दूरदृष्टी व उदासीनतेचा अभाव असणे गरजेचे असते अन्यथा दारिद्र्याचे प्रमाण वाढत जाते.

**२) वाढती महागाई व भांडवलाचा अभाव :–** अपुरा पुरवठा व वाढती मागणी यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढतात. याबरोबरच अन्य कारणांनी महागाई वाढते. याचा परिणाम कनिष्ठ आर्थिक स्तरातील लोकांना जीवनावश्यक वस्तू मिळवण्यासाठी स्वत:चे उत्पन्न अपूरे ठरते. यातून दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येत वाढ होते. व्यक्तिगत पातळीवर अपूरे आर्थिक उत्पन्न जसे दारिद्र्याला कारणीभूत ठरते तसेच देशाच्या पातळीवर अपुरे भांडवल समाजाच्या विकासात अडथळा बनते. भारतात निर्यातीचे प्रमाण हे आयातीपेक्षा कमी आहे. निर्यातीचे प्रमाण कमी असल्याने परकीय चलनाचा अभाव निर्माण होतो. आयातीसाठी कर्जे काढावी लागतात. देशांतर्गत आर्थिक विकास व निर्यात वाढीसाठी औद्योगिक क्षेत्रात वाढ करणे आवश्यक असते. मात्र अपुऱ्या भांडवलामुळे औद्योगिक क्षेत्र, सेवा क्षेत्र तसेच इतर क्षेत्रात वाढ न झाल्याने अशा समाजात गरीबी वाढत जाते.

**३) कुशल मनुष्यबळाचा अभाव :–** जेव्हा व्यक्तीजवळ योग्य व रोजगाराभिमुख शिक्षण, पात्रता आणि कौशल्य यासारख्या घटकांचा अभाव असतो तेव्हा अशा व्यक्ती योग्य स्वरूपाचा रोजगार मिळवण्याच्या दृष्टीने असमर्थ ठरतात. तसेच औद्योगिक क्षेत्र, सेवा क्षेत्र व शेतीक्षेत्रात रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने योग्य संधी लोकांना उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. बेरोजगारी आणि अल्प स्वरूपाची रोजगारी याचा देशाच्या आर्थिक वाढीवर परिणाम होत असतो. आज भारतात कुशल मनुष्यबळास पुरेश्या नोकऱ्या उपलब्ध नाहीत. भांडवलाच्या अभावामुळे स्वयंरोजगार तसेच लघुउद्योग निर्माण करता येत नाहीत. त्यामुळे अकुशल मनुष्यबळाबरोबरच कुशल मनुष्यबळास देखील दारिद्र्यात जीवन जगावे लागत आहे.

**४) बेकारीत वाढ :–** भारतात जेव्हा यांत्रिकीकरण सुरू झाले तेव्हा पारंपरिक हस्तव्यवसाय, कुटीरोद्योग यावर परिणाम होवून अनेक कारागीर बेकार झाले. पुढे स्वातंत्र्योत्तर काळात शेतीचे यांत्रिकीकरण होऊ लागल्याने शेतातील रोजगार कमी होवून शेतमजूर बेकार झाले. शहरात औद्योगिक क्षेत्रात वाढ झाली. मात्र, ज्या तुलनेत औद्योगिक क्षेत्रात वाढ न झाल्याने लाखो तरूण बेकार आहेत. याशिवाय स्वयंचलित यंत्रे, संगणकीकरण यामुळे देखील कामगारांना बेकार व्हावे लागत आहे. तसेच रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक आहे. त्या वेगाने होत नसल्याने बेकारी प्रचंड प्रमाणात वाढून दारिद्र्याचे प्रमाण वाढत आहे.

**५) पारंपरिक शेती व्यवसाय :–** भारत हा शेतीप्रधान देश आहे. आजही ६५ टक्के लोक या व्यवसायावर अवलंबून आहेत. या लोकसंख्येत अत्यल्प शेती असणारे व शेतमजुरांचे प्रमाण सर्वाधिक आहे. शेतीत अत्यल्प उत्पन्न व केवळ सुगीच्या वेळीच मिळणारे काम यामुळे अल्पभूसंधारक व शेतमजूर गरीब राहतात. तसेच जी शेती केली जाते ती परंपरागत व नैसर्गिक लहरीवर आधारीत असल्याने दारिद्र्यात भर पडते. याबरोबरच शेती व शेतकऱ्यांविषयी अपुऱ्या योजना, सुधारीत बी–बियाणे व खते यांचा अभाव, तंत्रज्ञानचा अभाव, अपुरे भांडवल, बाजारपेठांचे अज्ञान, हमीभावाची अशाश्वती अशा अनेक बाबींमुळे शेती व्यवसायात आर्थिक विकासाची गती मंद राहिली आहे. परिणामी पारंपरिक शेती हे दारिद्र्याचे प्रभावी कारण बनले आहे.

**(क) लोकसंख्यात्मक कारणे :**

भारतात लोकसंख्येची होणारी प्रचंड वाढ दारिद्र्याला कारणीभूत ठरत आहे. कारण लोकांच्या मुलभूत गरजांवर होणारा खर्च सातत्याने वाढत आहे. या मुलभूत गरजांच्या किंमतीवर लोकसंख्यात्मक घटकांचा परिणाम होवून समाजातील बहुसंख्य लोक गरीबीतच राहत आहेत. आज लोकसंख्येच्या वाढत्या प्रभावामुळे समाजाचा किमान विकास, रोजगार संधी, शिक्षण, आरोग्य व निवासाच्या सोई लोकांना मिळत नाहीत. आज कुटुंबात एकाच मिळवत्या व्यक्तीवर आधारीत असणाऱ्यांची संख्या वाढत असल्याने त्याचा परिणाम कुटुंबातील आरोग्य, शिक्षण व राहणीमानावर झाला आहे.

वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक बाबी दुर्मिळ होत चालल्या आहेत. दारिद्र्यामुळे लोकांना योग्य व पुरेसा आहार मिळत नाही. दूषित वातावरणात रहावे लागते. लोकांचे आरोग्य व कार्यक्षमतेवर त्याचा परिणाम होवून आर्थिक उत्पन्न घटते. दारिद्र्य व आरोग्याचा जवळचा संबंध आहे आणि आर्थिक उत्पन्नाचा शिक्षणाशी संबंध आहे. त्यामुळे कमी उत्पन्नामुळे शिक्षण नाही, शिक्षण नसल्याने रोजगार नाही, रोजगार नसल्याने गरीबी वाढते. म्हणूनच लोकसंख्यात्मक घटक गरीबीला कारणीभूत ठरतात.

**(ड) सामाजिक कारणे :**

समाजातील अंधश्रद्धा, दैववाद, परंपरावाद, जातीयवाद, सांप्रदायिकता व प्रादेशिकवाद अशा अनेक कारणांमुळे देखील गरीबांचे प्रमाण वाढत जाते. या सामाजिक घटकांमुळे व्यक्तीची मानसिकता संकुचित व पूर्वग्रहदूषित बनते याचा परिणाम व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर व दृष्टीकोनावर होवून गरीबी वाढते. अनेक वेळा दैववाद व परंपरेमुळे लोकांच्यात स्थितीशीलता येते. यामुळे लोक प्रयत्नवादी बनत नाहीत. जातीव्यवस्थेमुळे व्यक्तिगत गुणवत्तेपेक्षा जातीचे व्यवसाय करण्यास प्राधान्य दिले गेले. पारंपरिक व्यवसायामुळे नवीन तंत्र व मंत्राचा वापर केला गेला नाही. त्यामुळे केवळ जगण्याच्या गरजा पूर्ण करण्याला प्राधान्य दिले गेले. धर्म व प्रथा-परंपरेच्या प्रभावामुळे समाज स्थितीशील बनला. संयुक्त कुटुंब पद्धतीमुळे निष्क्रियता व आळशी प्रवृत्ती वाढली. स्त्रियांना नेहमीच पुरूषांची मालमत्ता समजून शिक्षण व विकासापासून सुरू ठेवले गेले. याशिवाय दुसऱ्या प्रदेशात काम करता येणार नाही अशा अवास्तव भीतीमुळे लोकांची कार्यक्षमता कमी होते. अशा अनेक सामाजिक कारणांमुळे दारिद्र्य वाढत जाते.

**(इ) नैसर्गिक व इतर कारणे :**

महापूर, दुष्काळ, भूकंप, मृत्यू, नैसर्गिक साधनसंपत्तीची कमतरता, वाळवंटी प्रदेश, प्रतिकूल हवामान अशा कारणांमुळेदेखील गरीबी वाढत जाते. या बरोबरच सामाजिक विषमता, भांडवलाचा अभाव, भ्रष्टाचार, शेतजमिनीचे असमान वाटप, राज्यांच्या समतोल विकासात अडथळे, निरक्षरता, दोषपूर्ण शिक्षणव्यवस्था, आरोग्य सुविधांचा अभाव, विविध शासकीय योजनातील अपयश, आर्थिक विषमता अशा अनेक कारणांमुळे गरीबी वाढतच जाते.

अशा प्रकारे व्यक्तीगत, आर्थिक, सामाजिक, लोकसंख्यात्मक व नैसर्गिक कारणामुळे दारिद्र्याचे प्रमाण सातत्याने वाढत जात आहे.

***    दारिद्र्य निर्मुलनासाठी उपाय योजना :**

भारत देशात दारिद्र्याची समस्या गंभीर स्वरूप धारण करीत आहे. ही समस्या सोडविण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र व राज्य सरकारने अनेक प्रकारच्या शासकीय पातळीवर उपाय योजना अंमलात आणल्या आहेत. या योजनांच्या माध्यमातून प्रामुख्याने ग्रामीण व शहरी समुदायातील दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न होत आहे. त्या उपाय-योजना पुढीलप्रमाणे आहेत.

**(अ) शासकीय उपाययोजना :**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर गरीबी निर्मुलनासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. त्यात पंचवार्षिक योजना, राष्ट्रीयीकरण तसेच २० कलमी कार्यक्रमाद्वारे गरीबी निर्मुलनाचे प्रयत्न केले गेले. त्याबरोबरच पुढील योजना राबविण्यात आल्या आहेत.

**१) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP)**

**(Integrated Rural Development Programme) :-**

भारत सरकारने दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचे उत्पन्न वाढवणे, रोजगार उपलब्ध करून देणे, ग्रामीण कुटीरोद्योगांना चालना देणे, अनुसूचित जाती-जमातीच्या कुटुंबांचे उत्पन्नात वाढ करणे या प्रमुख उद्देशातून मार्च १९७६ मध्ये २० निवडक जिल्ह्यांमध्ये हा कार्यक्रम सुरू केला. पुढे २ ऑक्टोंबर १९८० पासून महात्मा गांधीच्या जयंतीनिमित्त सर्व देशांत हा कार्यक्रम लागू केला.

**२) किमान गरजा योजना (MNP) (Minimum Need Programme) :-**

ग्रामीण दारिद्र्य कमी करण्यासाठी १९७४-७५ पासून ही योजना सुरू केली. त्यात शिक्षण, पाणी-पुरवठा, आरोग्य, रस्ते, घरकुल, वीज, गलिच्छ वस्ती सुधारणा इ. किमान गरजांच्या पूर्ततेसाठी काही खर्चाची तरतूद करण्यात आली.

**३) गरीबी हटाव कार्यक्रम :-**

१९ मार्च १९७१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी 'गरीबी हटाव' कार्यक्रमाला प्रारंभ केला. १९७५ मध्ये गरीबी निर्मुलनाचा २० कलमी कार्यक्रम तयार करून त्याची अंमलबजावणी संपूर्ण देशात केली.

**४)    जवाहर रोजगार योजना :-**

दरिद्री कुटुंबातील किमान एका व्यक्तीस वर्षाकाठी ५० ते १०० दिवसासाठी त्याच्या घराजवळच रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी एप्रिल १९८९ मध्ये या योजनेची घोषणा करण्यात आली. या योजनेअंतर्गत ५०% काम महिलांसाठी राखीव ठेवून या योजनेची जबाबदारी ग्रामपंचायतीवर सोपविण्यात आली होती.

**५) महिला व बालविकास योजना :-**

ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण व बँकेकडून अर्थसहाय्य देण्यासाठी १९८२ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली. या योजने अंतर्गत गरोदर मातांचे पोषण, बालकांना पोषण आहार, आरोग्य तपासणी असे उपक्रम राबविण्यात आले.

**६) राष्ट्रीय ग्रामीण युवक स्व-रोजगार प्रशिक्षण योजना**

**(TRYSEM - Training of Rural Youth for Self Employment) :-**

ग्रामीण युवकांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देण्यासाठी ही योजना १५ ऑगस्ट १९७९ मध्ये सुरू करण्यात आली. कमी उत्पन्न गटातील बेरोजगार व्यक्तींना स्वत:चा उद्योग सुरू करता यावा यासाठी ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेत दारिद्र्यरेषेवरील अनुसूचित जाती-जमाती, महिला, अपंग यांना प्राधान्याने समाविष्ट करून विविध व्यवसायांचे प्रशिक्षण दिले गेले. याचा परिणाम ग्रामीण भागात अनेक तरूणांनी स्वत:चा रोजगार सुरू केला.

**७) ग्रामीण भूमिहीन रोजगार कार्यक्रम :-**

१९८३ पासून ग्रामीण भागात भूमिहीन शेतकरी, स्त्रिया, मागास जाती-जमातीच्या लोकांना रोजगाराची संधी देण्यासाठी हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम व ग्रामीण भूमिहीन रोजगार कार्यक्रम पुढे एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमात समाविष्ट केले गेले.

**८) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम :-**

१९७७ मध्ये ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांना रोजगार उपलब्ध करण्यासाठी हा कार्यक्रम सुरू झाला. मात्र १९८० मध्ये तो राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रमात समाविष्ट केला गेला.

**९) अंत्योदय अन्न योजना :-**

२५ डिसेंबर २००१ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना अन्न उपलब्ध करून देणे हा योजनेचा प्रमुख उद्देश होता.

**१०) इतर शासकीय योजना :-**

१ एप्रिल १९९९ रोजी स्वर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजना लागू करण्यात आली. तसेच १ डिसेंबर १९७७ पासून स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना सुरू करण्यात आली. याबरोबरच राष्ट्रीय सामाजिक सहकारी योजना (१५ ऑगस्ट १९९५), वाल्मीकी आंबेडकर आवास योजना (२००५), संजय गांधी निराधार योजना, अवर्षण भागासाठी कार्यक्रम, शेतीला बारमाही पाणीपुरवठा अशा अनेक योजना लागू करण्यात आल्या आहेत.

भारत सरकार व राज्य सरकारांच्या मार्फत अनेक शासकीय योजना लागू करण्यात आल्या. त्याचबरोबर राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा - २०१३, माध्यान्ह भोजन योजना - १९९५, सर्वांसाठी घर योजना, महात्मा गांधी

राष्ट्रीय रोजगार हमी कायदा, जनधन योजना, उज्वला गॅस योजना, मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया या योजनांना चालना देण्यात आलेली आहे. त्यातील काही योजना प्रभावशाली ठरल्या. मात्र, परिपूर्ण दारिद्र्य निर्मुलन या विविध योजनाद्वारे शक्य झाले नाही.

**(ब) इतर उपाय :**

दारिद्र्य निर्मुलनाच्या वरील शासकीय योजनांबरोबर खालील इतर उपायांचा आपण विचार करणार आहोत.

**१) लोकसंख्या नियंत्रण :–** वाढती लोकसंख्या अनेक समस्यांना कारणीभूत ठरते आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नवाढीस बाधा आणण्याचे काम वाढती लोकसंख्या करते. त्यामुळे लोकसंख्या नियंत्रणाचे कायदे करणे तसेच लोकसंख्यावाढीचे दुष्परिणाम लोकांना पटवून देणे, लोकसंख्या शिक्षण सक्तीचे प्राथमिक शिक्षण जाणीव–जागृती अशा उपायांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. लोकसंख्यावाढीमुळे महागाई, बेकारी, दारिद्र्य अशा समस्या निर्माण होतात म्हणून लोकसंख्या नियंत्रण करणे आवश्यक आहे.

**२) कृषिक्षेत्राचा विकास :–** भारतातील ६५% लोकसंख्या ग्रामीण समुदायात राहते. ग्रामीण समुदाय प्रामुख्याने शेती व शेतीपूरक व्यवसायावर आपले आर्थिक जीवन जगतो. त्यामुळे शेती विकास, सिंचन प्रकल्प, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, भांडवलाची उपलब्धता, हमीभाव, बाजारपेठा, मार्गदर्शन केंद्रे अशा विविध बाबींना चालना देवून कृषिक्षेत्राचा विकास केल्यास दारिद्र्य निर्मूलन शक्य होईल.

**३) रोजगार संधी :–** आज ग्रामीण, आदिवासी व शहरी समुदायात बेरोजगारी प्रचंड वाढली आहे. त्यासाठी विविध उद्योगधंदे व शेती क्षेत्रात वाढीला चालना देवून रोजगाराला संधी देणे गरजेचे आहे. लघुउद्योग, कुटिरोद्योग, ग्रामीण उद्योगांना आर्थिक मदत देणे. याबरोबरच रोजगार हमी योजना, स्वयंरोजगाराला प्रोत्साहन, प्रशिक्षण, कर्जपुरवठा, अनुदान देणे अशा पद्धतीने रोजगार संधी निर्माण करणे आवश्यक आहे.

**४) अभिवृत्तीत बदल :–** दारिद्र्याची समस्या ही संपूर्ण समाजाची समस्या आहे. शासन धोरणकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, प्रशासनातील नोकरवर्ग, जमीनदार अशा सर्वच समाज घटकांनी आपल्या अभिवृत्तीत बदल करून दारिद्र्य निर्मुलनासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. बेकारी आर्थिक विषमता व दारिद्र्य या प्रमुख समस्या सोडविण्यासाठी मानवतावादी दृष्टीकोनातून सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसेच प्रत्यक्षात दारिद्र्यात असणाऱ्या लोकांनी देखील आपली अभिवृत्ती बदलत प्रयत्नवादी बनले पाहिजे. शिक्षण, आरोग्य, प्रयत्नात सातत्य, कष्ट या मार्गाने दारिद्र्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला पाहिजे व यासाठी शासन व समाजाचेदेखील सहकार्य अपेक्षित आहे.

दारिद्र्य निर्मुलनासाठी सर्वात महत्त्वाचे म्हणजे विविध शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. तसेच समाजातील विविध घटकांना या योजनांची माहिती देणे, जाणीव–जागृती करणे यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. याशिवाय इतर उपायांचादेखील विचार महत्त्वाचा आहे. ज्यावेळी सर्वांना हा

प्रश्न गंभीर आहे याची जाणीव होईल व सर्वच समाजघटक त्यांच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न करतील त्यावेळी दारिद्र्य निर्मूलन शक्य होईल.

### २) बेरोजगारी (Unemployment) :

बेरोजगारीची समस्या जागतिक स्वरूपाची आहे. अविकसीत, विकसनशील, राष्ट्रांबरोबरच विकसीत राष्ट्रांतदेखील ही समस्या आढळते. कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेसमोर दारिद्र्य, आर्थिक विषमता आणि बेरोजगारी तीन प्रमुख समस्या असतात. मात्र, प्रत्येक देशातील बेरोजगारीचे स्वरूप एकसारखे असू शकत नाही. भारतातील बेरोजगारी ही प्रामुख्याने दारिद्र्य आणि औद्योगिक मागासलेपणाशी संबंधित आहे. तर विकसीत राष्ट्रातील बेरोजगारी ऐच्छिक, अनैच्छिक, संघर्षजन्य व संरचनात्मक स्वरूपाची असते. अप्रगत देशामध्ये तसेच भारतासारख्या देशात जी बेरोजगारी आढळते ती वस्तुंची मागणी कमी असल्यामुळे नसते. कारण अशा देशामध्ये सर्वच वस्तूंचा तुटवडा असतो. असे असूनही बेरोजगारी वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे भांडवलाचा अभाव, तसेच उद्योगधद्यांना आवश्यक असणाऱ्या मुलभूत सोयींचा अभाव असतो. त्यामुळे औद्योगिकरण, व्यापारवृद्धी, सेवाक्षेत्राचा विकास, शेतीक्षेत्राचा विकास करणाऱ्यांमध्ये अडथळा येतो. त्यामुळे दारिद्र्य आर्थिक विषमतेबरोबरच बेरोजगारी वाढते.

### बेरोजगारीचा अर्थ :

बेकारी आणि बेरोजगारी हे दोन्ही शब्द सर्वसामान्यपणे एकाच अर्थाने वापरले जातात. मात्र शास्त्रीय अर्थाने यात फरक आहे. सामान्यपणे बेकार हा शब्द नोकरीचा अभाव या अर्थाने वापरला जातो. म्हणून बेकारीपेक्षा बेरोजगारी हा शब्द निश्चित अर्थाने वापरला जातो. बेकारी ही ऐच्छिक असू शकते. परंतू बेरोजगारी मुख्यत: गरीबी व काम उपलब्ध नसण्याशी निगडीत असते. ज्या व्यक्तीमध्ये काम करण्याची क्षमता व इच्छा आहे तरीही त्याचा प्रचलित वेतनावर किंवा आर्थिक मोबदला मिळवून देणारे काम मिळत नाही अशी व्यक्ती म्हणजे बेरोजगार व्यक्ती होय. बेरोजगारी ही समाजाने लादलेली असते. ती अनैच्छिक, अवांछनीय असते.

'बेरोजगारी' ही संकल्पना अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. सामान्यपणे ही संकल्पना कर्त्या लोकसंख्येशी संबंधित आहे. कर्त्या लोकसंख्येत १५ ते ६० वर्षे वयोगटातील लोकसंख्येचा समावेश होतो. लहान मुले व वृद्धांचा बेरोजगारीशी संबंध नाही. सर्वसाधारणपणे देशात अस्तित्वात असलेल्या वेतनदारावर काम करण्याची ज्यांची इच्छा असते व जे काम करण्यास शारिरीक व बौद्धीकदृष्ट्या समर्थ असतात अशा लोकांना काम करण्याची व उत्पन्न मिळवण्याची संधी मिळत नाही. त्यांना बेरोजगार म्हटले जाते. प्रो. केन्स यांनी १९३६ मध्ये लिहिलेल्या (The General theory of Employment Interest and money) या ग्रंथात बेरोजगारीची व्याख्या दिली आहे. त्यांच्या मते, प्रचलित वेतन दरावर कामगार शारिरीक किंवा बौद्धीक रोजगार मिळविण्यात असमर्थ ठरतात. अशांना बेरोजगार संबोधले जाते. एखाद्या व्यक्तीने एखाद्या क्षेत्रात कार्य करण्यासाठी लागणारे प्रशिक्षण घेतले आहे, कौशल्य हस्तगत केले आहे किंवा कोणतेही शारीरिक, बौद्धीक श्रम करण्याची तयारी आहे, मिळेल त्या वेतनदरावर काम करण्याची तयारी आहे. पण त्याला कामच मिळत नाही अशा व्यक्तीस बेरोजगार

मानले जाते. बेरोजगारीच्या काही व्याख्या अभ्यासल्यानंतर बेरोजगारीचे नेमके स्वरूप आपल्या लक्षात येईल.

**बेरोजगारीच्या व्याख्या :**

**१) फेअर चाईल्ड :–** ''मजुरी करणाऱ्या सामान्य वर्गाच्या एका सदस्याला सामान्य वेळात, सामान्य वेतनावर आणि सामान्य काम करण्याच्या परिस्थितीत वेतन मिळणाऱ्या कामापासून अनिच्छेने किंवा जबरदस्तीने वेगळे ठेवले जाते तेव्हा त्याला बेरोजगारी असे म्हणतात. ''

**२) कार्ल प्रिब्राम :–** ''बेरोजगारी ही श्रमबाजाराची अशी स्थिती आहे की, ज्यामध्ये उपलब्ध संधीच्या संख्यपेक्षा श्रमिकांचा पुरवठा अधिक असतो.''

**३) गुन्नार मिडील :–** ''काम करण्याची क्षमता व इच्छा असूनही ज्यांना रोजगार मिळत नाही अशा परिस्थितीला बेरोजगारी म्हणतात. काम मिळणे किंवा न मिळणे हे एकट्या व्यक्तीच्या हातात नसून एकूण लोकसंख्येत असलेल्या कामाच्या उपलब्धेच्या परिस्थितीवर बेरोजगारी अवलंबून असते.''

**४) प्रो. पिगू :–** ''रोजगार नसलेल्या परंतू रोजगार मिळावा अशी इच्छा असलेल्या व्यक्तीला बेरोजगार म्हणता येईल.''

**५) आंतरराष्ट्रीय श्रम संघटना :–** ''काम करण्याची इच्छा व सामर्थ्य असूनही प्रचलित वेतनदरावर कामाच्या शोधात असताना ज्यांना काम मिळत नाही अशा सर्वांचा समावेश बेरोजगार या संकल्पनेत केला जातो.''

वरील व्याख्यांचा अभ्यास केल्यास बेरोजगारीचे स्वरूप स्पष्ट होते की, काम करण्याची व्यक्तीची शारिरीक, बौद्धीक व मानसिक क्षमता आहे. एखाद्या कामासाठी आवश्यक असणारे शिक्षण, प्रशिक्षण व कौशल्य तिने प्राप्त केले आहे, मिळणाऱ्या वेतनदरावर काम करण्याची त्याची तयारी आहे. परंतू इच्छा असूनही तिला रोजगार मिळत नाही अशा सर्वांना बेरोजगार संबोधले जाते.

भारताच्या सामाजिक व आर्थिक धोरणांचे रोजगार निर्मिती हे महत्त्वाचे उद्दीष्ट्य आहे. भारत हे विकसनशील राष्ट्र आहे. त्यामुळे भारतातील बेरोजगारीचे स्वरूप विकसीत राष्ट्रापेक्षा वेगळ्या स्वरूपाचे आहे. भारतात ग्रामीण व शहरी भागातील बेरोजगारीचे स्वरूप वेगवेगळे आहे. ग्रामीण समुदायात प्रामुख्याने अशिक्षितांची व अकुशल लोकांची बेरोजगारी आढळून येते. तर शहरी समुदायात शैक्षणिक व तांत्रिक बेरोजगारी आढळून येते. भारतात शेती, उद्योग व सेवा क्षेत्रात पुरेशा प्रमाणात रोजगार निर्मिती न झाल्याने बेरोजगारी वाढत जात आहे. ११ व्या पंचवार्षिक योजनाकाळात देशातील उपलब्ध श्रमशक्तीपैकी ८.२ कोटी लोक बेरोजगार होते. भारतात बेरोजगारीचे मापन करण्यासाठी चालू दैनिक स्थिती, साप्ताहिक स्थिती व सामान्य स्थिती या तीन पद्धतींचा अवलंब केला जातो. भारतातील विविध राज्यातील बेरोजगारीचा विचार केल्यास नैसर्गिक साधनांचे असमान वितरण, असमतोल विकास यामुळे विविध राज्यातील बेरोजगारीच्या दरात फरक आढळून येतो.

सामान्यपणे भारतात ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात बेरोजगारीचे प्रमाण जास्त आढळते. पुरूषापेक्षा

स्त्रियामध्ये बेरोजगारी अधिक आढळते. कृषी क्षेत्रामध्ये औद्योगिक व सेवा क्षेत्रापेक्षा जास्त बेरोजगारी, छुपी बेरोजगारी, खुली बेरोजगारी, सुशिक्षितांची बेरोजगारी, हंगामी बेरोजगारी, शहरी बेरोजगारी, ग्रामीण बेरोजगारी, ऐच्छिक व अनैच्छिक बेरोजगारी, संघर्षजन्य बेरोजगारी व सरंचनात्मक बेरोजगारी असे विविध प्रकार आढळतात.

महाराष्ट्रातील बेरोजगारीचा विचार केल्यास असे दिसून येते की, महाराष्ट्र राज्याच्या वाट्याला देशातील ९.४ टक्के भौगालिक क्षेत्र आले असून देशातील १०.२ टक्के श्रमशक्ती राज्यात आहे. राज्यातील ८० टक्के शेती कोरडवाहू स्वरूपाची असल्याने शेतीक्षेत्राचा फारसा विकास होऊ शकलेला नाही. औद्योगिक क्षेत्राचा राज्यात विकास झाला असला तरी वाढत्या श्रमशक्तीला या क्षेत्रात पुरेशा रोजगार संधी निर्माण होऊ शकलेल्या नाहीत. त्यामुळे शहरी तसेच ग्रामीण समुदायात बेरोजगारीची समस्या गंभीर बनली आहे.

### ३.५.२ बेरोजगारीची कारणे :

कोणत्याही देशातील उपलब्ध नैसर्गिक संसाधनाच्या तुलनेत लोकसंख्या अधिक प्रमाणात वाढल्यास किंवा संसाधनाच्या अपुऱ्या विकासामुळे बेरोजगारीची समस्या निर्माण होते. बेरोजगारीमुळे देशाच्या आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे इतर अनेक समस्यांना चालना मिळते. सामान्यपणे सामाजिक, आर्थिक व वैयक्तिक कारणामुळे बेरोजगारी निर्माण होत जाते. बेरोजगारीच्या कारणांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**१) लोकसंख्या वाढ :-** लोकसंख्येत होणारी वेगवान वाढ हे भारतातील बेरोजगारीचे मुलभूत कारण आहे. १९५१ मध्ये देशाची लोकसंख्या केवळ ३६ कोटी होती. ती वाढत जावून १९९१ मध्ये ८४.६ कोटी, २००५ मध्ये १०२.९ कोटी झाली तर २०११ मध्ये लोकसंख्या १२१.०२ कोटीपर्यंत वाढली. या लोकसंख्या वाढीमुळे श्रमाचा पुरवठा वाढत जातो. म्हणजेच प्रत्येक वर्षी नव्याने रोजगार मागणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढते. परंतू त्या प्रमाणात कोणत्याही क्षेत्रात रोजगार उपलब्ध होवू न शकल्याने देशातील बेरोजगारी वाढत जात आहे.

**२) मागासलेली शेती :-** भारतीय शेती निसर्गावर अवलंबून आहे. देशातील लागवडी योग्य शेतीपैकी ३.५ टक्के शेतीला जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध असून ६५ टक्के शेती कोरडवाहू आहे. सिंचनसुविधा उपलब्ध असणाऱ्या शेतीत रोजगार उपलब्ध होऊ शकतो. मात्र कोरडवाहू शेती केवळ हंगामात रोजगार उपलब्ध झाल्याने हंगामी बेरोजगारी वाढत जाते. याबरोबरच उद्योग व सेवा क्षेत्रांच्या विकासामुळे शेती क्षेत्रातील अतिरिक्त लोकसंख्या उद्योग व सेवा क्षेत्रात सामावली जाणे अपेक्षित असते. मात्र या क्षेत्राने फारच कमी लोकसंख्या सामावून घेतल्याने शेतीमध्ये छुपी बेरोजगारी, अर्थ बेरोजगारी, उघड बेरोजगारी वाढत जाते. आजदेखील सरकारकडून शेतीक्षेत्रात पुरेशा प्रमाणात गुंतवणूक केली जात नाही. त्याचा परिणाम होवून जलसिंचन, खते, रस्ते, वीज, कृषी अवजारे, शेतमाल विक्रीव्यवस्था, आर्थिक संस्था, शेतमालाला हमीभाव, प्रक्रिया उद्योग अशा मुलभूत सोई-सुविधांचा विकास होऊ शकलेला नाही. त्यामुळे शेतीक्षेत्रात रोजगार निर्मिती कमी झाल्याने बेरोजगारी वाढत जाते.

**३) ग्रामीण कुटिरोद्योगांना घरघर :-** ग्रामीण समुदायातील कुटीरउद्योग, लघुउद्योग, हस्तउद्योग हे भूमिहीन शेतमजूर व इतरांच्या चरितार्थाचे प्रमुख साधन आहे. मात्र औद्योगिकरणाच्या प्रक्रियेत अनेक उद्योगांनी

उपभोग्य वस्तुंच्या उत्पादनात प्रवेश केला आहे. या उद्योगात तयार होणाऱ्या वस्तू या दर्जेदार, सुबक व स्वस्त असल्याने ग्रामीण लघु व कुटीर उद्योगांना त्यांच्याशी स्पर्धा करणे शक्य होत नाही. परिणामी ग्रामीण भागातील अनेक लघु व कुटीर उद्योग बंद पडत चालले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात बेरोजगारी वाढत आहे.

**४) यंत्र व तंत्रज्ञानात्मक प्रगती :–** तांत्रिक प्रगतीमुळे आर्थिक विकासाला चालना मिळते. परंतू उद्योगधंद्यामधून अधिक उत्पादन व अधिक नफा मिळवण्यासाठी मानवी शक्तीपेक्षा यांत्रिक शक्तीला प्राधान्य दिले जाते. उत्पादन खर्च कमी करण्यासाठी स्वयंचलित यंत्रे व संगणकाचा वापर वाढत आहे. तसेच उद्योग क्षेत्राबरोबरच बांधकाम, रस्ते व रेल्वे बांधणी, खाणकाम, शेतीची मशागत अशा अनेक कामासाठी आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर केला जात आहे. आधुनिक यंत्रसामुग्री उद्योगात संगणकाचा वापर, स्वयंचलित साधने हे भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशासाठी अयोग्य असले तरी उत्पादन खर्चात बचत व नफ्याच्या प्राप्तीसाठी याचा सर्वत्र वापर केला जात आहे. त्यामुळे रोजगारनिर्मिती कमी होवून बेरोजगारी वाढत जाते.

**५) उद्योग व व्यवसायातील चढ–उतार :–** उद्योग व व्यापार व्यवसायात सातत्याने विविध कारणांमुळे चढ–उतार होत असतात. उद्योग तोट्यात जाणे, सरकारी धोरणातील बदल, कररचना, उद्योगातील श्रम व टाळेबंदी, व्यवस्थापन व कामगार संघर्ष, आंतरराष्ट्रीय बाजारातील चढ–उतार, नैसर्गिक आपत्ती, बाजारातील स्पर्धा अशा अनेक बाबीमुळे उद्योगधंदे व व्यापार व्यवसायात ताण–तणाव राहतात. त्यातून कामगार कपात होत असते. अशा उद्योग–व्यवसायात नवीन रोजगार निर्माण होत नाही. परिणामी बेरोजगारी वाढत जाते.

**६) शिक्षण व्यवस्थेतील दोष :–** सर्वसाधारपणे मनुष्यबळाचा विकास घडवून आणून त्यांची उत्पादकता व कार्यक्षमता वाढवणे, स्वयंरोजगारीचे मूल्य वाढविणे व तशी मानसिकता तयार करणे. हा शिक्षण व प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश असतो. परंतू ब्रिटिश काळापासून चालत आलेली भारतातील शिक्षण पद्धती ही कालबाह्य असून पारंपरिक शिक्षणामुळे रोजगार व स्वयंरोजगारात वाढ होत नाही. सदोष शिक्षणपद्धतीमुळे उद्योगासाठी आवश्यक असणारे कौशल्य, योग्यता व कुवत निर्माण होत नाही. याउलट रोजगारीसाठी शासनावर अवलंबून राहण्याची मानसिकता अशा दोषपूर्ण शिक्षणपद्धतीतून विकसीत होत गेली. त्यामुळे देशात सुशिक्षित बेरोजगारीत मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे.

**७) शासकीय योजनांचे अपयश :–** वाढत्या लोकसंख्येबरोबरच श्रमशक्तीचे योग्य नियोजन करणे सरकारला शक्य झालेले नाही. देशातील सर्व क्षेत्रांना लागणाऱ्या तांत्रिक व प्रशिक्षित मनुष्यबळाची मागणी लक्षात घेवून त्याचे योग्य नियोजन केल्यास बेरोजगारीची समस्या निर्माण होत नाही. परंतू भारतात पंचवार्षिक योजना व इतर धोरणांमध्ये रोजगारनिर्मितीच्या उद्देशाला दुहेरी स्थान देण्यात आले. त्यामुळेच संस्था अभियांत्रिकी, वैद्यकीय व पारंपरिक शिक्षण क्षेत्रात कुशल मनुष्यबळात वाढ होत असून त्या प्रमाणात रोजगार निर्माण झाल्याने बेरोजगारी वाढत आहे.

**८) राजकीय अस्थिरता व प्रशासन :–** देशाच्या विकासासाठी आर्थिक स्थैर्य व राजकीय स्थैर्याची गरज असते. भारतात केंद्र व राज्य पातळीवरील असंख्य राजकीय पक्षांच्या अस्तित्त्वामुळे केंद्र तसेच राज्य पातळीवर

कोणत्याही एका राजकीय पक्षाला बहुमत मिळत नाही. त्यामुळे भिन्न दृष्टीकोन व विचारसरणी असणारे अनेक राजकीय पक्ष एकत्र येवून सरकार स्थापन करतात. मात्र स्वार्थी राजकीय प्रवृत्ती, हितसंबंध व विविध पक्षांसाठी घेतलेले अनुकूल निर्णय यामुळे राजकीय अस्थैर्य वाढते. शासकीय योजना व विविध कार्यक्रमांचे यश हे प्रशासकीय यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. राजकीय अस्थिरतेमुळे प्रशासकीय यंत्रणा कार्यक्षमतेने काम करीत नाही. परिणामी बेरोजगारीसारखे प्रश्न निर्माण होतात.

**९) व्यक्तिगत घटक :–** बेरोजगारी समस्या निर्माण होण्यास अनेक व्यक्तीगत घटक कारणीभूत ठरतात. त्यात प्रामुख्याने योग्य वयात रोजगार न मिळणे, अनेक तरूणांना त्यांची क्षमता व आवड याविषयी पुरेसे ज्ञान नसते. बहुतेक वेळा एखाद्या विशिष्ट व्यवसायात गरजेपेक्षा अधिक प्रशिक्षित व्यक्ती प्रयत्नशील असतात. त्यामुळे प्रत्येकाला रोजगार मिळत नाही. याबरोबर रोजगाराभिमुख शिक्षणाची माहिती नसणे, त्यामुळे घेतलेले शिक्षण रोजगार तसेच व्यवसायासाठी पुरेसे ठरत नाही. सुशिक्षित तरूणांना सामाजिकदृष्ट्या उच्च प्रतीचे रोजगार मिळवण्याची इच्छा असते त्यामुळे कमी प्रतीचे रोजगार करण्यास संकुचित वाटते. उदा – ॲटो रिक्षा किंवा टॅक्सी चालवणे, सेल्समन, शेतीतील काम, हॉटेलमधील काम इत्यादीला तरूणांची नापसंती असते. रोजगार व व्यवसाय हा आपल्या गावाजवळ तसेच चांगल्या शहरात पाहिजे. या मानसिकतेमुळे आपला प्रदेश सोडून दुसरीकडे स्थलांतर करण्याची तरूणांची मानसिकता नसते. असे अनेक व्यक्तीगत घटकांमुळे बेरोजगारीची समस्या तीव्र बनते.

वरीलप्रमाणे भारतीय समाजात बेरोजगारी निर्माण होण्याची कारणे आहेत. बेरोजगारीमुळे व्यक्तीचे उत्पन्न, उत्पादकता, आरोग्य, मानसिकतेवर प्रतिकूल परिणाम होतो. देशाच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होतो. भारतात दारिद्र्य हा बेरोजगारीचा सर्वात मोठा परिणाम आहे. बेरोजगारी दारिद्र्य वाढवते, दारिद्र्यामुळे लोकांना योग्य शिक्षण, आरोग्य व उपलब्ध संधीचा लाभ घेता येत नाही. प्रगतीसाठी पोषक वातावरण मिळत नाही. याचा एकत्रित परिणाम सामाजिक आरोग्य धोक्यात येते. दारिद्र्य, कुपोषण, भूकबळी, निकृष्ट राहणीमान, गुन्हेगारी, झोपडपट्टी, लाचखोरी अशा अनेक समस्या बेरोजगारीमुळे निर्माण होतात.

**बेरोजगारीवरील उपाय योजना :**

स्वातंत्र्योत्तर काळात वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे बेरोजगारी, दारिद्र्य व आर्थिक विषमता या समस्यांची तीव्रता वाढत गेली. त्यामुळे आर्थिक विकासावर विपरीत परिणाम होवून विकासाच्या मार्गात अनेक अडथळे निर्माण झाले. प्रामुख्याने बेरोजगारीमुळे व्यक्ती, कुटुंब तसेच समाजव्यवस्थेवर वाईट परिणाम होतात. बेरोजगारीमुळे लोकांच्या ज्ञान व कौशल्यांना वाव न मिळाल्याने निराशा वाढत जावून व्यक्तींचे मानसिक खच्चीकरण होते. हा समाज आपणास जगण्याची साधने पुरवू शकत नाही. या मानसिकतेतून व्यक्तीगत व सामाजिक विघटनाला चालना मिळते. त्यातून गुन्हेगारी, व्यसनाधिनता, आत्महत्या, चोरी, कौटुंबिक संघर्ष अशा अनेक समस्यांना चालना मिळते. समाज स्वास्थ्य धोक्यात येते. म्हणून बेरोजगारी नष्ट करणे व समाजात संतुलन राखणे ही शासनाची व सर्व समाजाची जबाबदारी बनते. त्यासाठी एकत्रित प्रयत्नांची आवश्यकता निर्माण होते.

बेरोजगारी ही एक गंभीर सामाजिक–आर्थिक समस्या आहे. ही समस्या सोडविण्यासाठी नियोजनबद्ध

प्रयत्नांची गरज असते. शासकीय व सामाजिक पातळीवर निराकरणात्मक प्रयत्न होणे गरजेचे आहे. बेरोजगारी कमी करण्याच्या उपायांमध्ये दारिद्र्य निर्मुलनासाठीचे शासकीय कार्यक्रमांचा देखील समावेश होतो. यातील महत्त्वाच्या उपाय-योजना पुढीलप्रमाणे आहेत.

**१) लोकसंख्या नियंत्रण :-** भारतातील अनेक सामाजिक-आर्थिक समस्या लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होत आहेत. १९५१ मध्ये देशाची लोकसंख्या केवळ ३.६ कोटी होती. तर २०११ मध्ये ती १२१.०२ कोटीपर्यंत पोहचली आहे. आज भारतातील लोकसंख्या वाढीचा दर जगात सर्वाधिक आहे. या वाढत्या लोकसंख्येत कुशल व अकुशल मनुष्यबळ प्रचंड प्रमाणात निर्माण होत आहे. या वाढत्या मनुष्यबळासाठी आवश्यक रोजगार संधी उपलब्ध होत नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. प्रचंड लोकसंख्येमुळे मागणी आणि पुरवठा यांचे प्रमाण व्यस्त बनते आणि बेरोजगारी वाढते. यासाठी कुटुंब मर्यादीत ठेवणे, संतती नियमन करणे, कुटुंब नियोजन, कुटुंब कल्याण, लोकसंख्या शिक्षण, समाज प्रबोधन, जाणीव-जागृती अशा विविध मार्गाने लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**२) शाश्वत आर्थिक विकास :-** बेरोजगारीची समस्या सोडविण्यायसाठीचा प्रभावी मार्ग म्हणजे शाश्वत आर्थिक विकास होय. आर्थिक विकासासाठी उद्योगांचा विकास, शेती प्रक्रिया उद्योग, उद्योगांचे विकेंद्रीकरण, सेवा क्षेत्राचा विकास करणे आवश्यक आहे. देशातील रस्ते, रेल्वे, वीज, पाणीपुरवठा, देशांतर्गत विमान सेवा, आंतरराष्ट्रीय विमानतळे, सार्वजनिक वाहतूक सुविधा, शैक्षणिक केंद्रे, पर्यटन उद्योगांना चालना अशा पायाभूत सुविधांचा विकास करणे आवश्यक आहे. देशांतील कर रचना प्रक्रियेत सुटसुटीतपणा आणणे आवश्यक आहे. यामुळे देशांतील सर्वच क्षेत्रातील उद्योग व्यवसायांना चालना मिळून रोजगार वाढू शकेल.

**३) औद्योगिक विकास :-** रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी उद्योगधंद्याचा नियोजनपूर्वक विकास करणे आवश्यक आहे. यामध्ये भारतात उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक साधन सामग्रीचा विचार करून त्यासंबंधी उद्योगधंदे, लघुउद्योग, ग्रामोद्योग, कुटीरोद्योगांचा विकास केला पाहिजे. शेतीक्षेत्रात आज सर्वाधिक मनुष्यबळ आहे. त्यामुळे ग्रामीण भागात शेतीप्रक्रिया उद्योगांना चालना देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील उद्योग व शहरी भागातील उद्योग यांच्यात परस्पर समन्वय निर्माण केल्यास कच्चा माल, प्रशिक्षित मनुष्यबळ, बाजारपेठा यात समन्वय निर्माण होवून उद्योगांचा विकास होईल. याबरोबर शासनाने देखील उद्योगवाढीसाठी चालना देणारे धोरण राबवणे गरजेचे आहे. जे उद्योग सर्वाधिक कामगार भरती करतील त्यांना इतर सवलती देणे, स्थानिक कामगारांना प्राधान्य देणे असे धोरण राबवविल्यास रोजगार निर्मिती होऊ शकेल.

**४) शेती व शेतीपूरक व्यवसायांचा विकास :-** भारत हा शेतीप्रधान देश असल्याने शेती विकास व शेतीपूरक व्यवसायांच्या विकासावर अधिक लक्ष केंद्रीत करणे महत्त्वाचे आहे. शेतीविकासासाठी जलसिंचन सुविधा, आधुनिक पिक पद्धती, हवामानानुसार पिकांचे नियोजन, सामूहिक शेती, गट शेती, ग्रामीण कृषी व मार्गदर्शन केंद्रे, रासायनिक खते व बी-बियाणांचा योग्य वापर, पडीक जमिनींचा विकास, फळबाग विकास योजना, ग्रामीण बाजारपेठांची निर्मिती यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. याबरोबरच दुग्धव्यवसाय,

कुक्कुटपालन, मधुमक्षिका पालन, वराह-पालन, शेळी पालन, रेशीम उद्योग अशा शेतीपूरक व्यवसायांना चालना देवून सरकारने त्यासाठी कर्जपुरवठा, अनुदान देणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागात परंपरेने अनेक कुटीरोद्योग, ग्रामोद्योग व हस्तउद्योग केले जातात. उदा - टोपल्या विणणे, दोरखंड करणे, सुतारकाम, लोहारकाम, कुंभारकाम, लाकडी खेळणी बनवणे इ. अशा ग्रामीण उद्योगांना प्रोत्साहन देणे हे उद्योग टिकवून ठेवून त्यांना शहरी बाजारपेठा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. याशिवाय शेतीत व्यापारी तत्त्वावर उत्पादन घेण्यासाठी लोकांना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यात प्रामुख्याने नारळ, काजू, चहा, कॉफी, आले, तंबाखू, ऊस, कापूस, कडधान्ये, तेलबिया, फळभाज्या अशा अनेक उत्पादनांचा समावेश करणे गरजेचे आहे. याबरोबर कृषी प्रक्रियांना त्या-त्या प्रदेशातील पिकपद्धतीनुसार प्रोत्साहन देणे, कृषी पर्यटनाला चालना देणे, शहरातील बाजारपेठात शेतकरी बाजारपेठा निर्माण करणे. अशा विविध उपायांची अंमलबजावणी केल्यास ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होऊ शकेल.

**५) शैक्षणिक सुधारणा :-** भारत देशात ब्रिटिशकाळापासून चालत आलेल्या शैक्षणिक पद्धतीत अनेक दोष आहेत. आपल्याकडील शिक्षण हे रोजगाराभिमुख, स्वावलंबन व कौशल्य निर्माण करणारे नाही तर ते केवळ पदवी निर्माण करणारे आहे. भारतात आजपर्यंत भारतीय समाजाच्या गरजांचा विचार करून शैक्षणिक प्रक्रिया राबविली गेलेली नाही. या शिक्षण पद्धतीने आजपर्यंत केवळ शहरी भागातील गरजांचा अधिक वापर केला. त्या तुलनेत ग्रामीण भागाचा फारसा विचार केलेला आठवत नाही. त्यामुळे शिक्षणपद्धतीतील दोष दूर करून सुधारणा केल्या पाहिजेत. त्यासाठी संपूर्ण देशात समाजशिक्षण प्रणाली राबविणे, प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणे, शिक्षणात स्थानिक गोष्टींना प्राधान्य देणे, विद्यार्थ्यातील कौशल्य शोधून त्याचा विकास करणे, कौशल्य विकासाला प्राधान्य देणे, उच्चशिक्षणात संशोधन व विकासाला चालना देणे. याबरोबरच पारंपरिक शिक्षणाबरोबरच व्यवसाय शिक्षणाला चालना देणे, स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण केंद्रे निर्माण करणे अशा विविध उपायांची अंमलबजावणी करून शैक्षणिक सुधारणा केल्यास कुशल मनुष्यबळाची निर्मिती होऊ शकेल. यामुळे रोजगार व स्वयंरोजगारास सहकार्य मिळेल.

**६) शासकीय योजना व कार्यक्रम :-** आजपर्यंत विविध पंचवार्षिक योजनांद्वारे औद्योगिक विकास व शेती विकास या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न करण्यात आले. यात प्रामुख्याने कृषी क्षेत्रात गुंतवणूक, उपभोग्य वस्तू उत्पादन, उद्योगांना प्रोत्साहन, उद्योगांचे ग्रामीण भागात विकेंद्रीकरण, ग्रामीण उद्योगांना चालना, सेवाक्षेत्राचा विकास अशा अनेक बाबीवर भर देण्यात आला आहे. याशिवाय दारिद्र्य निर्मुलन व रोजगार निर्मितीसाठी केंद्र व राज्यसरकारांनी वेतन आधारीत रोजगार योजना उदा - रोजगार हमी योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना इ. तसेच स्वयंरोजगार आधारीत रोजगार योजना उदा - स्वर्ण-जयंती ग्राम स्वरोजगार योजना, स्वर्ण-जयंती शहरी रोजगार योजना इ. अशा अनेक योजना राबविल्या आहेत. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**(अ) केंद्र शासनाचे कार्यक्रम :**

नियोजन काळात केंद्र सरकारने रोजगार निर्मितीसाठी विविध योजना व कार्यक्रम सुरू केले. या योजनासाठी सरकारकडून ५० टक्के ते ७५ टक्क्यांपर्यंत अनुदान उपलब्ध करून दिले जाते. केंद्र पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी राज्यसरकारांकडून केली जाते. या योजना पुढीलप्रमाणे आहेत.

१. सामाजिक विकास प्रकल्प आणि राष्ट्रीय विस्तार सेवा.

२. प्रकर्षित कृषी जिल्हा कार्यक्रम (१९६०-६१)

३. जिल्हा ग्रामीण विकास संस्था (१९६४)(१९९३)

४. अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम (१९२३)

५. सीमांत शेतकरी आणि शेतमजूर विकास यंत्रणा (१९७३-७४)

६. डोंगरी क्षेत्र विकास कार्यक्रम (१९७१-७२)

७. वीस कलमी कार्यक्रम (१९७५)

८. राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था (१९७७)

९. ग्रामीण औद्योगिकरण व जिल्हा उद्योग केंद्र (१९७७)

१०. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (१९८०-८१)

११. ग्रामीण युवकांसाठी स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रम (१५ ऑगष्ट १९७९)

१२. ग्रामीण क्षेत्रातील महिला व बालविकास कार्यक्रम (१९८२)

१३. इंदिरा आवास योजना (१९८५)

१४. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (२५ डिसें २०००)

१५. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (२ फेब्रुवारी२००६)

या योजनांबरोबरच अनेक रोजगार व स्वयंरोजगाराच्या योजना केंद्रशासनाने राबविल्या आहेत.

**(ब) राज्य शासनाचे कार्यक्रम :**

महाराष्ट्र राज्यात रोजगार निर्मिती व ग्रामीण विकासासाठी केंद्र शासनाने पुरस्कृत केलेल्या विविध योजना राबविल्या जातात. या योजनांबरोबरच राज्य शासनाने राज्यातील गरजा विचारात घेवून पुढील काही योजना राबविल्या आहेत.

१. रोजगार हमी योजना (३ एप्रिल १९७५)

२. संजय गांधी स्वावलंबन योजना (२ ऑक्टोबर १९८०)

३. जवाहर विहिरी कार्यक्रम (१ ऑक्टोबर १९८०)

४. रोहयो अंतर्गत फळबाग लागवड योजना (१ जून १९९०)

५. सुशिक्षित बेरोजगारांसाठी वीज भांडवल योजना

६. रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र

**७) इतर उपाय :**

बेरोजगारी निर्मुलनासाठी वरील विविध उपायांबरोबरच खालील काही मुद्यांचा विचार होणे महत्त्वाचे आहे.

१) कर्ज, वीज, पाणी, रस्ते अशा सोयी उपलब्ध करून पाच ते पन्नास हजार लोकसंख्येच्या छोट्या शहरात उद्योग वाढीसाठी प्रयत्न करणे.

२) जमीन, भांडवल अशा उपलब्ध उत्पादनाच्या साधनांच्या तुलनेत श्रमाची संख्या वाढत गेल्याने श्रमनियोजनास प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे.

३) उपभोग्य वस्तूंच्या उद्योगाचा विस्तार केल्यास भाववाढ कमी होवून रोजगार निर्मिती होवू शकेल.

४) ज्या उद्योगात सर्वाधिक रोजगार निर्माण होईल अशा उद्योगांना कर, कर्ज इत्यादीबाबत सवलती देण्याचे धोरण स्वीकारले पाहिजे.

५) स्थानिक उद्योग व उद्योजकांना सवलती देणे.

६) शिक्षणपद्धती ही केवळ पुस्तकी ज्ञानापर्यंत मर्यादीत न ठेवता, व्यवसायाभिमुख शिक्षणपद्धतीला प्राधान्य द्यावे. यासाठी उद्योगांना आवश्यक असणारे प्रशिक्षित मनुष्यबळ पुरविण्यासाठी शिक्षण संस्था व उद्योगांना परस्पर सामंजस्य करार करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

७) ग्रामीण भागात रस्ते, रेल्वे, पूल, शाळा बांधकाम, शेततळी इ. कामांना प्राधान्य देवून रोजगार निर्मिती करावी.

वरीलप्रमाणे बेरोजगारी निर्मुलनासाठी विविध उपाय योजना सांगता येतील. याशिवाय याच प्रकरणातील दारिद्र्य या समस्येवरील रोजगारविषयक योजनांचा विचार करणेत यावा. याशिवाय राज्यघटनेतील कलम ३९ नुसार 'कामाचा हक्क' (Right to work) मान्य करण्यात आला आहे. यानुसार असे मान्य करण्यात आले आहे की, बेरोजगारी नाहीशी करण्यासाठी राज्याने त्याच्या आर्थिक क्षमतेच्या व विकासाच्या मर्यादेत राहून कामाचा हक्क, शिक्षण याद्वारे सार्वजनिक सहाय्यता प्रदान करावी.

### ३.६ पारिभाषिक शब्द :

**१) सर्वकष दारिद्र्य :–** शारीरिक कार्यक्षमता व मुलभूत आरोग्य विषयक गरजांची पूर्तता करण्यासाठी साधनसामग्रीचा अभाव असणे.

**२) दारिद्र्याची संस्कृती :–** व्यक्तीला आपली दारिद्र्याची जीवनपद्धती बदलायची नसते. आहे त्या संस्कृतीत जीवन जगण्याला प्राधान्य दिले जाते.

**३) सापेक्ष दारिद्र्य :–** एखाद्या वरिष्ठ आर्थिक समुहाचा कनिष्ठ आर्थिक समुहाशी तुलना करून श्रीमंती अथवा गरीबी निश्चित करणे.

**४) बेरोजगारी :–** व्यक्तीत काम करण्याची क्षमता व इच्छा असते. तरीही तिला प्रचलित वेतनावर काम मिळत नाही.

**५) हंगामी दारिद्र्य :–** शेती व इतर क्षेत्रात केवळ एका विशिष्ट काळात काम मिळणे व इतर वेळी न मिळणे.

### ३.७ सारांश :

या घटकांमध्ये भारतातील प्रमुख सामाजिक–आर्थिक समस्या म्हणून दारिद्र्य व बेरोजगारी या दोन प्रमुख समस्यांचा अभ्यास करण्यात आला आहे. दारिद्र्य या संकल्पनेचा अभ्यास करताना दारिद्र्याची संकल्पना, अर्थ, व्याख्या, दारिद्र्याचे प्रकार, दारिद्र्याची कारणे व उपाय–योजनांचा विचार करण्यात आला आहे. दारिद्र्यामुळे समाजात सामाजिक आरोग्य विस्कळीत होवून सामाजिक विघटनाला चालना मिळते. दारिद्र्यामुळे व्यक्ती व समाजाच्या विकासाला अडथळा निर्माण होतो. म्हणून हा प्रश्न सोडविण्यासाठी व्यक्तिगत सामाजिक व शासकीय पातळीवर सर्वांगिण प्रयत्न झाल्यास दारिद्र्य निर्मुलन होवून समाजाचा विकास शक्य होतो.

बेरोजगारी ही समस्या देखील आर्थिक व्यवस्थेशी संबंधित आहे. बेरोजगारी दारिद्र्य व आर्थिक विषमतेला चालना देते. समाजात गुन्हेगारी, व्यसनाधिनता, आत्महत्या, भ्रष्टाचार अशा अनेक समस्यांना बेरोजगारी चालना देते. या घटकात आपण बेरोजगारीचा अर्थ, व्याख्या, कारणे व बेरोजगारीवरील उपाययोजनांचा अभ्यास केला आहे. सामान्यपणे बेरोजगारी कर्त्या लोकसंख्येशी संबंधित असते. ही लोकसंख्या देशात विकासातील प्रमुख मनुष्यबळ म्हणून काम करते. अशा लोकसंख्येलाच ते शारिरीक व बौद्धीकदृष्ट्या सक्षम असताना प्रचलित वेतनदरात काम मिळत नाही. त्यावेळी बेरोजगारी निर्माण होते. ही बेरोजगारी मानसिक व सामाजिक आरोग्य विस्कळीत करू शकते. यासाठी शासनस्तरावर यावर उपाय–योजना करण्याचा सातत्याने प्रयत्न होत आहेत.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

१. दारिद्र्याची गोडार्ड यांची व्याख्या सांगा?

२. 'दारिद्र्य रेषा' याचा अर्थ काय?

३. दारिद्र्याची व्यक्तिगत कारणे सांगा?

४. राम आहुजा यांनी सांगितलेली दारिद्र्याची कारणे सांगा?

५. दारिद्र्य निर्मुलनाचे शासकीय उपाय सांगा?

६. दारिद्र्य निर्मुलनाचे इतर उपाय सांगा?

७. बेरोजगारीची फेअर चाईल्ड यांची व्याख्या सांगा?

८. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने केलेली बेरोजगारीची व्याख्या सांगा?

९. बेरोजगारीची कारणे सांगा?

१०. बेरोजगारीचे उपाय सांगा?

११. बेरोजगारीचे शासकीय कार्यक्रम सांगा

**स्वयं अध्ययना प्रश्नांची उत्तरे**

**उत्तर – १ –** गोडार्ड – ''एक व्यक्ती आणि तिच्यावर अवलंबून असणारे इतर लोक यांचे स्वास्थ्य, आरोग्य व त्यांची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तुंचा अपुरा पुरवठा म्हणजे दारिद्र्य होय.''

**उत्तर – २ –** दारिद्र्यरेषेमुळे आपणास दारिद्र्याचे मोजमाप करता येते व अशा दारिद्र्यरेषेच्या खालपासून दारिद्र्याची सुरवात होते व त्या रेषेच्यावरती दारिद्र्याचा शेवट होतो.

**उत्तर – ३ –** व्यक्ती, दारिद्र्याची संस्कृती व समाजरचना ही दारिद्र्याची व्यक्तीगत कारणे आहेत.

**उत्तर – ४ –** राम आहुजा यांनी दारिद्र्याची आर्थिक कारणे, लोकसंख्यात्मक कारणे व सामाजिक कारणे सांगितली आहेत. आर्थिक कारणात अपुरा विकास, वाढती महागाई व भांडवलाचा अभाव, कुशल मनुष्यबळाचा अभाव, वाढती बेकारी, पारंपारिक शेती व्यवसाय हे मुद्दे सांगितले आहेत.

**उत्तर :– ५ –** दारिद्र्य निर्मुलनाचे अनेक शासकीय उपाय आहेत. त्याचा सविस्तर आढावा प्रकरणातील या मुद्यांच्या आधारे घ्यावा.

**उत्तर :– ६ –** इतर उपायात लोकसंख्या नियंत्रण, कृषिक्षेत्राचा विकास, रोजगार संधी, अभिवृत्तीत बदल इ. चा विचार करावा लागेल.

**✻ बेरोजगारीची समस्या :**

**उत्तर – ७ –** फेअर चाईल्ड – मजुरी करणाऱ्या सामान्य वर्गाच्या एका सदस्याला सामान्य वेळात, सामान्य वेतनावर आणि सामान्य काम करण्याच्या परिस्थितीत वेतन मिळणाऱ्या कामापासून अनिच्छेने वेगळे ठेवले जाते तेव्हा त्याला बेरोजगारी असे म्हणतात.

**उत्तर – ८ –** आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेनुसार ''काम करण्याची इच्छा व सामर्थ्य असूनही प्रचलित वेतनदरावर काम शोधत असताना ज्यांनाा काम मिळत नाही अशांना बेरोजगार म्हटले जाते.''

**उत्तर – ९ –** लोकसंख्या वाढ, मागास शेती, ग्रामोद्योगांचा ऱ्हास, यंत्र व तंत्रज्ञानात्मक प्रगती, उद्योग व व्यवसायातील चढ-उतार, शिक्षण व्यवस्थेतील दोष, राजकीय संरचना, व्यक्तीगत घटक ही बेरोजगारीची कारणे आहेत.

**उत्तर – १० –** लोकसंख्या नियंत्रण, शाश्वत आर्थिक विकास, औद्योगिक विकास, शेती व शेती-पूरक व्यवसायांचा विकास, शैक्षणिक सुधारणा हे बेरोजगारीचे उपाय आहेत.

**उत्तर – ११ –** बेरोजगारीसाठी अनेक शासकीय कार्यक्रम व योजनांचा विचार केला जातो. त्यात केंद्र व राज्यशासनाच्या कार्यक्रमांचा समावेश आहे. सविस्तर उत्तरासाठी प्रकरणातील मुद्दे पहावेत.

✻ **सराव/गृहपाठ (Exercise/Home Assignment) :**

महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील दारिद्र्य व बेरोजगारी संबंधीच्या पुस्तकांचे वाचन करा. आपला तालुका, गाव येथील दारिद्र्य व बेरोजगारी निर्मुलन कार्यक्रमांचा आढावा घ्या.

✻ **चिंतन आणि कृती** (Reflection and Action) **:**

तुमचे गाव, तालुका व शहरातील दारिद्र्यासंबंधी केंद्राला भेट द्या. सरकारी कार्यालयात तालुक्यातील बेरोजगारीचा आढावा घ्या. तालुका/जिल्हा उद्योग केंद्रे व सरकारी बँकांना भेटी द्या.

✻ **अधिक वाचनासाठी पुस्तके** (Suggested Reading Books) **:**


१. Ahuja Ram : Social Problems in India, Rawat Publication Jaipur (2003)

२. Sharma. Ram Nath : Indian Social Problems, Media Promoters Bombay (1982)

३. Ghate P. : Direct Attack on Poverty, Concept Publishing New Delhi (1984)

४. Shankar Rao C.N. : Sociology Primary Principles, Chand & Co. Delhi (2004)

५. समकालीन भारतातील सामाजिक समस्या - प्रा. जयंत घाटगे

६. भारतातील सामाजिक समस्या - प्रा. मोहिते, प्रा. कोंडेकर, फडके प्रकाशन.

७. समकालीन भारतातील सामाजिक समस्या, साळुंखे जत्राटकर, मारूळकर - नरेंद्र प्रकाशन, पुणे.

८. शर्मा जी. एल. - सामाजिक मुद्दे, रावत पब्लिकेशन, जयपूर.

९. भगेलीवाल टी. एन. - श्रम अर्थशास्त्र एव औद्योगिक संबंध, साहित्य भवन, आग्रा.

१०. चव्हाण एन. एल.- भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास-१, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव

११. रसाळ राजेंद्र - भारतीय अर्थव्यवस्था, सक्सेस पब्लिकेशन, पुणे.

१२. शिरगांवे, गोडसे, साळुंखे, साळोखे - भारतातील सामाजिक समस्या, निराली प्रकाशन, पुणे.

१३. आगलावे, प्रदीप - भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

१४. मारूळकर, पाडळकर - भारतातील सामाजिक समस्या, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

❑❑❑

# घटक – ३
# सामाजिक धार्मिक आणि सांस्कृतिक समस्या
# ( Socio-Religious and Cultural Problems )

## संप्रदायवाद : अर्थ, कारणे आणि उपाययोजना
**( Communalism : Meaning Causes and Remedies )**

**घटक संरचना : (Struclure)**

२.१ प्रस्तावना

२.२ उद्दिष्ट्ये

२.३ विषय विवेचन

 २.३.१ सांप्रदायवादाचा अर्थ : कारणे आणि उपाययोजना

 २.३.२ स्त्रीभ्रुण हत्या : कारणे आणि उपाययोजना

२.४ सारांश

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ

२.७ चिंतन व कार्य

२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

### २.१ प्रस्तावना : (Introduction)

भारत देश अनेकविध धार्मिक, सांस्कृतिक, पारंपरिक भिन्नतेतून निर्माण झालेला आहे. प्रदिर्घकाळ हे भिन्नत्त्व जपत हे भिन्न समुदाय एकमेकांत मिसळून गेले आहेत. तरीही स्वधर्मश्रेष्ठत्त्वाची भावना, इतर धर्मांची शिकवण, श्रद्धा, धर्मपालनाचे रिवाज यातल्या टोकाच्या भिन्नत्त्वामुळे सांप्रदायिकता वाढून बऱ्याचवेळा बहुसंख्यांक समुदायाकडून आपल्याला एकाकी पाडले जात आहे. पक्षपातीपणा केला जात आहे. समुदायाच्या उन्नतीत अडथळा निर्माण केला जात आहे. अशा प्रकारची भावना अल्पसंख्यांक समुदायात निर्माण होते. या सांप्रदायिक तणावात या ना त्या कारणाने संघर्षाची ठिणगी पडते तेव्हा समाजामध्ये सांप्रदायिक हिंसाचार, दंगलींना तोंड फुटते. बेसुमार जीवित व वित्त हानी होते. मानवता धोक्यात येते. शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो.

परिणामी द्वेषभावना वाढीस लागते आणि संप्रदायवाद अधिक धारदार बनतो. धार्मिक विभीन्नता असलेल्या भारतासारख्या देशात राजकीय ताकद प्रबळ करण्यासाठी याचा पुरेपुर वापर करतात. लोकांच्या धार्मिक भावनांचा राजकिय पक्ष व नेते पद्धतशीरपणे वापर करून घेतात.

भारतीय समाज व संस्कृतीच्या जडण-घडणीतून निर्माण झालेली समस्या म्हणजे संप्रदायवाद व स्त्रीभ्रुणहत्या होय. सांप्रदायिकता ही अतिशय गुंतागुंतीची धार्मिक भिन्नतेतून निर्माण झालेली सामाजिक समस्या आहे. याला सामाजिक, धार्मिक बाजू आहे तशीच सामाजिक-सांस्कृतिक बाजूही आहे. समुह श्रेष्ठतावाद, राजकिय दूराग्रह, इतर समुदायांकडे पाहण्याची पूर्वग्रहदूषित व संकुचित वृत्ती-प्रवृत्ती यातून संप्रदायवाद वाढीस लागतो. सांप्रदायिक तणावाचे रूपांतर दंगलीत वा हिंसाचारात होण्यास एखादं छोटं कारणही पुरेसे असते. सांप्रदायिकता जेवढी तीव्र तेवढा सांप्रदायिक हिंसाचाराची तिव्रता अधिक असते. त्यामुळे समाजात विस्कळीतपणा येतो. पराकोटीचा विध्वंस देशाच्या एकतेला, अखंडतेला आव्हान ठरतो. म्हणूनच या प्रकरणात संप्रदायवादाची संकल्पना व अर्थ आपण समजून घेणार आहोत. तसेच संप्रदायवादाची कारणे व त्यावरील उपाययोजनाचा अभ्यास करणार आहोत.

स्त्रीभ्रुणहत्या ही लिंगभेदभावातून निर्माण होणारी सामाजिक-सांस्कृतिक समस्या आहे. स्त्री-पुरूष हा जैविक भेद आहे. पण स्त्रीत्त्व व पुरूषत्त्वाची जडण-घडण, समाजाच्या अपेक्षेनुसार होत असते. त्यावर सांस्कृतिक रूढी, प्रथा-परंपरा, रिती-रिवाज यांचा प्रभाव असतो. पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांचा दर्जा दुय्यम आहे. पुरूष उच्च स्थानी व स्त्री कायम दुय्यम स्थानी आहे. गेली चार दशकं भारतातील स्त्रियांचं प्रमाण सातत्याने घटत आहे. नविन तंत्रज्ञानाने लिंगनिदान करणे व गर्भपात करणे सहज शक्य होऊ लागलं आहे. मुलीचा जन्माआधीच या जगात प्रवेश नाकारणारी समस्या स्त्रीभ्रुणहत्या समोर आली आहे. मुलींची घटती संख्या समाजावर अनेक प्रतिकूल परिणाम करू शकते. म्हणून आपण स्त्रीभ्रुणहत्येचा अर्थ, कारणे व उपाययोजनांचा अभ्यास करणार आहोत.

## २.२ उद्दिष्टे :

या घटकाच्या अध्ययनानंतर आपल्याला

१) संप्रदायवादाचा अर्थ कारणे आणि उपाययोजना समजून घेता येईल.

२) स्त्रीभ्रुणहत्या : अर्थ कारणे आणि उपाययोजना समजून घेता येईल.

## २.३ विषय विवेचन :

या घटकाचा अभ्यास तीन भागात विभागण्यात आला आहे. पहिल्या भागात संप्रदायवादाचा अर्थ स्पष्ट करण्यात आला आहे. दुसऱ्या भागात संप्रदायवादाच्या कारणांचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे. तिसऱ्या भागात सांप्रदायवादावरील उपाययोजनांचे विवेचन केले आहे. त्याचबरोबर स्त्री भ्रूणहत्या कारणे आणि उपाययोजना याची चर्चा केली आहे.

काही अपवादात्मक समाज सोडले तर जगात सर्वत्रच लिंगआधारित भेदभाव अथवा विषमता आढळून येते. स्त्री-पुरूषांमध्ये निसर्गत: असणारी असमानता सन्माननिय मानली जाते. कारण ती मानववंश वृद्धीसाठी आवश्यक आहे. प्राचीन कालखंडात स्त्रीचा दर्जा उच्च होता. त्यानंतर हळूहळू स्त्रीच्या दर्जात घसरण सुरू झाली. स्त्री म्हणजे परक्याचं धन, कुटुंबावरचं ओझं, घराण्याची अब्रु या चौकटीत बंदिस्त झालेली स्त्री नकोशी झाली. याउलट मुलगा म्हणजे मालमत्तेचा वारस, वंशाचा दिवा, कुटुंबाचा पोषणकर्ता व संरक्षणकर्ता यामुळे मुलांच्या जन्माचे स्वागत होऊ लागले. स्त्री ही सर्वस्वी पुरूषांच्या अधीन राहणारी त्याची दासी बनली. स्त्री माणूस आहे. तिच्या ठायी बुद्धी, भावना, विचार, धैर्य, करूणा, स्नेह असे गुण आहेत याचा समाजाला विसर पडू लागला. तिचे अस्तित्त्व उपभोगाचे साधन एवढेच उरले. स्वातंत्र्यानंतर भारतात स्त्रियांना समानतेचं स्थान प्राप्त झालं. स्वातंत्र्यापूर्वी व नंतरही स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाच्या, अत्याचाराच्या विरोधात कायदे केले गेले. तरीही स्त्रियांवरील अत्याचारात वाढच होताना दिसून येते. कायदे स्त्रियांना संरक्षण देऊ शकले नाहीत. समाजाची मानसिकता, स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन यात बदल झाला नाही आणि स्त्रियांवरील अत्याचारामध्ये हिंसेचे क्रुर पाशवी रूप स्त्रीभ्रुणहत्येच्या रूपाने समोर आले. म्हणूनच आपण स्त्रीभ्रुणहत्या ही समस्या अभ्यासणार आहोत. त्यामध्ये स्त्रीभ्रुणहत्येचा अर्थ, स्त्रीभ्रुणहत्या होण्यामागील कारणे व स्त्रीभ्रुणहत्या समस्येवरील उपाययोजना यांचा अभ्यास करणार आहोत.

१९ व्या शतकात पितृसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रीचे स्थान दुय्यम होते. जे पुरूषी ते श्रेष्ठ आणि जे बायकी ते कनिष्ठ अशी मनोधारणा पुरूषांची व स्त्रियांचीही झाली होती. त्यानंतर सातत्याने स्त्रियांचे समाजातील स्थान इतके खालावत गेले की 'मुलगी' नकोशी ठरू लागली आणि नव्या तंत्रज्ञानानं जन्माला येण्याआधीच त्यांना नाहीसे करता येऊ लागले. आज स्त्रीभ्रुणहत्या समस्येने गंभीर रूप धारण केले आहे. म्हणून आपण स्त्रीभ्रुणहत्येचा अर्थ व या समस्येची व्यापकता विशद करणार आहोत. दुसऱ्या भागामध्ये परामर्श घेणार आहोत व तिसऱ्या भागामध्ये स्त्रीभ्रुणहत्या रोखण्यासाठी करण्यात येतील अशा उपाययोजनांचे विवेचन केले जाणार आहे.

### २.३.१ सांप्रदायवादाचा अर्थ, कारणे आणि उपाययोजना (Meaning of Communalism) :

सांप्रदायिकता व संप्रदायिक हिंसाचार ही आपल्या देशात घडणारी बाब एक सामाजिक घटना आहे. संप्रदायिकता भारतीय समाजसंरचनेशी व त्या होणाऱ्या परिवर्तनाशी एकरूप झालेली आहे. संकुचित प्रादेशिक व सांस्कृतिक ऐक्यभावना जेवढी प्रबळ तेवढा सांप्रदायिक तणाव वाढतो. भारतामध्ये पंजाब, आसाम, केरळ, गुजरात, तामिळनाडू, व काश्मिर या राज्यात स्वहितरक्षण व वर्चस्वाच्या भावनेतून सांप्रदायिक हिंसाचाराच्या घटना घडत असतात. धार्मिक व पारंपरिक कट्टरतेमुळेच भारतात सामाजिक परिवर्तनात अडथळा निर्माण होतो. संप्रदायवाद नागरी भांडवलशाही पद्धतीत खोलवर रूजलेला आहे. त्यामुळेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जमात-ए-इस्लामी या सांप्रदायिक संघटना अस्तित्त्वात येतात. नागरी भांडवलशाही समाजातील लोकांच्या धार्मिक भावनांचा वापर करून लाभ उठविण्याचा प्रकार शिष्टजनांकडून होत असतो. अशा लोकांकडून लोकशाही असो वा नोकरशाही धर्मनिरपेक्षतेचा केवळ आभास निर्माण केला जातो. हे लोकसत्तेपुढे झुकतात कारण अधिकार व सत्ता हाच त्यांचा परमेश्वर असतो. सांप्रदायिक शक्ती मुक्त विचार, लोकशाहीचे तत्त्व मानत नाहीत. फक्त

राजकियता व स्वार्थ यांच्यासाठी महत्त्वाचा असतो. त्यामुळे सांप्रदायिक शक्ती अधिक प्रबळ होतात. म्हणूनच सांप्रदायवाद या गुंतागुंतीच्या सामाजिक घटनेचा अर्थ समजून घेण्यासाठी काही व्याख्यांच्याद्वारे संप्रदाय वादाचे स्वरूप समजून घेता येईल.

**१) लुईस ड्युमा –** '' सांप्रदायिकता म्हणजे निश्चयपूर्वक आग्रही स्वरूपाचा राजकिय समुदाय होय ''

(Louis Dumont - Communalism is a affirmation and assertion of the religious community as a political group.)

**२) बिपीनचंद्र –** '' एखाद्या लोकसमुहातील सदस्य विशिष्ट धर्माचे अनुयायी असल्यामुळे त्यांचे सामाजिक, राजकिय आणि आर्थिक हितसंबंध समान आहेत अशी श्रद्धा म्हणजे संप्रदायवाद होय.'' (Bipinchandra - Communalism is the belief that because a group of people follow a particular religion they have as a result, common social political and economic interests.)

**३) रणधीर सिंह –** '' एक विचारप्रणाली आणि वर्तनरीत यादृष्टीने, समकालीन भारतातील संप्रदायवाद म्हणजे शक्तीशाली सरंजामशाही, वसाहतवादाचा वारसा लाभलेल्या सखोल धार्मिक विभाजन झालेल्या आणि ऐतिहासिकदृष्ट्या विशिष्ट स्वरूपाचा भांडवलशाही विकास होत असलेल्या देशातील सत्ताधारी राजकारणाचा एक पैलू आहे. '' (Randhirsingh - Communalism in contemporary India as a ideology and practice is above all an aspect of the polities of the ruling classes in a society with a massive feadal colonial inhorltance deep religious divisions and undergoing its own historically specific form of sapalist capatalist development.)

वरील विश्लेषणातून सांप्रदायिकता म्हणजे काय हे समजून येईल. खालील काही मुद्द्यांचा अभ्यास केल्यास सांप्रदायिकतेचे स्वरूप अधिक स्पष्ट होईल.

१) धर्म, भाषा, जात, वंश यासारख्या निकषावर एका समुदायातील लोक दुसऱ्या समुदायाविरोधात वर्तन करतात.

२) संप्रदायिकता म्हणजे दोन समुदायातील भिन्नत्त्वामुळे निर्माण झालेला संशय, विद्वेष, शत्रुत्त्व आणि संघर्षाची भावना होय.

३) भारतात संप्रदायवादाचा प्रमुख आधार धर्म आहे.

४) धर्मरक्षणापेक्षा विशिष्ट हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी सांप्रदायिक शक्ती धर्माच्या नावावर राजकिय सत्ता व नेतृत्त्व टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतात.

५) धर्मावर श्रद्धा ठेवणे, धर्मास अनुसरून वर्तन करणे हे धार्मिकतेचे लक्षण आहे. परंतू राजकिय स्वार्थासाठी धर्माचा साधन म्हणून वापर करणाऱ्या व्यक्ती धार्मिक नसतात तर सांप्रदायिक असतात.

६) धार्मिक भावनेने केलेले व्यक्तिगत अथवा सामुहिक वर्तन, पूजा, यज्ञ, होम, प्रार्थना, नमाज पठण, विशिष्ट पोशाख परिधान करणे याला कर्मकांड म्हंटले जाते. परंतु सामुहिक कर्मकांडाला जेव्हा राजकिय स्वरूप प्राप्त होते तेव्हा सांप्रदायिकता प्रबळ होते.

७) सांप्रदायिक विचारसरणी एखाद्या देशापुरती मर्यादित नाही. ही विचारसरणी राष्ट्रहितविरोधी असली तरी नेते व पक्ष तिचा वापर राजकारणात शत्रु सारखा करतात.

८) मूलतत्त्ववादाचा सांप्रदायवादाशी जवळचा संबंध आहे. मूलतत्त्ववाद सत्तेशी व धर्माशी निगडीत असतो. मूलतत्त्ववादी सत्ता मिळवण्यासाठी त्यावर नियंत्रण ठेवतात.

**अ) सांप्रदायवादाची कारणे (Causes of Communalism) :**

भारतामध्ये विविधतेत एकता आहे असे अभिमानाने म्हटले जाते. परंतू प्रांतवाद, भाषावाद, जातीयवाद सातत्याने प्रकट होताना दिसतो. यावेळी एकतेची भावना कमकुवत असल्याचे दिसते. देशाचे ऐक्य धोक्यात येते तेव्हा समस्याजनक परिस्थितीला सामोरे जावे लागते. भारतामध्ये विविध धर्मामध्ये भिन्नत्त्व आहे, संघर्ष आहे. तसा संघर्ष विविध धर्मातील विभिन्न पंथामध्येही घडून आला आहे. हिंदू धर्मातील शैव व वैष्णव पंथामध्ये मुस्लिमांच्या शिया व सुन्नी पंथामध्ये तसेच ख्रिश्चनांच्या प्रोटेस्टंट व कॅथॉलिक पंथामध्येही संघर्ष घडत गेले आहेत हे इतिहास सांगतो. परंतु भारतावर दूरगामी, दिर्घकालीन परिणाम करणारा भीषण हिंसाचारात रूपांतर होणारा हिंदू-मुस्लिम संघर्ष हा व्यापक आहे. भारतात मुख्यत: हिंदू-मुस्लिम संषर्घ सातत्याने व मोठ्या प्रमाणात दिसतो. या सांप्रदायिकतेची व सांप्रदायिक हिंसाचारास पोषक ठरणारी कारणे खालील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) धार्मिक भिन्नत्त्वातून निर्माण होणारा दुरावा :**

भारतातील बहुसंख्याक हिंदू व लोकसंख्येने दुसऱ्या स्थानी असणारे मुस्लिम यांच्या प्रथा, परंपरा, श्रद्धा रितीरिवाज, पोषाख, विचारसरणी यामध्ये प्रचंड तफावत आहे. हिंदू बहुदेवतावादी, मूर्तीपूजेत रमणारे, गाय देवतेसमान मानणारे, पुर्नजन्मावर विश्वास असणारे व विवाह संस्कार मानणारे आहेत. तर मुस्लीम ऐकेश्वरवादी, मूर्तीपूजा न मानणारे, 'कुराण' या धर्मग्रंथातील वचनानुसार काटेकोर आचरण करणारे, विवाह हा करार मानणारे, दोन्ही समुदायांच्या भाषेत भिन्नता, जीवन जगण्याची पद्धती वेगळी. हिंदुमध्ये सण-उत्सव सार्वजनिकरित्या साजरे करण्यावर भर या सगळ्या बाबी दोन्ही धर्मामध्ये टोकाचे भिन्नत्त्व दाखवतात. त्यातूनच दुसऱ्या समुदायाविषयी त्यांच्या विचारसरणी विषयी खरे-खोटे पूर्वग्रह ठरलेले आहेत. त्यामुळे शुल्लक घटनेतूनही या दोन्ही समुदायांमध्ये तणाव निर्माण होतो.

**२) ऐतिहासिक घटनांचा प्रभाव :**

भारताच्या प्राचीन व मध्ययुगीन कालखंडातील इतिहास दोन्ही समुदायात कटुतेची भावना वाढवतो. हा इतिहास ब्रिटिश इतिहासकार जेम्स मिल्ट यांनी मांडला. प्राचीन हिंदू संस्कृती अत्यंत आदर्शवादी व समृद्ध होती असे हिंदू सांप्रदायवादी अभिमानाने मांडतात. परंतू मुस्लिमांच्या आक्रमणामुळे ही संस्कृती लयास गेली. याउलट मुस्लिम संप्रदाय असे मानतो की भारतीय संस्कृती समृद्ध करण्यात मुस्लिम राजवटीचे महत्त्वाचे योगदान आहे. या मुस्लिम राजवटी व मोगल सम्राटांचे राज्य आदर्श होते असे मानणारे मुस्लिम आहेत. परंतु मुस्लिम आक्रमकांनी हिंदूंना सक्तीने धर्मांतर करायला लावले. हिंदूंची मंदिरे लुटली, उद्ध्वस्त केली. हिंदू स्त्रियांशी जबरदस्तीने विवाह केले. मुस्लिमांना विरोध करणाऱ्यांना मोठ्या अन्यायाला, छळाला सामोरे जावे लागले. हा

इतिहास हिंदू समुदायात कटुता निर्माण करतो. याचा फायदा घेत काही संघटना हा इतिहास विसरू देत नाहीत. द्वेषाची भावना निर्माण करतात.

स्वातंत्र्यलढ्यात हिंदू-मुस्लिम खांद्याला खांदा लावून लढले होते. त्यांची एकी जड जावू लागल्यावर 'फोडा आणि राज्य करा' या नितीचा ब्रिटिशांनी अवलंब केला. मुस्लिमांमध्ये तुम्ही अल्पसंख्य आहात. तुम्हांला डावलले जाणार अशी असुरक्षिततेची भावना निर्माण केली. परिणामी मुस्लिम नेत्यांनी आपल्या राजकिय मागण्या पुढे रेटण्यासाठी ' मुस्लिम लिगची ' स्थापना केली. हिंदूनींही अखिल भारतीय संघटना स्थापन केली. महमदअली जीना यांच्या विचारातून द्विराष्ट्र सिद्धांत मांडला गेला. पूर्ण स्वातंत्र्य व धर्माच्या आधारावर विभागणी अशा मागण्या त्यांनी केल्या. फाळणीच्या रूपाने मुस्लिम नेत्यांनी धर्माला माध्यम बनवून राजकिय महत्त्वकांक्षा पूर्ण केली. फाळणीच्या काळात प्रचंड, अमानुष असा हिंसाचार घडून आला. कत्तली, बलात्कार, जाळपोळ अशा घटनांचे घाव दोन्ही समुदायांच्या स्मरणात कायमचे उरले. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर मोठ्या प्रमाणात मुस्लिम समुदायाने भारतात राहणे पसंत केले. परंतू या ऐतिहासिक घटना, घडामोडींचा प्रभाव विविध प्रसंगात, सांप्रदायवादाच्या रूपाने प्रकट होताना दिसतो.

### ३) मुस्लीम समुदायाची अलगतावादी प्रवृत्ती :

मानवतावादी म्हणविणाऱ्या बिटिशांनी आपल्या कुटनितीद्वारे मुस्लिम समुदायात सांप्रदायवाद रूजविला. त्यांच्यामध्ये हिंदूबद्दल दुरावा निर्माण झाला. त्यांनी आपल्या जगण्यात अलगतावादी प्रवृत्ती निर्माण केली. असे मुस्लिम राष्ट्रीय प्रवाहापासून अलिप्त फटकून राहू लागले. बहुसंख्य मुस्लिम समुदाय धर्मनिरपेक्ष, राष्ट्रवादी विचारसरणी व राष्ट्रीय राजकारणापासून दूर राहतात. त्यांनी आपली स्वतंत्र जीवनपद्धती स्विकारली आहे. स्वतंत्र अस्तित्त्व व स्वतंत्र ओळख असण्याबाबत ते आग्रही असतात. काही मुस्लिम संघटना मुलतत्त्ववादाचे समर्थन करतात. यामुळे दोन्ही समुदायात दुरावा व अविश्वासाची भावना निर्माण होते जी सांप्रदायवादाच्या वाढीस कारणीभूत ठरते.

### ४) सांप्रदायिक पक्ष व संघटनांचा प्रभाव :

भारतामध्ये 'धर्म' हे राजकिय सामाजिकत्त्वाचे महत्त्वाचे साधन आहे. भारतीय राजकिय पक्ष व संघटनांच्या विचारसरणीत त्याचे प्रतिबिंब दिसून येते. दोन्ही समुदायातील राजकिय नेतृत्त्व अभिजन वर्गाकडे असलेले दिसते. आपले राजकिय हितसंबंध जोपासण्यासाठी ते धर्माचा वापर करतात. सांप्रदायवादातून घडून येणारा हिंसाचार, त्याची भीषणता याची जाणीव त्यांना असते. सांप्रदायिक हिंसाचारात त्यांचा धर्माशी संबंध नाही. खऱ्या अर्थाने धार्मिक नाहीत तेच पुढे असतात. असे नेते समाज, पोलीस, न्यायलय यांना वेठीस धरतात. बेलगाम वक्तव्य करतात. अशा नेतेमंडळीचं माध्यमातून उन्नत्तीकरण होत असतं. भारतामध्ये अनेक सांप्रदायिक संघटना कार्यरत आहेत. मुस्लिम लीग, जमात-ए-इस्लामी, हिंदू महासभा, अकाली दल, विश्व हिंदू परिषद इ. अशा संघटना कधी उघड तर कधी छुप्या कारवाया करत असतात. त्यामुळे सांप्रदायिकतेत वाढ होते. स्वत:ला धर्मनिरपेक्ष म्हणवणारे राजकिय पक्षही निवडणूकी दरम्यान सांप्रदायिक संघटनांशी युती करून सत्ता मिळवण्याचा प्रयत्न करतात. स्वत: धार्मिक नसलेले हे नेते सामान्य जनतेला धर्माचे आवाहन करून निवडणुका

लढवतात. सामान्य जनतेलाही हा उमेदवार आपल्या जातीचा आहे, धर्माचा आहे ही पात्रता पुरेशी वाटते. असे पक्ष, संघटना व त्यांची नेतेमंडळी केवळ राजकिय महत्त्वकांक्षेपोटी धर्माला माध्यम बनवतात. त्यामुळे सांप्रदायवाद वाढीस लागतो.

**५) दारिद्र्य व बेकारी :**

कोणत्याही समाजात मोठ्या प्रमाणात दारिद्र्य व बेकारी असेल तर आत्मविश्वासाअभावी नैराश्यजनक प्रवृत्ती निर्माण होते. जेथे मागासलेपणा, निरक्षरता, दुर्लक्षितता आहे, तेथे बहुसंख्येने युवक बेरोजगार असतील तर ते सहजपणे मुलतत्त्ववाद पसरवणाऱ्या धार्मिक संघटनांच्या जाळ्यात सहजपणे अडकतात. भारतात असा बेकार युवकांचाच वापर सांप्रदायिक दंगलीच्यावेळी करून घेतला जातो. स्वातंत्र्यापूर्वी पासून मुस्लिमांच्या तुलनेत हिंदूचा आर्थिकस्तर उंचावलेला होता. हिंदू चांगल्या पदावर नोकरीत व व्यापार, उद्योगात वरच्या स्थानी असल्याने आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत होते. स्वातंत्र्यानंतर जमिनदारीचा कायदा व इतर धोरणांमुळे मुस्लिमांचे पिढ्यान्पिढ्याचे उद्योग-व्यवसाय अडचणीत आले. स्वातंत्र्यानंतर आर्थिक विकासाची मर्यादित संधी त्यांना लाभली. याशिवाय बहुसंख्य मुस्लिम आधुनिक, विज्ञानवादी, तत्त्वज्ञानाच्या शिक्षणापासून दूर राहिले आहेत. त्यांच्या शैक्षणिक मागासलेपणामुळेही त्यांचा आर्थिक स्तर उंचावलेला नाही. या समुदायात असलेली आर्थिक सामाजिकदृष्ट्या वंचिततेची भावना त्यांच्या मनात हिंदूबद्दल आकस निर्माण करते हे सांप्रदायितेचे कारण ठरते.

**६) हिंदूत्त्ववादी विचारसरणीचा वाढता प्रभाव :**

हिंदूत्त्ववादी विचारसरणीमध्ये झालेली वाढ व हिंदूत्त्ववादी प्रवृत्तीचे बळकटीकरण यातून सांप्रदायिक तणाव वाढीस लागतो. हिंदू महासभा, विश्व हिंदू परिषद, हिंदू धर्मरक्षा समिती, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यासारख्या धार्मिक संघटना हिंदूना अनुकूल निर्णय घेतले जावे यासाठी सरकारवर दबाव टाकण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या विचारधारेनुसार प्रत्येक मुस्लिम पाकिस्तान धार्जिणा व देशविरोधी असतो. दोन देशात क्रिकेटची मॅच चालू असली तरी त्याला दोन देशातील युद्धाचे स्वरूप दिले जाते. अशा घटना अल्पसंख्याकाविषयी द्वेषाची भावना निर्माण करतात. त्यातून हिंदूत्त्ववादी सांप्रदायिक शक्तीचे बळकटीकरण केले जाते. अल्पसंख्याकांना दिले जाणारे संरक्षण व सवलती यांना ते विरोध करतात. टोकदार हिंदूत्त्ववादी अंधभक्ती सांप्रदायिकवादास कारणीभूत ठरते.

**७) राजकारणाचे सांप्रदायिकरण :**

भारतीय निवडणुकीचे राजकारण म्हणजे अमर्याद पैशाची उधळण व अत्यंत टोकाची तीव्र स्पर्धा होय. विविध राजकिय पक्ष निवडणुका जिंकण्यासाठी बेकायदेशीर साधने व बऱ्यावाईट मार्गांचा अवलंब करतात. मतांचे राजकारण करण्यासाठी सांप्रदायिक तणाव, दंगली घडवून आणल्या जातात. प्रत्येक राजकिय पक्ष जाती धर्माचा वापर करून निवडणुका लढवतात. राजकारणाचे झालेले सांप्रदायिकरण भारतात सांप्रदायवाद वाढवते. कोणताही पक्ष वा नेता हिंसाचारात वा दंगलीत निष्पापांचे बळी जातात याची पर्वा करत नाहीत. आपला राजकिय स्वार्थ साधताना फक्त आपल्या हितसंबंधाचाच विचार केला जातो.

**८) देशाच्या अंतर्गत घटना-घडामोडीत इतर देशांचा हस्तक्षेप :**

भारतात घडणाऱ्या घटना. घडामोडीत व अंतर्गत राजकारणात शेजारील देश हस्तक्षेप करतात. त्यांच्याकडून सातत्याने गैरसमज व संशयाचे वातावरण निर्माण होईल अशा अफवा पसरवल्या जातात. भारतात अराजकता माजावी, सांप्रदायिक तणाव निर्माण व्हावा यादृष्टीने प्रयत्न केले जातात. शिख अतिरेकी व पाकिस्तान भारतातील युवकांना देत असलेल्या चिथावणीमुळेच पंजाब व जम्मू-काश्मिर मध्ये सांप्रदायिक हिंसाचार घडून आले. सीमाभागातील देशांकडून केला जाणारा हस्तक्षेप थोपवता येत नाही. अरब राष्ट्रे अशाच प्रकारे पेट्रोलचा पैसा भारतात मशिदी बांधण्यासाठी पुरवतात व संशयास्पद वातावरण निर्माण करतात. भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे हे साऱ्या जगाला माहित असताना भारत व पाकिस्तान संघर्षास धर्मच कारण असल्याचे जगासमोर मांडले जाते. भारतात धार्मिक विसंवाद जीवंत ठेवण्यात बाहेरच्या काही देशांचे हितसंबंध गुंतले आहेत.

**९) उद्योगधंद्यामध्ये विशिष्ट समुदायाची मक्तेदारी :**

भारतामध्ये विशिष्ट जाती-धर्माच्या लोकांची विशिष्ट व्यापार, उद्योग, कारागिरी, व्यवसायावर मक्तेदारी निर्माण झाली आहे. त्या व्यवसायात शिरणाऱ्या इतर जाती-धर्मियांना आपला जम बसवता येत नाही. त्यामुळे त्यांच्यात वितुष्टता निर्माण होते व सांप्रदायवाद वाढतो. भारतात मिरज, अलिगढ, मालेगाव, भिवंडी या शहरातून अनेक पिढ्यांपासून काही विशिष्ट उद्योगधंद्यात जम बसवलेले मुस्लिम आहेत. त्यांच्यातील आर्थिक संपन्नता व सामाजिक दर्जातील वाढीमुळे ते राजकारणात उतरू लागले आहेत. ते स्थानिक पातळीपासून केंद्रीय स्तरापर्यंत राजकिय घडामोडीत सहभागी होतात. त्यांच्या राजकिय महत्त्वकांक्षा वाढतात. अशा लोकांचे परंपरागत व्यापार, व्यवसाय वा राजकारणातील प्रस्थ कमी व्हावे असे स्पर्धकांना वाटत असते. तेव्हा संप्रदायवादास चालना दिली जाते. लोकांची माथी भडकवली जातात. अशा भागात दंगली, हिंसाचार घडवून आणल्या जातात.

### २.३.३ संप्रदायवादावरील उपाययोजना (Remedy of Communalism) :

धार्मिक विसंवादामुळे समाजामध्ये दुही माजते. सांप्रदायिक तणाव निर्माण होतो. अशावेळी एखाद्या क्षुल्लक घटनेचे रूपांतर सांप्रदायिक हिंसाचारात होते. संपूर्ण समाज, शहर, गाव, कुटुंब उद्धस्त होतात. सामाजिक ताणतणावात वाढ होते. तरूणांमध्ये सुडाची प्रेरणा निर्माण होते. डोळ्यासमोर घडलेला हिंसाचार, जाळपोळ, भोसका-भोसकी, लुटालुट, रक्तपात, स्त्रियांवरील बलात्कार यामुळे मानसिक धक्का बसतो. हिंसाचारातून वाचलेले काही कायमचे मानसिक रोगी बनतात. हिंसाचारात उत्पादनक्षम गटातील व्यक्ती मोठ्या प्रमाणात बळी जातात किंवा जखमी होतात. तेथील आर्थिक घडी बसवणे खूप अडचणीचे ठरते. अशा समाजाला पुन्हा उभं करणं, गुन्हेगारांना शिक्षा करणं, पुन्हा शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी शासनाला प्रचंड आर्थिक भार सहन करावा लागतो. सांप्रदायिक दंगलीनंतर दोन्ही समुदायातील दुरावा वाढीस लागतो. धार्मिक कर्मकांडास अधिक चालना मिळते. देशाच्या प्रगतीत, वैज्ञानिक प्रगतीत अडथळे निर्माण होतात. देशाच्या धर्मनिरपेक्ष तत्त्वास व राष्ट्रीय एकात्मतेस धोका पोहोचतो. म्हणून या समस्येवरील उपाययोजनांचा गांभिर्याने विचार करणे गरजेचे आहे. सांप्रदायवादावरील उपाययोजना खालील प्रमाणे स्पष्ट करता येतात.

**१) कुटुंबातून सुयोग्य व्यक्तीमत्त्वाची जडण-घडण :**

व्यक्तिचे व्यक्तिमत्त्व, विचारसरणी, मते, प्रवृत्ती यावर कुटुंबाचा जबरदस्त प्रभाव असतो. कुटुंबिय कट्टर धार्मिक व इतर धर्मियांकडे पूर्वग्रहदूषितपणे पहात असतील तर मुलांची जडण-घडण तशीच होते. मुलांना वाढविताना त्यांना धार्मिक पूर्वग्रहापासून दूर ठेवले तर त्यांच्यात मानवतावादी मुल्यांची जोपासना होईल. मानवाप्रती संवेदनशीलता असणारे व्यक्तीमत्त्व समाजीकरणाच्या प्रक्रियेतून घडवता येईल. कुटुंबिय जर दुसऱ्या जाती-धर्माच्या कार्यक्रमात, सण-समारंभामध्ये सहभागी होत असतील तर मुलांना एकमेकांच्या रितीरिवाजांची, प्रथापरंपरांची ओळख होते व एकमेकांकडे पाहण्याची संशयीवृत्ती नष्ट होते. धर्म जरी वेगळा असला तरी तीही माणसे आहेत. त्यांनाही आपल्या सारखी सुख दुःखे आहेत याची ओळख झाल्याने मुलांमध्ये सहिष्णु, उदारमतवादी, सर्वांना सामावून घेणारी विचारसरणी रूजते. सुयोग्य व्यक्तीमत्त्व घडवण्यात कुटुंबाने महत्त्वाचा वाटा उचलल्यास पूर्वग्रहातून होणारे धार्मिक भेदभाव कमी होतील.

**२) शिक्षण व्यवस्था व शिक्षकांची महत्त्वपूर्ण भूमिका :**

विद्यार्थी शिक्षण घेत असताना दिर्घकाळ शिक्षण प्रक्रियेत असतो. यावेळी त्याला लाभणारे वर्गमित्र, शिक्षक व अभ्यासक्रमातून झालेले संस्कार यांचा त्याच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पडतो. शैक्षणिक संस्थामधून सर्वांना समान कोणत्याही भेदभावापासून दूर ठेवणारे शिक्षण मिळाले पाहिजे. शिक्षकांनी जात, धर्म, पूर्वग्रह या पासून दूर राहून जीवन जगण्याचे शिक्षण विद्यार्थ्यांना दिले पाहिजे. अभ्यासक्रमातून विज्ञान, तंत्रज्ञानाचे आधुनिक शिक्षण देतानाच मुल्यांची जोपासना करणारे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे. अभ्यासक्रमातून जेव्हा सर्व धर्मांचा तुलनात्मक अभ्यास केला जाईल. तेव्हा प्रत्येक धर्म कल्याणकारी आहे याची जाण निर्माण होईलच. पण त्याबरोबर एकमेकांच्या धार्मिक कर्मकांडाकडे संशयीवृत्तीने पाहण्याचा दृष्टिकोन बदलेल. राजकारणात धर्माचा वापर स्वार्थासाठी केला जातो. याची जाणीव त्यांना शिक्षणातून होईल तेव्हा सुजाण नागरिक निर्माण होतील. धार्मिक दंगलीतील अशी कितीतरी उदाहरणे आहेत की जात-धर्म विसरून इतरांचे प्राण वाचवले आहेत. मदत केली आहे. हा त्यांच्यावर झालेल्या मानवतावादी संस्कारांचा परिणाम असतो.

**३) राष्ट्रीय एकात्मतेची भावना रूजवणे :**

भारतामध्ये मोठ्या प्रमाणात विविधता आहे. परंतू जाती-धर्मभेद, भाषावाद, प्रांतवाद याच्या रूपाने कधी ना कधी संघर्ष होत असतो. तरीही स्वातंत्र्यानंतरही ही अखंडता टिकून आहे. याचा अभिमान हा राष्ट्राभिमान असतो. यातूनच धर्म, पंथ, जात यापेक्षाही राष्ट्रहित महत्त्वाचे आहे याची जाणीव लोकांना होते तेव्हा राष्ट्रीय एकात्मता निर्माण होते. यातून आपले राष्ट्र, राष्ट्राची लोकशाही घटना, धर्मनिरक्षतेचे तत्त्व याविषयी अभिमान जागृत होईल. विविधतेत एकता हे मूल्य जेव्हा रूजेल तेव्हा राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण होईल.

**४) समान विकासावर भर देणे :**

भारतामध्ये आर्थिक व सामाजिदृष्ट्या मागास राहिलेले व शिक्षणाच्या संधीपासून वंचित राहिलेल्या, तुलनात्मकरित्या आर्थिक दर्जा खालावलेल्या मुस्लिम समुदायाचा अभ्यास करून त्यांना आपला दर्जा उंचावण्यासाठी

विशेष संधी, सवलती दिल्या पाहिजेत. रंथनाथ मिश्रा समितीने मुस्लिम समुदायाच्या मागासलेपणाचा अभ्यास करून त्यांना राज्य व केंद्र सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण द्यावे अशी शिफारस केली. सांप्रदायिक हिंसाचारातून निष्पाप व दुर्बल समुदायाची मोठी हानी होते. त्यांच्यावर अन्याय होतो. अशावेळी त्यांना न्याय देण्यासाठी चौकशीसाठी शासनाने आयोग नेमावेत. गुजरात दंगलीनंतर चौकशीसाठी व अन्यायग्रस्त लोकांना न्याय देण्यासाठी नानावटी समिती नेमण्यात आले. तसेच २००५ मध्ये मुस्लिम समुदायाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी सच्चर समिती नेमण्यात आली. या समितीने मुस्लिम समुदायाचा दर्जा उंचावण्यासाठी अनेक उपाययोजना सुचवल्या व विकासाच्या प्रवाहात सामावून घेण्यासाठी मार्ग सुचवले. अशा पद्धतीने विविध आयोग व समित्यांच्या शिफारशीनुसार मुस्लिमांना आपला दर्जा उंचावण्यासाठी संधी प्राप्त करून दिल्यास सामाजिक एकता प्रस्थापित होईल.

**५) सांप्रदायिक पक्ष व संघटनांवर बंदी घालणे :**

संप्रदायवादाच्या वाढीचे प्रमुख कारण सांप्रदायिक पक्ष व संघटना आहेत. म्हणूनच शासनाने अशा पक्ष व संघटनांवर त्यांच्या विध्वंसक कारवाया व छुप्या अजेंड्यावर बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे. अशा संघटनांचे नेते प्रक्षोभक विधाने व वक्तव्य करून धार्मिक भावना कलुषित करतात. अशा नेत्यांवर कायदेशीर कारवाई होईल याची काळजी घेतली पाहिजे. सांप्रदायिक दंगलीत, हिंसाचारात या संघटनांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग असतो अशा संघटना व पक्षांवर बंदी घातल्यास, कडक कायदेशीर कारवाई केल्यास समाजावर त्याचे सकारात्मक परिणाम होतील.

**६) बेरोजगार तरूणांना विधायक कामात गुंतवणे :**

संधीसाधू राजकारणी व धर्मगुरू हे बेरोजगार तरूणांचा वापर विध्वंसक कारवायात करून घेतात. बेकारी, रिकामेपण, आर्थिक विवंचनेत अडकलेल्या तरूणांची माथी भडकवली जातात. असे सक्रिय कार्यकर्ते सांप्रदायिक हिंसाचाराच्या अग्रभागी असतात. अशा तरूणांना किमान विधायक राष्ट्रीय कामात गुंतवण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्या कार्यक्षमतेस वाव मिळेलच. शिवाय विधायक कामातून राष्ट्रवादाची भावना रूजेल. मंदिर-मस्जिदीपेक्षा मुलभूत गरजा, आरोग्य, शिक्षण महत्त्वाचे आहे याची जाणीव त्यांना होईल. पोकळ धर्माभिमान आपल्याला व कुटुंबाला उध्वस्त करतो हे जेव्हा त्यांना समजेल तेव्हा असे बेकार तरूण स्वार्थी राजकारणाचे बळी ठरणार नाहीत.

**७) साहित्य व चित्रपट माध्यमांचा सकारात्मक उपयोग :**

आपल्या देशात अनेक संत, महात्मे होऊन गेले. त्यांनी आपल्या विचारातून, लेखणीतून, साहित्यातून उदारमतवादी, सहिष्णू, मानवतावादी मूल्य रूजवण्याचा प्रयत्न केला. अशा साहित्याचा प्रसार, प्रचार झाला पाहिजे. काही लेखक, कवी आपल्या लिखाणातून अनेक समस्या, प्रश्न, धर्म, ज्ञान, राजकारण यावर भाष्य करतात. यातून धार्मिक सुसंवादाचे पूल बांधले जातात. द्वेषाने मूठभर लोकांचा फायदा होतो व संपूर्ण समाज भरडला जातो. याचे वास्तव चित्रण समाजाच्या पोषणासाठी उपयुक्त असते. अशा साहित्याला पुरस्कृत केले पाहिजे.

भारतामध्ये मनोरंजनाचे माध्यम म्हणून चित्रपट अत्यंत लोकप्रिय आहेत. जे चित्रपटाच्या माध्यमातून समाजातील वास्तव्यावर प्रकाश टाकला जातो. त्यातून लोकशिक्षणच होत असते. समाजाची मानसिकता बदलून सहिष्णुता, मानवतावाद, बंधुभाव, देशप्रेम चित्रपटातून प्रभावीपणे रूजते.

**८) जनसंपर्क माध्यमांची जबाबदारी व त्यांच्यावर अंकुश ठेवणे आवश्यक :**

जनसंपर्क माध्यमे देशात घडलेल्या घटना, घडामोडींचे विश्लेषण करत असतात. अलिकडच्या काळात इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वेगवान प्रसार झाला आहे. शे-दोनशे वाहिन्यांच्या या जमान्यात आपलेच चॅनेल अग्रभागी असावे यासाठी त्यांच्यात स्पर्धा असते. अशावेळी कशाचेही तारतम्य न बाळगता अतिरंजित बातम्या सांगितल्या जातात. नेत्यांनी केलेल्या प्रक्षोभक विधानाचे वारंवार प्रक्षेपण केले जाते. एखाद्या घटनेत माणसाच्या जीवापेक्षाही त्याचा धर्म कोणता याविषयी उथळ चर्चा केली जाते. अशा बाबी समाजातील विसंवाद, सांप्रदायिक तणाव वाढीस पोषक ठरतात. म्हणूनच जनसंपर्क माध्यमांनी जबाबदारपणे, नि:पक्षपातीपणे, घटनेचे वास्तव दर्शविणाऱ्या बातम्या प्रसारित केल्या पाहिजेत. सांप्रदायिक दंगली प्रसंगी तारतम्य बाळगून बातम्या प्रसारित केल्यास दंगली आटोक्यात येऊ शकतात. काही वेळा राजकिय पक्ष माध्यमांना हाताशी धरून अवास्तव, भडक बातम्या देतात. याचे समाजावर विपरीत परिणाम होतात. म्हणून जनसंपर्क माध्यमे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे यावर शासनाचा अंकुश असला पाहिजे.

**९) सांप्रदायिक दंगलीत पोलीस शासन यंत्रणेचा कार्यक्षम सहभाग :**

पोलीस आपल्या गुप्तहेर व खबऱ्यांद्वारे गुन्हेगारी कृत्यांचा शोध घेत असतात. त्याचपद्धतीने सांप्रदायिक तणाव निर्माण झाल्याचा सुगावा लावून ते दंगली व हिंसाचार रोखू शकतात. ज्या भागात दंगली घडल्या तेथे नि:पक्षपातीपणे दंगलखोरांना पकडणे व त्यांना न्यायालयासमोर विनाविलंब उभे करण्याची काळजी घेतली पाहिजे. अशा घटनात स्वतंत्र न्यायालये स्थापून, गुन्हेगारांना कायद्यातील आधार घेवून सुटता येऊ नये याची दक्षता घेतली पाहिजे. अशा गुन्हेगारांना कडक शासन होते असे लक्षात आल्यास इतर दंगलखोरांवर वचक बसेल. याशिवाय दंगलीत झळ बसलेल्यांना वेळीच मदत करणे, त्यांना नोकरीमध्ये संधी देणे, त्यांचे व्यवसाय पुन्हा उभे करण्यासाठी आर्थिक मदत केल्यास त्यांना दिलासा मिळेलच व शासनावरील विश्वास वाढेल. भिवंडी सारख्या संवेदनशील भागात पोलीस यंत्रणेने दोन्ही समुदायातील मान्यवर व्यक्तींना घेऊन मोहल्ला समिती स्थापन करून दंगल रोखण्याचा प्रयत्न केला. त्याच पद्धतीने संवेदनशील क्षेत्रात, गावात दोन्ही समुदायातील मान्यवर व्यक्तींना एकाच व्यासपीठावर आणल्यास धार्मिक सण, उत्सवाच्या प्रसंगीही शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित होईल. प्रक्षोभक कृत्य, वक्तव्य करणाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पकडता येते. अशा समाजकंटकांवर कोणतीही दयामाया न दाखवता कठोर कारवाई केली पाहिजे. पोलीस व शासनसंस्थेने अशाप्रकारे कार्य केल्यास त्यांच्यावर निरपराध जनता विश्वास ठेवते.

## २.३.२ स्त्रीभ्रुणहत्या : अर्थ, कारणे व उपाययोजना

## (Female Foeticide : Meaning, Causes and Remedies)

### अ) स्त्रीभ्रुणहत्या : अर्थ (Female Foeticide : Meaning) :

वास्तवता लिंगनिदान या शब्दातच मुलगा व मुलगी हा भेदभाव आढळतो. स्त्रियांचा दर्जा सातत्याने खालावत चाललेल्या पुरूषसत्ताक भारतीय समाज व्यवस्थेत मुलगी हे नको असणारे अपत्य आहे. तिच्या जन्माचे कधीच स्वागत होत नाही. पूर्वी भारतातील काही राज्यांमध्ये स्त्री अर्भकांच्या जन्मानंतर लगेच हत्या केल्या जात. आज सर्वच समाजात गर्भलिंगनिदान तंत्रामुळे स्त्रीभ्रुणहत्या हा अमानुष प्रकार समाजामध्ये रूढ झाला आहे. त्यामुळे गर्भजलचिकित्सा व सोनोग्राफी तंत्राचा वापर करून गर्भलिंगनिदान व गर्भपाताने मुलगी नष्ट करणे सोपे झाले आहे. भारतीय समाजामध्ये धोकादायकरित्या स्त्रियांच्या प्रमाणात घट होत आहे. यामुळेच स्त्रीभ्रुणहत्या ही समस्या निर्माण झाली आहे. ''गर्भलिंगनिदान करून बेकायदेशीररित्या मुलीचा गर्भ काढून टाकणे, नष्ट करणे म्हणजे स्त्रीभ्रुणहत्या होय.'' स्त्री-पुरूष प्रमाणाचा समतोल बिघडण्याचे मुख्य कारण स्त्रीभ्रुणहत्या होय. नैसर्गिकरित्या जन्मणाऱ्या मुलींचे प्रमाण अभ्यासल्यास असे दिसते कि गेल्या दशकभरात 'एक कोटी' मुलींना या जगात प्रवेश करण्यापूर्वीच नष्ट केले आहे. कायदा होऊनही मुलगी नकोच म्हणणारे पालक व वैद्यकीय ज्ञानाचा बाजार मांडणारे तज्ञ कायद्यातील पळवाटांचा फायदा घेत हा मानवतेला काळिमा फासणारा धंदा करतात. मुळात समाजाचीच मानसिकता मुलींच्या जन्मावर उठली असल्याने या समस्येने गंभीर रूप धारण केल्याचे दिसते.

**स्त्रीभ्रुणहत्या समस्येची व्यापकता :**

प्राचीन काळात बरोबरीचा असलेला स्त्रीचा दर्जा उत्तर वैदिक कालखंडापासून खालावत गेला. पितृसत्ताक व्यवस्थेत स्त्रियांचं अस्तित्व चूल आणि मूल या मर्यादेत गृहित धरलं जाऊ लागलं. १९ व्या शतकातील समाजसुधारकांच्या प्रयत्नामुळे स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर स्त्रियांना संरक्षण देणारे अनेक कायदे करण्यात आले. म्हणून स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण कमी झाले असे म्हणता येत नाही. उलट विविध रूपातील अत्याचाराचे प्रकार म्हणजे स्त्रीभ्रुणहत्या होय. गेल्या सहा दशकातील लिंग गुणोत्तराच्या आकडेवारीतून असे निष्पन्न होते की दर हजारी पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण सातत्याने घटत आहे. United Nations Fund for Population Activities च्या अंदाजानुसार २००१ ते २००२ या वर्षात भारतात ६ लाख मुलींना जन्मालाच येऊ दिलेलं नाही. अर्थतज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते भारताने आतापर्यंत ३१ दशलक्ष मुली हरवल्या आहेत. त्यातूनच नाहीशा होणाऱ्या मुली (Missing Girls) ही संकल्पना पुढे आली. मुलींच्या आरोग्याकडे व विकासाकडे हेतुपूर्वक केले जाणारे दुर्लक्ष याचे कारण आरोग्य सुविधा व पोषणापासून स्त्रिया वंचित रहात असतील तर यांचा मृत्यूदर वाढतो याचा अनुभव ० ते ६ वयोगटातील मुला-मुलींच्या बाललिंग गुणोत्तराच्या नामावलीतून येतो. नैसर्गिकरित्या मुलींमध्ये असणाऱ्या प्रतिकार क्षमतेमुळे १०५० मुलींमागे १००० मुलं हे नैसर्गिक प्रमाण आहे. परंतू मुलींच्या आरोग्याबाबत केलेल्या भेदभावामुळे १९९१ च्या जनगणनेतील बाललिंग गुणोत्तर राजस्थान - ८८३, महाराष्ट्र - ८८३, पंजाब - ८७५, व हरियाणा - ८१९ इतकं घटलं होतं. त्या दशकामध्ये पंजाब,

हरियाणात ''आज ५०० रू. खर्च करा व भविष्यात खर्च होणारे ५ लाख रू. वाचवा'' अशा जाहिराती उघडपणे केल्या जात.

स्वातंत्र्यानंतर भारतात गर्भपाताला कायदेशीर परवानगी नव्हती तेंव्हा अघोरी, अशास्त्रीय मार्गाचा अवलंब करून गर्भपात केले जात. त्यामुळे स्त्रीच्या जीवास धोका पोहचत असे. संसदेमध्ये यावर चर्चा झाली व १९७१ मध्ये MTP (Medical Termination of Pregnancy Act) कायदा पास झाला. गर्भपाताला कायदेशीर मान्यता मिळाली. लोकसंख्या धोरणानुसार छोट्या कुटुंबाचे महत्त्व वाढले होते. त्यासाठीही उपयुक्त ठरले. त्यापूर्वीच वैद्यकीय क्षेत्रामध्ये 'गर्भजल परीक्षा' (Amnioccentesis) हे नव तंत्र भारतात आलं होतं. गर्भातील विकृती शोधणे व त्यानंतर गर्भपात डॉक्टरांच्या सल्ल्याने केला जात असे. परंतू गर्भजल परीक्षेतून गर्भाचे लिंग ही कळत असे. गर्भजल परीक्षेमुळे लिंगनिदान करणे शक्य झाले. १९८१ मध्ये मुंबईतील एका बहुराष्ट्रीय कंपनीतील पुरूष कर्मचाऱ्यांची वैद्यकीय प्रतीपूर्ती बिले येत. त्यातील बहुसंख्य बिलं पत्नीच्या गर्भपाताची व त्यापूर्वी केलेल्या चाचणीची असत. याचा शोध या कंपनीने एका स्त्री संघटनेच्या मदतीने केला असता गर्भलिंगनिदान केले जात असल्याचे उघडकीस आले. त्यानंतर गर्भलिंगनिदान विरोधी अभियानाने जोर धरला. परंतू भारतात १९९० पासून गर्भजलपरीक्षा केली जात होती व गर्भपाताचा कायदा हा १९७१ मध्ये करण्यात आला. सुशिक्षित, उच्च-मध्यमवर्गीय छोट्या कुटुंबाला पसंती देऊ लागले होते परंतू 'मुलगा' हेच त्यांचे हवे असणारे अपत्य होते. पहिली मुलगी असल्यास लिंगनिदानाचे प्रमाण अधिक होते.

याचकाळात (Ultrasound Sonography) तंत्रज्ञान भारतात दाखल झाले. सोनोग्राफी अतिशय सोपी व प्रयोगशाळेची गरज नसलेली पद्धती होती. त्यामुळे ग्रामीण भागातही ही सोनोग्राफी केंद्र वाढायला लागली. १९८० च्या दशकात खाजगी लिंगआधारीत केंद्राचा भारतभर प्रसार झाला. 'सेहत' (सेंटर फॉर इनक्वायरी इन टू हेल्थ अँड अलाईड थीम्स, मुंबई) या संस्थेने महाराष्ट्रामध्ये लिंग गुणोत्तर प्रमाणाचा अभ्यास केला. त्यांच्या निष्कर्षानुसार १५ टक्के गर्भपात हे कायद्यानुसार होतात. महाराष्ट्रासाठी ही धोक्याची घंटा होती. म्हणूनच १९८८ मध्ये महाराष्ट्राने लिंगआधारीत गर्भपात विरोधी कायदा केला. अशा प्रकारचा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य ठरले. पुढे इतर राज्यांनीही कायदे केले. भारतभर लागू होणारा १९९४ चा जन्मपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंध कायदा (Pre-Natal Dignostic Techniques Act 1994) लागू करण्यात आला. या कायद्याने लिंगनिवड करणारे केंद्र, लिंगनिदान करणारी व्यक्ती, मध्यस्थी करणारी व्यक्ती, स्वत: गर्भवती स्त्री, सोनोग्राफी सेंटर्सची जाहिरात करणारे यांना दोषी धरले जात होते. परंतू २००१ च्या जनगणनेतून मुलीचं प्रमाण घटलेलंच आढळून आलं. पंजाब - ७९८, हरियाणा - ८२०, गुजरात - ८८३, हिमाचल प्रदेश - ८९७ अशी काही राज्यात मुलींच्या प्रमाणात चिंताजनक घट दिसून येत होती. महाराष्ट्र ही त्यावेळी ९३३ वर असमाधानकारक स्थितीत होते. हे आकडे कायदा धाब्यावर बसवला जातोय याचे निदर्शकच होते. म्हणूनच २००५ साली पुन्हा कायद्यात दुरूस्ती करून PCPNDT (Pre-Conception and Pre-Netal Duagnostic Techniques Act 2003) गर्भधारणापूर्व आणि प्रसुतिपूर्व गर्भलिंग निदान कायदा कडक करण्यात आला. यामध्ये कृत्रीम गर्भधारणेसाठी सुद्धा लिंगनिवड केली जात असल्याने त्याचाही या कायद्यात समावेश करण्यात आला.

Year wise Child sex ratio and overall sex ratio in India.

| Year | Female sex ratio | Child sex ratio |
|---|---|---|
| 1961 | 941 | 976 |
| 1971 | 930 | 964 |
| 1981 | 934 | 962 |
| 1991 | 929 | 945 |
| 2001 | 933 | 927 |
| 2011 | 940 | 914 |

Source : Census of India - 1961 to 2011

PCPNDT **कायद्यानुसार काही महत्त्वाच्या तरतूदी करण्यात आल्या.**

१) गर्भधारणेनंतर व गर्भधारणापूर्व गर्भलिंग निवड चाचणीवर बंदी घालण्यात आली.

२) सोनोग्राफी सेंटर्सची नोंदणी आवश्यक करण्यात आली.

३) अल्ट्रासाऊंड मशिन विक्रीवर कडक निर्बंध झाले व त्याच्या विक्रीस नोंदणी बंधनकारक करण्यात आली.

४) अशाप्रकारे कायदाभंग करण्याऱ्यांवर कायदेशीर कारवाई व शिक्षेची तरतूद करण्यात आली.

५) वैद्यकिय व्यवसायिकास ३ वर्षापर्यंत कारावास व १०,००० रू. पर्यंत दंड तसेच पुढील अशा प्रत्येक अपराधास पाच वर्षापर्यंत कारावास व एक लाख रू. पर्यंत दंडाची तरतूद करण्यात आली.

६) या कायद्याअंतर्गत सर्व गुन्हे दखलपात्र मानले जातात.

७) अशा प्रकारचा गुन्हा अजामीनपात्र मानला जातो.

८) अशा प्रकारचा गुन्हा आपसात मिटवता येत नाही.

९) गर्भलिंग चाचणीची जाहिरात करणाऱ्यास तीन वर्षापर्यंत कारावास व १०,००० रू. पर्यंत दंड होऊ शकतो.

**स्त्रीभ्रुणहत्ये संदर्भात निदर्शनास येणारे ठळक मुद्दे :**

१) ० ते ६ वयोगटातील बाललिंग गुणोत्तर सातत्याने घटते आहे.

२) विकसीत व आर्थिकदृष्ट्या सबल असलेल्या भौगोलिक क्षेत्रामध्ये लिंगनिदान व स्त्रीभ्रुणहत्येचे प्रमाण जास्त आहे.

३) पंजाब, हरियाणा, महाराष्ट्र, गुजरात या विकसीत राज्यात मुलींच्या लिंग गुणोत्तरात घट दिसून येते.

४) शिक्षित, उच्चवर्गीय कुटुंबामध्ये लिंग निदानाचे प्रमाण जास्त आहे.

५) शिक्षित मातांना दुसरी मुलगी नको असते.

६) १९९१ मध्ये ८५० प्रमाण असणारा एकच जिल्हा होता. २००१ पर्यंत यामध्ये ४५ जिल्ह्यांची भर पडली.

७) जिथे सहजपणे सोनोग्राफी सेंटर्स उपलब्ध आहेत असे विकसीत, संपन्न जिल्हे, तालुके मुलींच्या प्रमाणात घट दाखवतात.

८) ज्या राज्यात स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावलेला आहे तिथे स्त्री-पुरूष प्रमाणात असमतोल आढळत नाही.

मुलींची घटणारी संख्या ही आणिबाणीची स्थिती मानून भविष्याचा विचार केला गेला नाही तर निकोप, सुदृढ समाजाच्या विकासास खीळ बसणार आहे व अनेक भयावह प्रश्न समाजासमोर उभे ठाकणार आहेत. जेवढे मुलींचे प्रमाण घटेल तेवढा स्त्रियांचा दर्जा खालावत जाणार आहे. तिच्यावरील अत्याचारात, हिंसाचारात वाढच होईल. पुरूषांना लग्नासाठी मुली मिळणार नाहीत. परिणामी समलैंगिकतेत वाढ होण्याची शक्यता आहे. काही राज्यात लग्नासाठी मुली मिळत नाहीत म्हणून इतर राज्यातून गरीब मुली आणल्या जात आहेत. स्त्रीचं वस्तुकरण होत आहे. यापलिकडे जाऊन या प्रश्नातून बहूपतित्वाची प्रथा निर्माण होईल.

स्त्रीभ्रुणहत्या समस्येची व्यापकता अभ्यासता स्त्रियांच्या जगण्यावर उठणारं हे तंत्रज्ञान कायद्याच्या जरबे अभावी गुन्हेगारांना मोकाट सोडते आहे. यामध्ये डॉक्टरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. पण बऱ्याचवेळा समोरच्याची मागणी व आर्थिक फायदा बघितला जातो. लिंगनिदानाबाबतच्या रेकॉर्डमध्ये घोटाळा करतात. लिंगनिदान केल्यावर सांकेतिक भाषेचा वापर केला जातो. अनेक मध्यस्थ यांत गुंतलेले असतात. कायद्याच्या कचाट्यात सापडू नये याची ते दक्षता घेतात.

**ब) स्त्रीभ्रुणहत्या समस्या : कारणे**

स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतीय स्त्रीच्या जीवनामध्ये खूप मोठे बदल झाले. परंतू स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन जुनाच परंपरागत आहे. आजही स्त्रीचा कोणी पालक असावा, ती कुणा पुरूषाच्या अधिपथ्याखाली असावी अशी समाजाची भावना आहे. आजही समाज जीवनाच्या सर्वच क्षेत्रात स्त्री पुरूषांपेक्षा कमी दर्जाची मानली जाते. स्त्री माणूस आहे याचा समाजाला विसर पडत चालला आहे. एक उपभोगाची वस्तू एवढेच तिचे अस्तित्त्व उरले आहे. इतकं नगण्य स्थान असणारी स्त्री जन्मालाच येऊ नये यासाठी स्त्रीभ्रुणहत्या मोठ्या प्रमाणात घडून येत आहेत. म्हणूनच या समस्येच्या मुळाशी जाण्यासाठी आपण इथे स्त्रीभ्रुणहत्येस पोषक असणाऱ्या कारणांचा अभ्यास करणार आहोत.

**१) पुरूषप्रधान समाज व्यवस्था :**

पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत 'मुलगा' हे हवे असणारे अपत्य आहे. कारण मुलगा कुटुंबाचा वारस, भविष्यात कुटुंबाचा सांभाळ करणारा मानला जातो. तर स्त्री परक्याचे धन असते. तिचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल, तिच्याकडे कितीही बौद्धिक क्षमता असली तर कुटुंबासाठी जगणारी, पती परमेश्वर मानणारी, स्वत:चे स्वतंत्र अस्तित्त्व नाकारणारी स्त्री भारतीय समाजात आदर्श मानली जाते. पुरूषप्रधान व्यवस्था स्त्रीला या भूमिकेतून बाहेर पडू देत नाही. स्त्री विवाहीत असणं, तिला मुलं असणं, त्यातही मुलगा असणारी स्त्री असेल तर समाजात प्रतिष्ठा मिळते. या सर्व बाबी पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत मुलगी नको हाच संदेश देणाऱ्या आहेत.

**२) मुलगी नको ही मानसिकता :**

भारतीयांच्या दृष्टीने मुलगी म्हणजे परक्याचं धन आहे. घराण्याची अब्रू म्हणून कुटुंबाला तिचा सांभाळ काचेच्या भांड्यासारखा करावा लागतो. विवाह ही स्त्रीसाठी अत्यावश्यक बाब असल्याने त्यासाठी हुंड्याच्या रूपाने कुटुंबाला आधीपासूनच आर्थिक तरतूद करावी लागते. याशिवाय मुलीला कुणी फसवू नये, फूस लावू नये, जाती-धर्माबाहेर जाऊन विवाह करू नये, स्वत: विवाह ठरवण्याचं स्वातंत्र्य घेऊ नये यासाठी तिच्यावर अनेक बंधने घालावी लागतात. याचा ताण कुटुंबावर असतो. याशिवाय समाजात स्त्रियांवरील छळाच्या, अत्याचाराच्या घटना घडतात. त्यापासून मुलींना संरक्षित करण्याचाही ताण कुटुंबावर असतो. शेवटी सगळे करून मुलगी सुखी होईल याची खात्री कुटुंबाला नसते. म्हणूनच समाजात मुलगी नकोच ही मानसिकता निर्माण होते.

**३) सांस्कृतिकदृष्ट्या मुलास प्राधान्य :**

पूर्वीपासून भारतीय संस्कृती मुलाच्या जन्मास प्रथम पसंती देते. कारण मुलगा आई-वडिलांचा वृद्धापकाळी सांभाळ करतो, कुटुंबाचा वारसा चालवतो, वंशपरंपरा त्याच्याद्वारेच राखली जाते अशी ठाम समजूत आहे. याशिवाय प्राचीन हिंदू परंपरेनुसार मृत्यूनंतर मुलाने अग्नि दिल्यास, पिंडदान केल्यास मोक्ष मिळतो. आत्मा मुक्त होतो. यावर अजुनही समाजाचा विश्वास आहे. म्हणून काही सांस्कृतिक, प्रथा-परंपरांचे पालन पुत्रप्राप्तीनेच होऊ शकते या विचाराने मुलगा हा हवाच असतो.

**४) स्त्रियांचा दुय्यम दर्जा :**

भारतीय समाजातील स्त्रीला आरोग्य, शिक्षण, संपत्ती, रोजगार समाजातील स्थान या प्रत्येक ठिकाणी भेदभावपूर्ण वागणूक दिली जाते. जन्मापासून तिच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. शिक्षणापासून वंचित ठेवले जाते. स्त्रियांना नोकरी व रोजगाराच्या संधी नाकारल्या जातात अथवा मोबदला कमी दिला जातो. तिचा उत्पादक कामामध्ये सहभाग नसतो. निर्णय प्रक्रियेत तिला सहभागी करून घेतले जात नाही. स्त्रियांचा दुय्यम दर्जा मुलगी नको या मानसिकतेशी येतो. कारण ज्या देशात स्त्रियांचा दर्जा उंचावला आहे तिथे स्त्री-पुरूष प्रमाणात समतोल असल्याचे आढळून येते.

**५) हुंडा प्रथा :**

हिंदू संस्कृतीनुसार मुली आणि विवाह हा पवित्र संस्कार मानला जातो. मुलीचे सालंकृत कन्यादान केले जाते. अलंकार, वस्तू व पैसे यांसह केलेले कन्यादान महत्त्वाचे ठरते. त्यातूनच आजतागायत हुंडा देण्याची प्रथा समाजात रूजली आहे. आज समाजातील शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या संपन्न अशा उच्चभ्रू वर्गामध्ये मुलीला हुंडा दिल्याचं प्रदर्शन मांडल जातं. हुंडा देणारा पिता प्रतिष्ठित म्हणून मिरवतो. याचा परिणाम ग्रामीण, आदिवासी, मध्यमवर्गीय, कष्टकरी वर्गावरही झालेला आहे. या समुदायातूनही हुंडा देणे आवश्यक मानले जाऊ लागले आहे. तर काही वेळा हुंड्याअभावी मुलींच्या विवाहामध्ये अडथळा येत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मुलगी म्हणजे हुंडा, कुटुंबावरील आर्थिक भार या विचारातून मुलीचा जन्मच नाकारला जात आहे.

**६) प्रथा, परंपरा व जाती-धर्माचे दडपण :**

भारतीय समाजात निपुत्रिक स्त्रीस हिन वागणूक दिली जाते. त्याबरोबरच अपत्यप्राप्तीपेक्षाही पुत्रप्राप्ती महत्त्वाची मानली जाते. तिच्यापोटी पुत्र जन्मला नाही तर तीला अपमानास्पद वागणूक मिळते. जोपर्यंत मुलगा होत नाही तोपर्यंत तिच्यावर बाळंतपण लादल्याचं पूर्वीच्या कित्येक घटनातून दिसतं. मुलगा नाही झाला तर सवत आणतील अथवा नवरा आपल्याला टाकून देईल व परितक्तेचं आयुष्य जगावं लागेल याचं दडपण स्त्रीवर असत. याशिवाय जात व धर्मपालनाची जबाबदारी स्त्रियांवरच आहे असे मानले जाते. बऱ्याचवेळा जातपंचायती, धर्मगुरू पारंपारिक रिती-रीवाज, रूढींचे पालन करण्याबाबत आग्रही असतात. या दडपणातूनच स्त्रिया शिक्षण व रोजगाराच्या संधीपासून वंचित राहतात.

**७) स्त्रियांवरील अत्याचारात वाढ :**

स्त्री सातत्याने कोणत्या ना कोणत्या स्वरूपाच्या अत्याचाराला बळी जात असते. म्हणून स्त्रियांवरील अत्याचाराविरूद्ध अनेक कायदे केले गेले. पण कायदा स्त्रिला सुरक्षितता देऊ शकला नाही. आजही स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण पाहिले तर ते वाढतच चालल्याचे दिसते. हुंडाबळी, स्त्रिस होणारी मारहाण, कौटुंबिक हिंसाचार, छेडछाड, विनयभंग, बलात्कार असे गुन्हे तिच्याविरोधी घडतच असतात. त्यामुळे स्त्रिया समाजात असुरक्षित आहेत. लहान मुली लैंगिक दुरूपयोग व शारिरीक हिंसेला बळी पडण्याची शक्यता तर प्रौढपणी विविध प्रकारच्या अत्याचाराची भिती असते. त्यामुळे स्त्रिया समाजामध्ये सर्वात जास्त असुरक्षित मानल्या जातात.

**८) सहज उपलब्ध होणारे तंत्रज्ञान :**

लहान-लहान गावापासून मोठ्या शहरांमध्ये गर्भलिंग चिकित्सा केंद्रे सहजपणे उपलब्ध झाली आहेत. केंद्र सरकारच्या नोंदीनुसार भारतात ३६००० सोनोग्राफी मशिन्स आहेत. जी आवश्यकतेपेक्षा जास्त आहेत. बऱ्याच वेळा तेथे छुपा गर्भलिंग निदानाचा धंदा चालतो. डॉक्टर, मध्यस्थ वा ग्राहक या सर्वांनाच फायद्याचे ठरेल असे पॅकेज दिले जाते. त्यामुळे चाचणी करणे व गर्भपात करणे या पॅकेजमुळे सहज शक्य होते.

**९) गर्भवती स्त्रीची अगतिकता :**

या पुरूषसत्ताक व्यवस्थेने ज्या प्रकारचे आयुष्य स्त्रीच्या वाट्याला आणलेले असते तसे आयुष्य आपल्या मुलीच्या वाट्याला येवू नये. या मानसिकतेतून गर्भवती स्त्री स्त्रीभ्रुणहत्येत सहभागी होते. काही वेळा नको असलेल्या बाळंतपणातून सुटका झाल्याचा आनंद ती मानते. या व्यवस्थेने स्त्रिला इतके अगतिक बनवलेले असते की या सर्वात ती आपला सहभाग नोंदवते.

**१०) उपभोगवादी संस्कृती :**

जागतिकीकरणानंतर उपभोगवादी संस्कृती रूजत चालली आहे. उपभोगवाद मानवतेपेक्षा पैसा, स्वसुख केंद्रस्थानी मानतो. अशा समाजात स्त्रिला गौण स्थान आहे. माणूस म्हणून सर्वात शेवटी विचार केला जातो. तिच्याकडे केवळ उपभोगाची वस्तू म्हणून पाहिलं जातं. उपभोगवादी संस्कृती स्त्रिला अगदी नगण्य मानत आहे.

**क) स्त्रीभ्रुणहत्या : उपाययोजना (Female Foeticide : Remedies)**

भारतीय समाजात स्त्रीभ्रुणहत्या या समस्येने गंभीर रूप धारण केलेले आहे. कारण समाजातील मुलींच्या प्रमाणात सातत्याने घट होत आहे. कायदा आहे त्याची अंमलबजावणी काटेकोर व्हायला हवी. तितकेच हा प्रश्न सामाजिक, सांस्कृतिक जडणघडणीतून निर्माण झालेला आहे. यामुळे त्यावर उपाययोजना करताना सामाजिक-सांस्कृतिक विचारसरणी, रूढी, परंपरा, जीवन पद्धती यात बदल घडवून आणणे आवश्यक आहे.

**१) स्त्री-पुरूष समतेचे मुल्य रूजवणे :**

भारतीय संविधानात स्त्री-पुरूष समानतेचं तत्त्व स्विकारल आहे. तसं प्रत्यक्ष जीवनातही स्त्री-पुरूष दोघांनीही समानतेने प्रत्येकाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले पाहिजे. स्त्री आणि पुरूष या दोघांचेही स्थान समाजामध्ये महत्त्वाचे आहे. कुणीही श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नाही. हे मूल्य रूजवण्यासाठी समाजातून, कुटुंबातून प्रयत्न व्हायला पाहिजेत. स्त्रियांचा अनादर करणारे वक्तव्य व वर्तन यावर पुरूषांनी बंधन घालून स्त्रियांकडे सन्मानाने पाहिलं पाहिजे. यातून स्त्री विरोधी पुरूषी मानसिकता बदलेल.

**२) स्त्री शिक्षणावर भर देणे :**

स्त्री साक्षरता व जननक्षमता यांचा संबंध अनुकूल असल्याचे जगातच नाही तर भारतातही सिद्ध झाले आहे. भारतीय पुरूषांच्या तुलनेत स्त्री शिक्षणाचे प्रमाण कायम कमीच राहिले आहे. म्हणूनच स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणारे तिला स्वयंपूर्ण बनवणारे शिक्षण दिले पाहिजे. केरळ सारख्या राज्यात स्त्री साक्षरता, स्त्रियांचा दर्जा, स्त्री रोजगाराचं प्रमाण जास्त आहे. त्यामुळे तिथे स्त्रियांचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत जास्त असल्याचे दिसते. म्हणूनच स्त्रियांना सर्वार्थाने सक्षम करणाऱ्या शिक्षणावर भर देणे गरजेचे आहे.

**३) स्त्री आरोग्य प्रश्नास प्राधान्य देणे :**

भारतीय पारंपारिक दृष्टीकोनातून ''स्त्रिला पौष्टिक आहाराची गरज नसते. ती जन्मत: सुदृढ असते.'' या

विचारातून तिला पोषक आहारापासून वंचित ठेवले जाते. तिच्या आरोग्य समस्येकडे दुर्लक्ष केले जाते. स्त्रियांच्या वाट्याला येणारे कष्ट, लवकरच्या वयात होणारे लग्न, लादले जाणारे मातृत्त्व यामुळे स्त्रियांचे आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. तसेच बालमृत्यू, मातामृत्यूचेही प्रमाण वाढते. माता-बालसंगोपनावर शासन लक्ष पुरवत असले तरी युनिसेफच्या म्हणण्यानुसार भारतात ५ वर्षाच्या आतील मुलींच्या मृत्यूचे प्रमाण जास्त आहे. म्हणूनच खालच्या स्तरातील, कनिष्ठ वर्गातील मुलींच्या पोषण, कुपोषण, आरोग्य, शिक्षण यावर जास्त लक्ष केंद्रीत केल्यास मुलींच्या आरोग्याचा प्रश्न प्राधान्याने सुटेल.

**४) स्त्रियांना सुरक्षित वातावरण निर्माण करणे :**

महिलांवर होणारे अत्याचार स्त्रियांच्या संचार स्वातंत्र्यावर बंधने आणतात. असुरक्षितता असेल तर मुली शिक्षणासाठी, रोजगारासाठी बाहेर पडू शकत नाहीत. मुलींच्या संचारासाठी सुरक्षित पर्यावरण निर्माण करणे ही समाजाची जबाबदारी आहे. स्त्रियांविरोधी घडलेल्या गुन्ह्यातील आरोपींना विनाविलंब शिक्षा झाल्यास व पोलिसयंत्रणा व न्याययंत्रणा सक्षमपणे काम करतात. याचा अनुभव आल्यास महिलांसाठी समाजात सुरक्षित वातावरण होईल.

**५) सोनोग्राफी सेंटर्स व वैद्यकीय कर्मचाऱ्यांवर अंकुश :**

आज गावा-गावातून सोनोग्राफी सेंटर्स आहेत. शासन व आरोग्य विभागाची यंत्रणा अशा सेंटर्सवर बारकाईने लक्ष ठेवतात. त्यांचे रेकॉर्ड तपासतात. परंतू समाजातील काही प्रतिष्ठित व्यक्तींची यावर नजर असेल तर गुन्ह्यावर मोठ्या प्रमाणात अंकुश ठेवता येईल. त्या-त्या कार्यक्षेत्रातील उच्चपदस्थ महिला, महिला डॉक्टर्स, सामाजिक कार्यकर्त्या, महिला वकील वा कायदेतज्ञ यांचे अशा सेंटर्सवर लक्ष आहे या जाणिवेतून तेथील बेकायदेशीर कृत्यांना आळा बसेल.

**६) स्त्रियांचे सक्षमीकरण :**

स्त्रियांच्या बाबत केल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण विषम वागणुकीमुळे स्त्रियांचा दर्जा खालावत चालला आहे. म्हणूनच शासनाने महिला सक्षमीकरण धोरण राबवले. स्त्रियांचा विकास हा स्त्री शिक्षण, तिला अर्थाजनाची प्राप्त होणारी संधी व निर्णय प्रक्रियेतील तिच्या सहभागावर अवलंबून आहे. त्यामुळे स्त्रिला संधी देताना तिच्या हक्कापासून, अधिकारापासून व विशेष सवलतीपासून तिला वंचित ठेवलं जात नाही ना हे पाहणं गरजेचं आहे. स्त्रियांना शिक्षणापासून राजकारणापर्यंत प्रत्येक ठिकाणी अग्रक्रमाने संधी प्राप्त झाल्यास ती खऱ्या अर्थाने सक्षम होईल.

**७) PCPNDT ACT-1994/2020-21 कायद्याची काटेकोर अंमलबजावणी :**

स्त्रीभ्रुण हत्येस जबाबदार प्रमुख घटक म्हणजे आधुनिक तंत्रज्ञान व डॉक्टर्स होय. त्यामुळे उच्चशिक्षित डॉक्टर मंडळींनी आर्थिक लोभापेक्षा मानवतेच मूल्य जपणं आवश्यक आहे. बऱ्याचवेळा डॉक्टर व इतर कर्मचाऱ्यांना प्रशासकीय यंत्रणा पाठीशी घालते. अशा गुन्ह्यांमध्ये पोलीस व प्रशासनाने आपले हितसंबंध

बाजूला ठेवून कारवाई केली पाहिजे. अशा गुन्ह्यात सापडलेल्या आरोपींवर कारवाई होताना दिरंगाई होऊ नये. आरोपींना झालेली शिक्षा, न्यायालयात शिक्षा दिल्यावर केलेली अंमलबजावणी या गोष्टी समाजापर्यंत पोहचल्या पाहिजेत. त्यामुळे अशा रॅकेटमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींवर जरब बसेल. ग्राहक असणारे पालक, डॉक्टर्स, मध्यस्थ, इतर तंत्रज्ञ यांच्यावर वचक बसल्याशिवाय स्त्रीभ्रूणहत्येसारखे गुन्हे रोखता येणार नाहीत. यासाठी (PCPNDT) कायद्याची कठोर व काटेकोर अंमलबजावणी अत्यावश्यक आहे.

**८) सामाजिक प्रबोधन :**

शासन व स्वयंसेवी संस्थांनी स्त्रीभ्रुण हत्या, स्त्रियांचे घटते प्रमाण याबाबत घोषवाक्य, भित्तीचित्रे, लघुपट, जाहिराती, संदेशाच्या माध्यमातून समाज प्रबोधन केल्यास ते प्रभावी ठरते. निकोप, निरोगी, समृद्ध समाज निर्मितीसाठी स्त्रियांचे असणारे महत्त्व जनजागृतीच्या माध्यमातून स्पष्ट केले पाहिजे. त्यासाठी दूरचित्रवाणी, रेडिओ, समाजमाध्यमे 'मुलगी वाचवा' अशी चळवळ उभी करता येईल.

याशिवाय २०११ साली झालेल्या जनगणनेनंतर सावित्रीबाई फुले जयंती ३ जानेवारी रोजी 'सावित्रीच्या लेकी' हे अभियान 'बेटी बचाओ बेटी पढाओ' म्हणून सुरू करण्यात आले. २०१४ साली पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी केंद्रशासनातर्फे मुलींच्या संख्येत वाढ व्हावी यासाठी 'बेटी बचाओ बेटी पढाओ' हे अभियान सुरू केले. देशातील १०० जिल्हे मुलींची संख्या वाढवण्यासाठी निवडले व त्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर सोपवण्यात आली.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये शहरातील सर्व सोनोग्राफी सेंटर्स केंद्रीय यंत्रणेशी जोडून सोनोग्राफी सेंटर्सच्या गैरवापरावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न कलेक्टर श्री. लक्ष्मीकांत देशमुख यांनी केला. शेवटी कायद्याच्या अंमलबजावणीचे काम आरोग्य यंत्रणा, शासन करेल, पण वैद्यकशास्त्रातील नितीमुल्यांना जागून डॉक्टरांनी काम केले तर हा प्रश्न बराचसा आटोक्यात येईल. कुटुंब व समाजाच्या योगदानातून, प्रबोधनातून लिंगभेदभाव नष्ट करता येईल.

**२.५ सारांश :**

भारतातील सांप्रदायवादास धर्म जबाबदार नाही तर कर्मकांडातील भेदभाव, अज्ञानी, धर्मश्रद्धाळू अनुयायांचा वापर करून घेणारा पुरोहित वर्ग, आपली राजकिय पकड घट्ट करण्यासाठी, सत्ता प्राप्तीसाठी स्वार्थी राजकारणी धर्माचा वापर करतात. धार्मिक विसंवादातूनच देशाच्या प्रगतीत, वैज्ञानिक विकासात अडथळा निर्माण होतो. खरतर जगातील सर्व धार्मिक विचारसरणीत कल्याणकारी तत्त्व आहे. धर्माच्या अभ्यासकांनी सर्वसामान्यांचे याबाबत प्रबोधन केले पाहिजे. हिंसेंच्या, द्वेषाच्या कल्लोळात धर्मातील मानवतावादी विचार कानावर पडत नाहीत. तेव्हा खरी धार्मिकता संपते व धार्मिक विसंवादास सुरूवात होते. हेच भारतीय संप्रदायवादाचे फलित आहे.

या घटकामध्ये आपण स्त्रीभ्रुणहत्या या समस्येचा अर्थ, स्त्रीभ्रुणहत्येची कारणे व त्यावरील उपाययोजना पाहिल्या. प्रामुख्याने भारतीय समाजात होत असणारी लिंग भेदभाव, समाजात स्त्रियांना मिळणारी विषम वागणूक,

स्त्रियांना समाजात असणारे दुय्यम स्थान यामुळे स्त्रियांना समानतेतून मिळणाऱ्या संधीपासून वंचित रहावे लागते. केवळ उपभोगाचं साधन एवढच तिच स्थान उरत. अशावेळी स्त्रियांवरील विविध अत्याचाराच प्रमाण वाढतं. स्त्री घरात, घराबाहेर असुरक्षित असतेच. पण स्त्रीभ्रुण हत्येच्या रूपान मातेच्या गर्भातही ती असुरक्षित बनते. स्त्री-पुरूष असंतुलन, स्त्रियांचं घटतं प्रमाण समाजावर प्रतिकूल परिणाम घडवून आणत आहेत आणि भविष्यातही गंभीर परिणामांना तोंड द्यावं लागणार आहे. म्हणून स्त्रीभ्रुण हत्येची कारणे व त्यावरील उपाययोजनांचा अभ्यास आपण या घटकामध्ये केला आहे.

## २.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न (Check your Progress) :

**(अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) भारतातील संप्रदायवादाचा प्रमुख आधार कोणता?

२) धर्मरक्षणापेक्षा संप्रदायवादात काय महत्त्वाचे असते?

३) धार्मिक कर्मकांडे सांप्रदायिकतेस कधी कारणीभूत ठरतात?

४) मूलतत्त्ववाद कशाशी निगडीत असतो?

५) कोणत्या धर्माच्या पंथांमध्ये हा संघर्ष झाल्याचे आढळून आले आहे?

६) हिंदू व मुस्लीम विवाहसंस्थेतील प्रमुख भिन्नता कोणती?

७) हिंदू व मुस्लिमांच्यात वितुष्ट निर्माण करण्यासाठी ब्रिटिशांनी कोणती निती अवलंबली?

८) स्वातंत्र्यापूर्वी आपल्या राजकीय मागण्यांसाठी मुस्लिमांनी कोणता राजकीय पक्ष स्थापन केला?

९) बहुतांशवेळा निवडणुकांमध्ये उमेदवार निवडीसाठी कोणती पात्रता महत्त्वाची मानली जाते?

१०) काश्मिरमधील संप्रदायवाद वाढीस कोणत्या देशाचा हस्तक्षेप कारणीभूत ठरतो?

११) भारतीय मुस्लीम पुरूष विवाहासाठी कोणत्या कायद्याचा आधार घेतात?

१२) मोहल्ला समिती कशासाठी उपयुक्त आहे?

१३) सुरूवातीच्या काळात गर्भलिंग निदानासाठी कोणते तंत्र वापरले जात होते?

१४) २००१ ते २००७ या वर्षात किती मुली जन्मच घेऊ शकल्या नाहीत?

१५) हरवलेल्या मुलींची संकल्पना कुणी मांडली?

१६) नैसर्गिकरित्या मुला-मुलींच्या जन्माच प्रमाण किती असतं?

१७) १९९१ च्या जनगणनेत मुलींचं लिंगगुणोत्तर घटणारी राज्य कोणती?

१८) गर्भजल परीक्षा व सोनोग्राफी हे तंत्रज्ञान मुख्यत: कशासाठी उपयुक्त आहे?

१९) भारतात गर्भलिंगनिदान कायदा कोणत्या राज्यात व किती साली प्रथमत: चालू करण्यात आला?

२०) PNDT कायदा भारतभर कधी लागू झाला?

२१) २००३ च्या PCPNDT कायद्यात कशाचा समावेश करण्यात आला?

२२) 'स्त्रीभ्रुण हत्या' गुन्ह्यातील आरोपीस जास्तीत जास्त किती शिक्षा होते?

२३) बाललिंग गुणोत्तरात मुलींचे प्रमाण (० ते ६ वय) घटण्याचे कारण कोणते?

२४) स्त्रीभ्रुणहत्येस पोषक क्षेत्र कोणते आहे?

२५) 'केरळ' राज्यात स्त्री-पुरूष प्रमाणात समतोल आढळण्याचे कारण कोणते?

२६) 'मुलगी नको' या मानसिकतेमागील दोन कारणे सांगा?

२७) स्त्रीभ्रुण हत्या रोखण्याच्या महत्त्वाच्या दोन उपाययोजना कोणत्या?

**स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answer to check your Progress) :**

**एका वाक्यात उत्तरे**

१) धर्म हा भारतातील संप्रदायवादाचा प्रमुख आधार आहे.

२) संप्रदायावादात धर्मरक्षणापेक्षा राजकीय सत्ता व नेतृत्त्व टिकवणे महत्त्वाचे आहे.

३) धार्मिक कर्मकांडांना राजकीय स्वरूप प्राप्त होते तेव्हा ती सांप्रदायिकतेस कारणीभूत ठरतात.

४) मूलतत्त्ववाद धर्म व सत्तेशी निगडीत असतो.

५) हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन धर्माच्या पंथामध्ये संघर्ष घडून आला आहे.

६) हिंदू धर्मामध्ये विवाह हा संस्कार मानला जातो तर मुस्लीम धर्मामध्ये विवाह हा करार मानला जातो.

७) हिंदू-मुस्लिमांमध्ये वितुष्ट निर्माण करण्यासाठी 'फोडा आणि राज्य करा' ही निती ब्रिटिशांनी अवलंबली.

८) मुस्लिमांनी आपल्या मागण्यांसाठी 'मुस्लिम लिग' पक्षाची स्थापना केली.

९) आपली जात व धर्म ही पात्रता निवडणुकीमध्ये उमेदवार निवडीसाठी महत्त्वाची मानली जाते.

१०) काश्मिरमधील संप्रदायवाद वाढीस पाकिस्तान हस्तक्षेप करत असतो.

११) भारतीय मुस्लिम पुरूष विवाहासाठी शरियत या धार्मिक कायद्याचा आधार घेतात.

१२) दोन समुदायात समन्वय साधून दंगल रोखण्यासाठी मोहल्ला समिती उपयुक्त ठरते.

१३) सुरूवातीच्या काळात गर्भजल चिकित्सा हे तंत्र गर्भलिंग निदानासाठी वापरले जात होते.

१४) २००१ ते २००७ या वर्षात ६ लाख मुली जन्मच घेऊ शकल्या नाहीत.

१५) हरवलेल्या मुलींची संकल्पना डॉ. अमर्त्य सेन यांनी मांडली.

१६) नैसर्गिकरित्या १०५० मुलींमागे १००० मुलं हे जन्मप्रमाण असतं.

१७) १९९१ च्या जनगणनेत राजस्थान, पंजाब, हरियाणा व महाराष्ट्र या राज्यात मुलींचं लिंगगुणोत्तर घटलं.

१८) गर्भातील भ्रुणात विकृती असल्यास गर्भजल चिकित्सा व सोनोग्राफी तंत्र उपयुक्त ठरतं.

१९) भारतात गर्भलिंग निदान कायदा प्रथम महाराष्ट्रात १९८८ साली करण्यात आला.

२०) PNDT कायदा भारतभर १९९४ साली लागू करण्यात आला.

२१) २००३ च्या PCPNDT कायद्यात प्रसुतीपूर्वच नाहीतर गर्भधारणापूर्व लिंगनिवडीस प्रतिबंध करण्यात आला.

२२) स्त्रीभ्रुण हत्येच्या गुन्ह्यातील आरोपीस ५ वर्षापर्यंत कारावास व एक लाख रू. पर्यंतचा दंड ही शिक्षा होऊ शकते.

२३) ० ते ६ वयातील बाललिंग गुणोत्तरात मुलींचे प्रमाण घटते, कारण मुलींच्या पोषण व आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते.

२४) सोनोग्राफी सेंटर्सची सहज उपलब्धता व विकसित जिल्ह्यांच्या ठिकाणी स्त्रीभ्रुण हत्येचे प्रमाण जास्त आहे.

२५) स्त्रियांचा उच्च दर्जा, स्त्री साक्षरता व स्त्री रोजगाराचे प्रमाण जास्त असल्याने केरळ राज्यात स्त्री-पुरूष समतोल आढळतो.

२६) पुरूषप्रधान समाजव्यवस्था व स्त्रियांचा दुय्यम दर्जा ही कारणे मुलगी नको ही मानसिकता निर्माण करतात.

२७) PCPNDT कायद्याची कठोर अंमलबजावणी, समाजप्रबोधन केल्यास स्त्रीभ्रुण हत्या रोखता येतील.

**२.७ सरावासाठी प्रश्न (Exercise/Home Assignment) :**

१) सांप्रदायवादाचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करा.

२) सांप्रदायवादाची कारणे विशद करा.

३) सांप्रदायवादावरील उपाययोजना स्पष्ट करा.

४) स्त्रीभ्रुणहत्येचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करा.

५) स्त्रीभ्रुणहत्येची कारणे विशद करा.

६) स्त्रीभ्रुणहत्येच्या समस्येवरील उपाययोजना स्पष्ट करा.

### चिंतन व कार्य

१) सांप्रदायीक दंगलीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याची माहिती मिळवा.

२) प्रत्येक धर्मात केल्या जाणाऱ्या मानवतावादी कार्याची माहिती गोळा करा.

३) आपल्या परिसरातील अंगणवाडीतील मागील काही वर्षातील ० ते ६ वयोगटाचे बाललिंग गुणोत्तरातील चढ उतार अभ्यासा.

४) पहिलं अपत्य मुलगी असणाऱ्या दांपत्याशी चर्चा करा. मुलींविषयी नकारात्मक दृष्टीकोन असणाऱ्या दांपत्याचं प्रबोधन करा.

### अधिक वाचनासाठी पुस्तके : (Suggested Readings)


१) कोंडेकर ए. वाय. मारूलकर विषय : भारतीय सामाजिक समस्या, फडके प्रकाशन.

२) मायी सुनिल : भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, डायमंड पब्लिकेशन्स पुणे-२००९

३) राम आहुजा : सामाजिक समस्याए, रावत पब्लिकेशन्स, न्यू दिल्ली.

४) साळुंखे सर्जेराव : समकालीन भारतातील सामाजिक समस्या, नरेंद्र प्रकाशन, पुणे.

५) टि. के ओमान (अनु. संगीता फाटक) : भारतीय समाजिक समस्या व वाद, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

६) आशा खांडेकर-गवई : महिलांच्या मानवाधिकांचे उल्लंघन, सुगावा प्रकाशन पुणे.

७) भागवत विद्युत : स्त्री प्रश्नाची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

८) आ. ह. साळुंखे : हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोकवाङमयगृह, पुणे.

९) देहऽराय स्वाती, तांबे अनघा : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ.


❑❑❑

# घटक क्रमांक – ४
# सामाजिक – वैधानिक समस्या
# ( Socio- Legal Problems)

**अनुक्रमणिका**


४.१ उद्दिष्टे

४.२ प्रस्तावना

४.३ विषय विवेचन

४.३.१ बाल गुन्हेगारी- अर्थ, कारणे आणि उपाययोजना

४.३.२ सायबर गुन्हा: अर्थ, सायबर गुन्ह्यांची कारणे आणि सायबर गुन्ह्यांवरील उपाय.

४.४ सारांश

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## ४.१ उद्दिष्टे (Objectives)

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास...

१. बाल गुन्हेगारीचा अर्थ व कारणे समजून घेता येतील.

२. बाल गुन्हेगारीवरील उपाययोजना स्पष्ट करता येतील.

३. सायबर गुन्ह्यांचा अर्थ, सायबर गुन्ह्यांची कारणे आणि सायबर गुन्ह्यांवरील उपाय स्पष्ट होतील.

## ४.२ प्रस्तावना

आज जगात अशा अनेक सामाजिक समस्या आहेत. ज्या देशाच्या आणि समाजाच्या प्रगतीमध्ये अडथळा निर्माण करतात. त्यापैकी एक गंभीर आणि चिंताजनक समस्या म्हणजे बाल गुन्हेगारी होय. बाल गुन्हेगारीसाठी समाजशास्त्रीय परिभाषेत बाल अपचारीता अशी संज्ञा वापरतात. कायद्याच्या भाषेत याला विधी संघर्षग्रस्त बालक म्हटले जाते. बाल गुन्हेगारी ही समस्या समाज संरचनेला कमकुवत करणारी व अल्पवयीन बालकांच्या भविष्यावर नकारात्मक प्रभाव टाकणारी समस्या आहे. बाल गुन्हेगारी म्हणजे अठरा वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांनी केलेले कायद्याचे उल्लंघन होय. ही समस्या केवळ त्या मुलांसाठीच नव्हे तर संपूर्ण समाजासाठी एक मोठे आव्हान आहे.

भारतातील बाल गुन्हेगारीची वैशिष्ट्ये पाहता काही ठळक बाबी पुढीलप्रमाणे निदर्शनास येतात.

१. भारतात मुलींपेक्षा मुलांमध्ये अपराधाचे प्रमाण हे सर्वाधिक आहे. एकूण अपराधामध्ये मुलांचे प्रमाण ९८ टक्के तर मुलींचे केवळ २ टक्के आहे.

२. बालगुन्हेगारीचा सर्वात जास्त दर किशोरांमध्ये म्हणजेच १६ ते १८ वयोगटांमध्ये अधिक आहे. ङ्गएनसीआरबीफ्च्या आकडेवारीनुसार ९८ टक्के गुन्ह्यांमध्ये १६ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुले आहेत. विशेष म्हणजे हे गुन्हे बलात्कार, खून यासारखे गंभीर स्वरूपाचे आहेत.

३. ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात बाल अपराधाचे प्रमाण अधिक आहे. दिल्ली, मद्रास, मुंबई, कोलकाता, अहमदाबाद, बंगलोर यासारख्या महानगरात हे प्रमाण अधिक आढळते.

४. बाल गुन्हेगारीकडे वळण्यासाठी कौटुंबिक वातावरणाचा प्रभाव अधिक असल्याचे दिसून येते. कारण २०१५ मधील बाल गुन्हेगारांपैकी ९५% मुलेही आपल्या कुटुंबासोबत राहत असल्याचे आढळून आले.

५. बहुतांश गुन्हे समूहामध्ये केले जातात. गुन्हे करताना ९०% मुलांसोबत त्यांचे मित्र असल्याचे आढळून आले आहे.

६. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) च्या आकडेवारीनुसार आयपीसी गुन्ह्यांपैकी १.१% हे बालगुन्हे होते. त्यापैकी जवळजवळ २% गुन्हे हे हिंसक व क्रूर प्रकारचे होते.

७. भारतात बालगुन्हेगारीचा दर २००० मध्ये ०.९ टक्के होता. तो २०२२ मध्ये वाढून ६.३ टक्के झाला आहे.

८. भारतात बालकांनी केलेल्या गुन्ह्यामध्ये चोरी, लुटमार या गुन्ह्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

९. निरीक्षण गृह आणि विशेष गृहांमध्ये असणाऱ्या १८२ मुलांचा अभ्यास केल्यानंतर गरिबी हे मुलांना गुन्हेगारीकडे नेणारे एक प्रमुख कारण असल्याचे दिसून आले आहे.

एनसीआरबी च्या विश्लेषणानुसार बालकांनी केलेल्या अपराधांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. हे आकडे बाल गुन्हेगारीच्या समस्येची तीव्रता दर्शवतात. आधुनिक युगात सातत्याने समोर येणारी बाल गुन्हेगारीची प्रकरणे ही केवळ कायदेशीर व्यवस्थेला आव्हान नाही. तर बालकांच्या हक्क व कल्याणाशी निगडित गंभीर प्रश्न आहे. गरिबी, कुटुंब विघटन, शिक्षणाचा अभाव, चुकीची संगत, सामाजिक असमानता, समाज माध्यमांचा प्रभाव अशा अनेक कारणांमुळे बाल गुन्हेगारीची तीव्रता वाढताना दिसते. समाज विस्कळीत करणारे व समाजाला हानिकारक ठरणारे असे असामाजिक वर्तन समाजावर प्रतिकूल परिणाम करणारे असते. म्हणूनच आपण या प्रकरणात बाल गुन्हेगारीचा अर्थ समजून घेणार आहोत. तसेच बाल गुन्हेगारीची कारणे व त्यावरील उपाय योजनांचा अभ्यास करणार आहोत.

**बाल गुन्हेगारीचा अर्थ व व्याख्या :**

बाल गुन्हेगारी ही अल्पवयीन मुलांनी केलेला गुन्हा असे स्पष्टपणे पारिभाषित केले आहे.

- बाल न्याय कायदा १९८६ मध्ये १६ वर्षापेक्षा कमी वयाचा मुलगा आणि अठरा वर्षापेक्षा कमी वयाची मुलगी अशी किशोराची व्याख्या दिली आहे.

- बाल न्याय काळजी आणि संरक्षण कायदा २०१५ च्या कलम २(१३) अंतर्गत कायद्याच्या संघर्षात असलेले मुल म्हणजे असा मुलगा ज्याच्यावर गुन्हा केल्याचा आरोप आहे किंवा त्याने गुन्हा केल्याचे आढळले आहे आणि ज्याने असा गुन्हा केल्याच्या तारखेला १८ वर्षे पूर्ण केलेली नाहीत.
- २००० मध्ये संसदीय कायद्याद्वारे या कायद्यामध्ये सुधारणा करण्यात आली. बालन्याय (काळजी आणि संरक्षण) कायदा, २००० च्या कलम२(के) मध्ये १८ वर्षाचे न झालेले अल्पवयीन किंवा बालक अशी व्याख्या केली. ही व्याख्या मुलगा किंवा मुलगी दोघांनाही लागू होते.

याबरोबरच काही समाजशास्त्रज्ञ आणि विचारवंतांनीही व्याख्याद्वारे याचा अर्थ स्पष्ट केला आहे.

**व्याख्या (Definition)**

१. **वॉल्टर रेक्लेस** (Walter Reckless) : च्या मताप्रमाणे बाल अपचारीता ही संज्ञा गुन्हेगारी कायद्याचे उल्लंघन आणि अशा प्रकारच्या व्यवहार प्रतिमानास लागू होते की जे वर्तन बालक आणि लोकांसाठी अयोग्य मानले जाते.

(The term juvenile deliquency applies to the position of criminal code or persuade of certain patterns of behaviour disapproved for children and young adolescents.)

२. **डॉ. सेठना** (Dr. Sethna) : विशिष्ट प्रदेशातील कायद्याने निश्चित केलेल्या वयापेक्षा कमी वय असलेल्या बालकाने व युवकांनी केलेले कायदा विरोधी वर्तन म्हणजे बाल अपचारीता होय. (Juvenile delinquency involves wrong doing by a child or a young person who is under an age specified by law of the place concerned.)

३. **न्यूमेयर** (Neumeyer) : 'बाल अपचारीता' म्हणजे कायद्याने निर्धारित केलेल्या वयापेक्षा कमी वय असलेली व्यक्ती की ज्या व्यक्तीचे वाईट वर्तन समाजविरोधी व कायद्याचे उल्लंघन करणारे असते. (A deliquent is a person under age who is a guilty of antisocial act and whose misconduct is an infraction of the law)

४. **फ्रेंडलॅन्डर** (Friendlander) : 'बाल अपचारीता' म्हणजे बालकाचे असे वर्तन की जे कायदेशीर कारवाईस पात्र आहे. (Delinquency is a Juvenile misconduct the might dealt, with under the law)

## ४.३ विषय विवेचन :

जगात सर्वत्रच बाल गुन्हेगारीची समस्या आढळून येते. १७८८ पासून इंग्लंडमध्ये आणि १८५० पासून भारतात प्रौढ गुन्हेगार व बाल गुन्हेगार यांच्यात सर्वप्रथम भेद करण्यात आला. त्यांना दिल्या जाणाऱ्या शिक्षेतही दोन वेगवेगळ्या प्रणाली अवलंबिण्यात आल्या.

बाल अपराधाबाबत वय आणि वर्तन हे दोन मुद्दे महत्त्वपूर्ण ठरतात.

१) वय : प्रत्येक देशात बालगुन्हेगारीचे वय वेगवेगळे परिभाषित करण्यात आले आहे. ज्या त्या प्रदेशातील कायद्यानुसार निर्धारित वयापेक्षा कमी वय असलेल्या बालकास बाल अपचारी असे संबोधित केले जाते. कॅनडामध्ये सात ते १६ वयाच्या मुलांना बालक मानले जाते. अमेरिकेमध्ये १८ वर्षे, इंग्लंडमध्ये १७ आणि

जपानमध्ये २० वर्षाखालील गुन्हा करणाऱ्या मुलांना बाल गुन्हेगार म्हणतात. भारतात १९८६ च्या बाल न्याय कायद्यानुसार १६ वर्षापूर्वीची मुले आणि १८ वर्षापर्यंतच्या मुलीस बाल अपचारी मानले जाते. यावरून हे स्पष्ट होते की प्रत्येक देशातील कायद्याने निर्धारित केलेल्या वयापेक्षा कमी वय असलेल्या बालकास बाल गुन्हेगार असे म्हटले जाते.

२) वर्तन: वयाबरोबरच वर्तन हा घटक देखील महत्त्वाचा ठरतो.जेव्हा एखादा मुलगा कायद्याच्या विरुद्ध किंवा असामाजिक वर्तन करतो तेव्हा त्याला गुन्हेगार म्हणून ओळखले जाते. परंतु असामाजिक वर्तन कायदा विरोधी असेलच असे नाही किंवा काही वेळा समाज संमत वर्तन देखील कायदा विरोधी असू शकते. म्हणून कायदा विरोधी वर्तन करणाऱ्याला बालअपराधी म्हणणे योग्य ठरेल.अशाप्रकारे किशोर किंवा बालक म्हणजे अशी व्यक्ती जी १८ वर्षे वयाची नाही आणि कायदेशीर परिपक्वता वयाच्या अंतर्गत गुन्हा करते. उदाहरणार्थ चोरी करणे, मारहाण करणे, मादक पदार्थांचा वापर, गुन्हेगारी टोळ्यांमध्ये सहभाग इ.

भारतीय दंडविधानातील IPC काही कलमे (४०, ४६, ४७, १२२, ३२४, ३५४, ३८० इत्यादी) आणि धूम्रपान विषयक व इतर कायद्याने पारिभाषित केलेल्या वर्तनास बाल गुन्हेगारी म्हणतात. यात चोरी करणे, व्यर्थ भटकणे, भांडण करणे, आई-वडिलांची परवानगी न घेता बाहेर फिरणे, आई-वडिलांच्या नियंत्रणात न राहणे, पळून जाणे, जुगार खेळणे, धूम्रपान करणे, वेश्याव्यवसायाशी संलग्न असणे, अवैध व्यापारात गुंतणे तसेच इतर गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या बालकांचा समावेश होतो. बाल गुन्हेगारी अजाणता, भावनेच्या भरात, परिणामांची यथार्थ जाणीव नसताना केलेले गैरकृत्य होय. कारण प्रौढास त्याने केलेल्या वर्तनाचे गांभीर्य, परिणामांची जाणीव असते.

२०१२ मध्ये झालेल्या निर्भया बलात्कार आणि हत्या प्रकरणात एका अल्पवयीन मुलाचाही सहभाग होता ज्याला तत्कालीन कायद्यानुसार केवळ तीन वर्षाची सुधार गृहातील शिक्षा झाली. या घटनेच्या देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आणि बाल गुन्हेगारीच्या कायद्यात बदल करण्याची मागणी जोर धरू लागली. याच पार्श्वभूमीवर Juvenile Justice (Care and Protection of Children) Act, 2015 हा नवीन कायदा अस्तित्वात आला. यातील बदलांमुळे गंभीर गुन्हे करणाऱ्या किशोरवयीनांना त्यांच्या गुन्ह्याच्या स्वरूपा नुसार शिक्षा देण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परंतु या बदलाला सामाजिक कार्यकर्ते आणि बालहक्क संघटनांनी विरोध दर्शवून अशा मुलांच्या पुनर्वसनावर आणि सुधारणेवर लक्ष केंद्रित करण्याची गरज व्यक्त केली आहे.

समाजशास्त्रज्ञ व विचारवंतांच्या मते गुन्हेगार जन्माला येत नाही. तसेच गुन्हेगार आणि अनुवंशिकतेचा काहीही संबंध नाही. तर आधुनिक युगात गुन्हेगारी हे सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक परिस्थितीचे फलित आहे. हा विचार सर्वमान्य झाला आहे. त्यामुळे गुन्हेगारांना आपल्या वर्तनात सुधारणा करण्याची संधी दिली पाहिजे. या गुन्हेगार शास्त्रातील विचारांमुळे प्रौढ गुन्हेगार आणि बालपराधी यांच्यात फरक करण्यात आला आहे. बाल अपराध ही सामाजिक समस्या असल्यामुळे या समस्येचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययन केले जाते. परंतु बाल गुन्हेगारीच्या कारणांबाबत दोन विचार प्रवाह आढळतात.

**अ) बाल गुन्हेगारीची अनुवंशिक मीमांसा :** अनुवंशिक मीमांसेस अनुसरून बालगुन्हेगारीसाठी प्रामुख्याने शारीरिक लक्षणे, वंशानुक्रम, मानसिक कारणांचा समावेश होतो. याबाबत लांम्ब्रोसो, गोरिंग, क्रेशर या अभ्यासकांच्या मते बाल गुन्हेगारीस सामाजिक परिस्थिती जबाबदार नसून बाल अपचारीतेचे मुख्य कारण हे अनुवंशाने मिळालेल्या वारसांचा परिणाम होय. लांम्ब्रोसो यांनी वंशानुक्रमातूनच बालकांच्या शारीरिक लक्षणांचे

निर्धारण होते असे म्हटले आहे. क्रेशरने ङ्गमानसिक विकृतीफ आणि 'शरीराची बनावट' याला अनुसरून बाल अपचाराचे विश्लेषण केले. गोडार्ड यांच्या मते ५० टक्के बाल गुन्हेगार मनोविकृत असतात.

**ब) बाल गुन्हेगारीची सामाजिक परिस्थिती विषयक मीमांसा :** या दृष्टीकोनास अनुसरून बाल गुन्हेगारीसाठी सामाजिक परिस्थिती हा घटक महत्त्वपूर्ण आहे. कारण जन्मापासून बालक ज्या सामाजिक वातावरणात जीवन व्यतीत करतो त्याचे दूरगामी परिणाम त्याच्या व्यक्तीमत्त्वावर होतात. यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि आर्थिक कारणांचा समावेश केला जातो. बालकांचे अपसमायोजन त्याच्या समाजविचलित वर्तनास पोषक ठरते.

जून २०१५ मध्ये दिल्ली बालहक्क संरक्षण आयोगाने प्रकाशित केलेल्या ङ्गमुले गुन्हे का करतातफ या रिपोर्टनुसार दिल्लीतील विधी संघर्षग्रस्त मुलांवर लक्ष केंद्रित केले आहे. या अहवालात बाल गुन्हेगारीची नोंद असलेल्या मुलांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी, या मुलांवर आरोप असलेल्या गुन्ह्याचे स्वरूप आणि मुलांना गैरवर्तनाकडे ढकलणाऱ्या घटकांचे विश्लेषण करण्यात आले आहे. या अहवालानुसार कुटुंब, समुदाय, शाळा आणि शिक्षण, तसेच मित्र-मैत्रिणींचा यांच्या प्रभावावर प्रकाश टाकण्यात आला आहे. यापैकी बहुतेक मुलांनी अनेक प्रकारच्या वंचना अनुभवल्या होत्या. त्यात गरीब, आर्थिक पार्श्वभूमी, अशिक्षित पालक आणि विघटित कुटुंबांचा समावेश होतो. या मुलांनी शाळा सोडलेली होती व त्यांना कुटुंबाला आर्थिक आधार देण्यासाठी स्वतंत्रपणे काम करणे गरजेचे होते. बाल गुन्हेगारीच्या समाजशास्त्रीय सिद्धांतामध्ये पर्यावरण, सामाजिक रचना आणि शिक्षण प्रक्रिया ही कारणे महत्त्वाची मानली आहेत.

**४.३.१. बालगुन्हेगारीची कारणे** (Causes of Juvenile Deliquency):

कोणीही जन्मजात गुन्हेगार नसतो. बाल गुन्हेगारीसाठी सामाजिक परिस्थिती हा घटक महत्त्वपूर्ण ठरतो. परिस्थिती त्यांना गुन्हेगार बनवते. जन्मापासून व्यक्ती जी सामाजिक परिस्थिती अनुभवते त्याचा दूरगामी परिणाम त्याच्या व्यक्तिमत्त्वावर होतो. घरातील आणि बाहेरील सामाजिक- सांस्कृतिक वातावरण एखाद्याच्या जीवनाला आणि एकूण व्यक्तिमत्वाला आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. अल्पवयीन गुन्हेगारीला अनेक घटक कारणीभूत आहेत. त्यातील एक प्रमुख कारण म्हणजे गरिबी हे आहे. त्याशिवाय विस्कळीत कुटुंब, मित्रमंडळींचा दबाव आणि आजूबाजूचा परिसर, शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी याचा मुलांच्या विकासावर परिणाम होतो. शिक्षण प्रक्रियेतून बाहेर पडलेली मुले गुन्हेगारीकडे वळण्याची अधिक शक्यता असते. बाल गुन्हेगारीची अनेक कारणे आहेत त्यापैकी सामान्य कारणे खालील प्रमाणे

१. **कुटुंब** (family) : कुटुंब हे मुलाच्या सामाजिकरणाचे मूलभूत साधन आहे. अजाणत्या वयात चांगले- - वाईट, योग्य- अयोग्य या संकल्पना कुटुंबातूनच रुजवल्या जातात. सामाजिक मूल्य, नियमने यांचे ज्ञान कुटुंबातूनच मिळते. कुटुंब मुलांचे व्यक्तिमत्व घडविण्यात अथवा बिघडविण्यात महत्त्वपूर्ण ठरते. आई-वडील व भावंडे यांची भूमिका यामध्ये महत्त्वाची असते. ज्या किशोरवयीन मुलाने गुन्हेगारी वर्तन केले आहे त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी पाहता अशी मुले अनेक समस्या असलेल्या कुटुंबातून आल्याचे दिसून येते. ज्या पालकांकडून मुलांना भक्कम आधार व सुरक्षितता लाभली नाही अशी भग्न कुटुंबे, एकल पालकत्व असलेली कुटुंबे, कुटुंबातील सदस्यात असलेले मतभेद, अविश्वास, मानसिक आजार असलेले पालक ही बालगुन्हेगारी मागील प्रमुख कारण असू शकतात. अशी समस्याग्रस्त कुटुंबे बाल गुन्हेगारीस पोषक ठरतात.

**(अ) विघटित कुटुंब** (Broken Family) : पती-पत्नींचा घटस्फोट, पती-पत्नी मधील कायदेशीर संघर्ष, पती-पत्नी पैकी कोणा एकाचा मृत्यू यासारख्या कुटुंबास विघटित कुटुंब म्हणतात. अशा कुटुंबातील मुलांचे योग्य समायोजन होत नाही. प्रेमाचा अभाव, योग्य मार्गदर्शनाचा अभाव, नियंत्रणाचा अभाव, सावत्र मुलांना दिली जाणारी कठोर वागणूक व असुरक्षिततेच्या भावनेतून मुलांचे अपसमायोजन होते. बहुतांश बाल गुन्हेगार हे अशी विघटित कुटुंबातून आलेले असतात.

**(ब) कुटुंबातील सामाजिक समस्या** (Social Problems in the Family) : अनेक कुटुंबांमध्ये आई-वडील किंवा मोठी भावंडे अनैतिक कृत्यांमध्ये गुंतलेली असू शकतात. अशा मुलांना विचलित वर्तन व समाज संमत वर्तन यामध्ये भेद करता येत नाही. लहानपणापासून अनैतिक वर्तनाच्या प्रभावाखाली असलेली ही मुले गुन्हेगारी प्रवृत्ती जोपासतात. कुटुंबातून केला जाणारा लिंगभेद, वयानुसार भेदभाव, वंशभेद, मुलांच्या मनावर विपरीत परिणाम करतात. काही श्रीमंत कुटुंबामध्ये बालकामगारांना दिली जाणारी वागणूक, प्राण्यांशी क्रूरवर्तन अशा प्रकारचे वर्तन सुयोग्य वाटू लागते. बालकांना योग्य व अयोग्य वर्तनातील फरक समजत नाही. अशा अनुभवातून जाणारी किशोरवयीन मुले हिंसाचारामध्ये सहभागी होतात.

**(क) कुटुंबातील नैतिकतेचा अभाव** (Moral problems in the family) : आज-काल किशोरवयीन मुलांमधील नैतिकतेचा अभाव प्रकर्षाने दिसून येतो. किशोरवयीन मुलांना कुटुंबातील व्यक्तींचा त्यांना भेटणाऱ्या व ओळखणाऱ्या सर्व लोकांचा आदर कसा करावा हे माहीत असले पाहिजे. जी मुलं पालकांना घरातील मोठ्यांचा, वयस्कांचा अनादर करताना पाहतात, ती मुलं आपल्या पालकांचा आणि मोठ्या भावांचा आदर करत नाहीत. योग्य नैतिक मूल्यांच्या अभावी मुले विचलित वर्तनाकडे झुकतात.

**(ड) पालकत्व शैली** (Parenting Style): मुलांच्या जडणघडणीत पालकत्वाची शैली महत्त्वपूर्ण ठरते. गुन्हेगारीकडे वळण्याचे किशोरवयीन मुलांचे हे एक महत्त्वाचे कारण आहे असे अनेक संशोधकांचे म्हणणे आहे. पालक कधीकधी खूप कठोर वागतात. काही वेळा अतिशय प्रेमळ वागतात. पालकांच्या वर्तनातील विसंगती मुलांच्या वर्तनावर विपरीत परिणाम करते. पालक लहान सहान गोष्टींसाठी मुलांना शिक्षा करणे, किशोरवयीन मुलांवरील अपेक्षांचे ओझे, शिस्तीचा अतिरेक, शिस्तीचा अभाव, बालकांची उपेक्षा, अवहेलना, मारहाण यातून मुले पालकांचा अनादर करू लागतात. त्यांच्या इच्छेविरुद्ध वर्तन करू लागतात. अशी मुले विचलित वर्तनाकडे वळतात.

२. **मानसिक व भावनिक समस्या** (Mental and Emotional Problems): कुटुंबातील आई-वडील किंवा भावंडांना काही वेळा मानसिक आजार, नैराश्य, आक्रमकता किंवा अति उत्साहीपणा यासारख्या मानसिक समस्या असतात. अशा कुटुंबातून आलेल्या मुलांना मित्र-मैत्रिणींमध्ये कमीपणा व हिनतेची भावना निर्माण होऊ शकते. काही वेळा आई-वडील व मुलांमध्ये भावनिक अस्थिरता, असुरक्षितता, नैराश्य, आक्रमकता, हिंसक प्रवृत्ती दिसून येते. अशाप्रकारे मानसिक व भावनिक समस्यांनी ग्रस्त बालके बेकायदेशीर, विचलित वर्तनाकडे वळू शकतात.

**३. गरिबी** (Poverty) : बाल गुन्हेगारीच्या अनेक कारण पैकी गरिबी हे एक अत्यंत महत्त्वाचे आणि गुंतागुंतीचे कारण आहे. गरिबीमुळे मुलांवर होणारे नकारात्मक परिणाम त्यांना गुन्हेगारीच्या मार्गावर जाण्यास प्रवृत्त करतात. गरिबीमुळे मूलभूत गरजांची पूर्तता होत नाही व त्यामुळे मुलांच्यात वैफल्य, अतृप्तीची भावना निर्माण होते. गरीब, भुकेलेल्या, हताश मुलांना चोरी किंवा इतर गुन्हेगारी कृत्य करण्याचा मोह होऊ शकतो. शिक्षणाअभावी चांगले भविष्य घडवण्याची, समाजमान्य मार्गाने जीवन जगण्याची संधी त्यांना प्राप्त होत नाही. अशावेळी आपल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी ते सहजपणे गुन्हेगारी जगात ओढले जाऊ शकतात. ज्या कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो तेथे तणाव आणि भांडणे वाढू शकतात. पालक अनेकदा कामाच्या ठिकाणी जास्त वेळ घालवतात किंवा अतिरिक्त काम करतात त्यामुळे ते मुलांना पुरेसा वेळ व लक्ष देऊ शकत नाहीत. घरातील अस्थिर वातावरण, भावनिक आधार व सुरक्षितते अभावी ते एकटेपणाची शिकार बनतात. अशी मुले नकारात्मक कृत्यांकडे आकर्षित होतात. अनेक गरीब कुटुंबात मुलांना कामाला पाठवण्याची गरज भासते. त्यामुळे शिक्षण अर्धवट राहण्याबरोबरच बालबजूर म्हणून ते शोषणाला बळी पडू शकतात. बाहेरच्या जगात बालमजूर म्हणून काम करताना अशी मुले गुन्हेगारी टोळ्यांच्या संपर्कात येऊ शकतात. अधिक पैसा मिळवण्याच्या आकर्षणातून गुन्हेगारी कृत्यांमध्ये सामील होऊ शकतात. या शारीरिक व मानसिक शोषणाचा गंभीर परिणाम बालमनावर होऊ शकतो व ते हिंसक किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीचे बनू शकतात.

४. **बेकारी** (Unemployment) : बाल गुन्हेगारी आणि बेकारी याचा थेट संबंध आहे. बेकारीमुळे अनेक सामाजिक आणि आर्थिक समस्या निर्माण होतात, ज्या अप्रत्यक्षपणे बालकांना गुन्हेगारीकडे ढकलण्यास कारणीभूत ठरू शकतात. आर्थिक संकटामुळे कुटुंबात लहान सहान गोष्टीवरून संघर्ष उद्भवतो. बेकारीमुळे त्रस्त झालेले पालक तणावाखाली असतात. ते आपल्या मुलांच्या मूलभूत गरजा पूर्ण करू शकत नाहीत, शिक्षण देऊ शकत नाहीत, मुलांना शाळेतून काढून कामाला पाठवले जाते. शिक्षण अर्धवट राहिल्यामुळे मिळणाऱ्या ज्ञानापासून आणि कौशल्यांपासून मुले वंचित राहतात. त्यांचे चांगले भविष्य घडविण्याचे मार्ग बंद होतात. बेकारी समाजामध्ये अस्थिरता व नैराश्य निर्माण करते. या असंतोषाचा नकारात्मक परिणाम मुलांच्या भवितव्यावर पडतो. त्यांना नैतिक मूल्य व कायद्याचे महत्व वाटत नाही. अशा वातावरणात वाढणारी मुले गुन्हेगारी मार्गाकडे वळतात.

५. **समवयस्कांचा प्रभाव व दबाव** (Influence and Pressure) : किशोरवयीन मुलांमध्ये समवयस्कांचा प्रभाव आणि दबाव एक महत्त्वपूर्ण आणि शक्तिशाली घटक आहे. किशोरवयीन मुले त्यांच्या समवयस्कांच्या मतांना आणि वर्तनाला खूप महत्त्व देतात. त्यांना त्यांच्या गटात स्वीकारले जाण्याची तीव्र इच्छा ठेवतात. गटामध्ये सामील होण्यासाठी मुले कोणत्याही गोष्टीला नाही म्हणत नाहीत. कारण एकटे पडण्याची त्यांना भीती वाटते. ही भीती त्यांना चुकीच्या मार्गावर नेऊ शकते. याच्यामुळे अनेकदा ते अशा गोष्टी करण्यास तयार होतात, ज्या त्यांच्यासाठी किंवा समाजासाठी हानिकारक असू शकतात. किशोरवयीन मुले अनेकदा समवयस्कांचे अनुकरण करतात. त्यांच्या गटातील सामर्थ्यवान व आपला दबाव निर्माण करणारी मुले गुन्हेगारी वर्तन करणारी असतील तर त्याचा प्रभाव त्यांच्यावर पडतो. त्यांना असे वाटते की गुन्हेगारी कृत्य केल्याने ते अधिक 'धाडसी' किंवा 'प्रौढ' दिसतील. काही वेळा गटातील इतर सदस्यांकडून विशिष्ट कृत्य करावे यासाठी दबाव टाकला जातो. आपली खिल्ली उडवली जाईल, टर उडवली जाईल या दबावातून अनेक मुले अनिच्छेने गुन्हेगारी कृत्यात सामील होतात. ज्या मुलांचे घरी व शाळेमध्ये चांगले संबंध नसतात त्यांना अशा गटात आपलेपणा व स्विकराहर्ता जाणवते. काही किशोरवयीन मुलांना गुन्हेगारी कृत्य करणे धाडसी किंवा रोमांचक वाटते. समवयस्कांच्या दबावामुळे ते या ङ्कथ्रिलफचा अनुभव घेण्यासाठी चुकीचे पाऊल उचलू शकतात. यासाठी समवयस्क व गटातील

सदस्य एकमेकांना प्रोत्साहन देतात व भीती कमी करण्याचा प्रयत्न करतात. ज्यामुळे गुन्हेगारी कृत्य करणे अधिक सोपे वाटते. म्हणूनच समवयस्कांचा प्रभाव आणि दबाव बाल गुन्हेगारीसाठी निर्णायक घटक ठरू शकतो.

६. **शेजार व परिसरातील वातावरण** (Neighbourhood and Surrounding Atmosphere) : शेजार आणि परिसर बाल गुन्हेगारीसाठी एक महत्त्वपूर्ण पार्श्वभूमी तयार करतात. नकारात्मक सामाजिक वातावरण, संधीचा अभाव आणि असुरक्षितता या घटकांमुळे मुलांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती वाढू शकते. अशा परिसरात मुलांचे वास्तव्य असेल आणि शेजारी गुन्हेगार प्रवृत्तीचे लोक किंवा गुन्हेगारी करणारे लोक रहात असतील तर गुन्हेगारी प्रवृत्तीचा नकारात्मक आदर्श त्यांच्यापुढे उभा राहतो. पैसे कमवण्याचा सोपा मार्ग किंवा समाजात दबदबा निर्माण करायचा मार्ग म्हणूनही याकडे किशोरवयीन मुले आकर्षित होऊ शकतात. गुन्हेगारीग्रस्त परिसरात वाईट सवयी लागण्याची शक्यता जास्त असते. अशा परिसरात शाळा, खेळाची मैदाने, मनोरंजनाच्या संधी, उपलब्ध नसतील तर अशा मुलांना आपला रिकामा वेळ विधायक कामात घालवण्याची संधी मिळत नाही. अशा परिसरामध्ये हिंसा व गुन्हेगारी सामान्य गोष्ट वाटू लागते तेव्हा कायदा व मूल्यांचे महत्त्व कमी होऊ शकते. अशा ठिकाणी मुलांची शारीरिक व मानसिक वाढ योग्य प्रकारे होत नाही.

७. **शहरीकरण** (Urbanization) : भारतात १९ व्या शतकाच्या आरंभापासून शहरीकरणाला सुरुवात झाली. दळणवळणाची साधने, संदेशवहनाची माध्यमे, यांत्रिकीकरण व कामाची संधी यामुळे हजारो कामगारांनी ग्रामीण भागातून शहराकडे स्थलांतर केले. सद्यःस्थितीत शहरीकरणाची प्रक्रिया वेगवान झाली आहे. त्याबरोबरच शहरांमध्ये लोकसंख्येची घनता सातत्याने वाढत आहे. शहरीकरणातून विजातीयता, व्यवसायामध्ये संमिश्रता, अनामिकता, व्यक्तिवादी विचारसरणी, छोट्या कुटुंबाचे प्रचलन, मनोरंजनाचे व्यापारीकरण, वाढत्या झोपडपट्ट्या, गरिबी, बेकारी अशा विविध कारणांमुळे शहरी जीवनातील सामाजिक नियंत्रणाची साधने शिथिल झाली आहेत. सामाजिक दबाव व मूल्यांअभावी शहरांमध्ये स्वैर वर्तनाची प्रवृत्ती वाढली आहे. अशा ठिकाणी बाल गुन्हेगारीचा प्रश्न गुंतागुंतीचा बनला आहे.

८. **झोपडपट्टी** (Slums) : शहरीकरणातून निर्माण झालेला एक जटिल प्रश्न म्हणजे गलिच्छ वस्त्या व झोपडपट्टी होय. औद्योगिकीकरण, शहरीकरण व शहरात वाढणारी लोकसंख्येची घनता अनेक समस्याना कारणीभूत आहे. जागेची टंचाई, जागेची वाढती किंमत, वाढत्या महागाईमुळे घरांचा प्रश्न व किमान जीवनमान जगण्यासाठी लागणाऱ्या उत्पन्नाचा प्रश्न यामुळे झोपडपट्ट्यांची समस्या गंभीर बनली आहे. अशा वस्त्यांमध्ये कच्ची घरे, दाट लोकवस्ती, पिण्याचे पाणी, रस्ते, दिवाबत्ती, दवाखाने यांचा अभाव दिसून येतो. या परिसरातील गरीब लोक, पती-पत्नी दोघेही उदरनिर्वाहासाठी घराबाहेर पडतात. मर्यादित उत्पन्नामुळे बालकांच्या सर्व गरजांकडे दुर्लक्ष होते. याशिवाय त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे, संस्कार करणे शक्य होत नाही. अशा वस्त्यांमध्ये वेश्यावृत्ती, जुगार, दारू, मादक द्रव्यांचे सेवन अथवा व्यापार होत असतो. याचा प्रभाव मुलांच्यावर पडू शकतो. अशा वातावरणात शिवीगाळ, गुंडागर्दी, भांडणे, हिंसा, मारामाऱ्या सहज दृष्टीस पडतात. आई-वडिलांच्या नियंत्रणाचा अभाव, समाजाचा व शेजारी यांच्या दडपणाचा अभाव, शिक्षण, शिस्त, मार्गदर्शन व संस्कार याकडे होणारे दुर्लक्ष यामुळे गलिच्छ वस्त्या अथवा झोपडपट्ट्या बाल गुन्हेगारीची केंद्रे बनली आहेत.

९. **माध्यमांचा प्रभाव** (Influence of media) : माध्यम हे एक शक्तिशाली साधन आहे, ज्याचा बालकांच्या मनावर आणि वर्तनावर मोठा प्रभाव पडतो. आधुनिक जगात प्रसार माध्यमे चित्रपट, इंटरनेट, सोशल मीडिया, व्हिडिओ गेम्स इत्यादी मुलांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. माध्यमांचा मुलांच्या विचारसरणी,

दृष्टिकोन आणि वर्तनावर खोलवर परिणाम होतो. चित्रपट मालिका, व्हिडिओ गेम्स यामध्ये मोठ्या प्रमाणावर हिंसाचार दाखवला जातो. लहान मुले अशा दृश्यांचे सहजपणे अनुकरण करू लागतात. समाज माध्यमांमध्ये गुन्हेगारांना हिरो म्हणून सादर केले जाते. त्यांचे उदात्तीकरण केले जाते. त्यामुळे गुन्हेगारी जीवनाबद्दल मुलांना आकर्षण वाटू शकते. अनेक माध्यमांमध्ये स्वार्थ, फसवणूक, कायद्याचे उल्लंघन यासारख्या नकारात्मक मूल्यांना प्रोत्साहन देत असल्याचे दिसून येते. याचा मुलांच्या नैतिक विकासावर वाईट परिणाम होतो. माध्यमांच्या आहारी गेलेल्या मुलांना वास्तव व काल्पनिकता यातील फरक लक्षात येत नाही. त्यामुळे ते चित्रपटातील किंवा गेम्स मधील हिंसक कृतींना खरं मानून त्याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करू शकतात. अशी मुले सामाजिक जीवनापासून दूर जातात. त्यांच्यातील एकटेपण व नैराश्याची भावना त्यांना गुन्हेगारीकडे ढकलण्यास कारणीभूत ठरू शकते. इंटरनेट व सोशल मीडियावर उपलब्ध झालेल्या चुकीच्या व भावना भडकवणाऱ्या माहितीमुळे मुलांची दिशाभूल होऊ शकते. चित्रपट आणि पॉर्नोग्राफिक साहित्यातून अनैतिकता, धूम्रपान, मद्यपान, अशा कृती दर्शवल्या जातात. या बाबी किशोरवयीन मुलांच्या मनावर खोल छाप सोडतात. त्यातून ते गुन्हे आणि गैरवर्तन करण्याच्या युक्त्या शिकतात. अशा युक्त्यांचे अनुकरण करून चोऱ्या, घरफोड्या आणि अपहरण करण्याचा प्रयत्न केला आहे. असे साहित्य गैरवर्तणुकीच्या वृत्ती व आचरणाला प्रोत्साहन देतात. याबरोबरच कठोर मानसिकता, धाडसी वृत्ती निर्माण करतात. अश्लील कन्टेन्ट लैंगिक इच्छा जागृत करतात आणि दिवास्वप्न पाहण्यास प्रवृत्त करतात. अशी मुले गैरमार्गाकडे वळण्याची शक्यता जास्त असते.

या कारणां शिवाय अंधविश्वास, शिक्षण प्रणालीतील दोष, अति श्रीमंत वर्गातील मुक्त जीवन, नैसर्गिक आपत्ती अशा काही इतर घटकांच्या प्रभावामुळे ही गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन वाढत आहे.

**४.३.२. बालगुन्हेगारी उपाययोजना:** (Remedies of Juvenile Delinquency)

**बालगुन्हेगारी सुधार कार्यक्रम** (Reformative Programmes of Juvenile Aelinquents):

एकोणिसाव्या शतकापूर्वी भूतकाळात बालकांना प्रौढांप्रमाणेच वागवले जात असे. त्यांना त्यांच्या गुन्ह्यासाठी कठोर शिक्षा दिली जात होती. बालकांच्या विशिष्ट गरजा आणि त्यांच्या गुन्हेगारी वर्तनामागील कारणांचा विचार केला जात नव्हता. परंतु १८६४ साली नेमलेल्या कारागृह समितीने प्रौढ गुन्हेगार व बाल गुन्हेगार यांच्यामध्ये फरक केला पाहिजे असे निर्देश दिले. भारतामध्ये तेव्हापासून बाल बालगुन्हेगारांना सुधारण्याची संधी दिली पाहिजे असा सुधारणात्मक विचार पुढे आला.

भारतात १८९७ साली भारतीय सुधार गृह कायदा पास करण्यात आला. त्यानुसार मुंबई विभागात १६ वर्षाखालील व इतर प्रदेशातील पंधरा वर्षाखालील बाल गुन्हेगारास सुधार गृहात पाठवण्याची तरतूद करण्यात आली. प्रादेशिक शासनाने बाल सुधारासंबंधी विविध कायदे पास केले. मुंबई बाल अधिनियम (सुधारित) १९७५ हा कायदा संमत करण्यात आला. प्रस्तुत कायद्यान्वये १६ वर्षाच्या आतील मुले व १८ वर्षाच्या आतील मुली या कायद्याच्या कक्षेत येऊ लागल्या. बालगुन्हेगारांच्या सुधारात्मक उपायांसाठी शासनाने व काही सार्वजनिक संस्थांनी अनेक उपचार संस्था सुरू केल्या. या अंतर्गत बालकांची उपेक्षा थांबवणे, बालकांच्या मनातील न्यूनगंडाची भावना कमी करणे, बालकांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रोत्साहन देणे या गोष्टींना प्राधान्य देण्यात आले.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला बालकांसाठी विशेष न्यायालय प्रणाली विकसित झाली. १८९९ साली अमेरिकेमध्ये पहिले बाल न्यायालय स्थापन झाले. या न्यायालयांचा उद्देश बालकांना गुन्हेगार म्हणून नव्हे तर मदतीची गरज असलेले बालक म्हणून पाहणे हा होता. या न्यायालयांमध्ये औपचारिक गुन्हेगारी प्रक्रिये ऐवजी अनौपचारिक आणि कल्याणकारी दृष्टिकोन ठेवण्यात आला. न्यायाधीशांना बालकांच्या पार्श्वभूमीचा, कौटुंबिक परिस्थितीचा आणि वर्तणुकीच्या कारणांचा विचार करण्याचा अधिकार मिळाला.

संयुक्त राष्ट्र बाल अधिकार या आंतरराष्ट्रीय करारात बालकांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्यासाठी विशेष न्याय प्रणालीची गरज यावर भर देण्यात आला आहे. बाल गुन्हेगारांसाठी विविध सुधारणा कार्यक्रम तयार करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये समुपदेशन, शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, वर्तणूक सुधारणा थेरपी आणि कुटुंबाचे समुपदेशन यांचा समावेश होतो. सुरुवातीच्या काळात हे कार्यक्रम संस्था आधारित होते जिथे बालकांना सुधार गृहांमध्ये ठेवले जात असे. मात्र आता समुदाय आधारित कार्यक्रमांवर अधिक भर दिला जात आहे. त्यामुळे बालकांना त्यांच्या कुटुंबात आणि समाजात राहून सुधारणांची संधी मिळावी. बाल गुन्हेगारीच्या सुधारक कार्यक्रमांवर अनेक संशोधने झाली आहेत व त्यास अनुसरून कार्यक्रमांमध्ये बदल आणि सुधारणा केल्या जात आहेत. प्रभावी सुधारणा कार्यक्रमांमध्ये बालकांच्या विशिष्ट गरजा, त्यांच्या गुन्हेगारी वर्तनामागील कारणे व त्यांच्या सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीचा विचार करणे महत्त्वाचे आहे असे संशोधनातून दिसून आले. या कार्यक्रमांचा उद्देश बालकांना केवळ शिक्षा देणे नसून त्यांना एक चांगले भविष्य देण्यासाठी मदत करणे हे आहे. शासनाच्या या बाल सुधार कार्यक्रमांमध्ये बाल न्यायालय, बाल अभिक्षणगृह, प्रमाणित शाळा, सुधार शाळा, किशोर सुधारालय, परिविक्षा वस्तीगृह, बालग्राम इत्यादी कार्यक्रमांचा समावेश होतो.

१. **बाल न्यायालय** (Juvenile Court):

प्रारंभी प्रौढ गुन्हेगार व बाल गुन्हेगार यांच्यावरील खटले एकाच न्यायालयात चालवले जात. परंतु बालगुन्हेगारांवरील खटले चालवण्यासाठी स्वतंत्र न्यायालयाची स्थापना करण्यात आली त्यांना बाल न्यायालय असे म्हणतात. सर्वात प्रथम बाल न्यायालय कलकत्ता येथे १९२२ मध्ये सुरू झाले. त्यानंतर मुंबई व मद्रास येथे बाल न्यायालयाची स्थापना करण्यात आली. आता बहुतेक सर्व राज्यात बाल न्यायालये सुरू करण्यात आली आहेत. ज्या ठिकाणी स्वतंत्र बाल न्यायालये नाहीत त्या ठिकाणी ठराविक दिवशी अभिनिरीक्षण गृहाच्या इमारतीत व न्यायालयाचे इमारतीत बाल न्यायालय भरवले जाते. भारत सरकारने बाल न्यायालय कायदा १९८६ (Juvenile Justice Act 1986) पास केला असून या कायद्यात बाल गुन्हेगारीकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहिले जाते.

बाल न्यायालयात १६ वर्षाखालील मुले व १८ वर्षाखालील मुलींचे खटले चालतात. पोलिसांना अशा मुलाला बेकायदेशीर वर्तन करताना पकडल्यापासून २४ तासाच्या आत बालकास न्यायालयासमोर हजर करावे लागते. बालकांसंबंधी पास केलेल्या कायद्याच्या अनुषंगाने समज देणे, पुन्हा असे कृत्य करणार नाही हे बॉण्ड वर लिहून घेणे, बालकास माता-पित्याकडे पाठवणे किंवा सुधार गृहात पाठवणे इत्यादी स्वरूपाचे निर्णय घेतले जातात. निरीक्षणगृहातील अधिकारी व परीविक्षा अधिकारी यांनी केलेल्या निरीक्षण व अभ्यासातून, प्राप्त निष्कर्षातून, गुन्ह्याचे स्वरूप पाहून वा गंभीर गुन्हा असल्यास मुलाला सुधार संस्थेकडे पाठवण्याचा निर्णय घेतला जातो. गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांच्या प्रकरणांमध्येही बालकांचे पुनर्वसन आणि सुधारणा यावर लक्ष केंद्रित केले जाते. भारतात बाल न्यायालयांची संख्या कमी आहे. महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी निश्चित दिवसांनी

भरणाऱ्या बाल न्यायालयाची स्थापना करण्यात आली आहे. मुंबई येथे स्वतंत्र बाल न्यायालय आहे. बाल न्यायालय ही एक संवेदनशील आणि विशेष प्रकारची न्यायप्रणाली आहे जी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या बालकांना शिक्षा देण्याऐवजी त्यांच्या पुनर्वसनावर आणि कल्याणावर लक्ष केंद्रित करते.

२. **बाल अभिक्षणगृह किंवा निरीक्षण गृह** (Remand Homes or Observation Homes) :

बाल अभिक्षणगृहाला 'बालरक्षा गृह' (Remand Home) म्हणत असत. परंतु १९७५ च्या सुधारित बाल अधिनियमानुसार त्याला बाल अभिक्षण गृह म्हणण्यात येऊ लागले. बाल अभिक्षण गृह हे कायदेशीर संघर्ष असलेल्या बालकांसाठी तात्पुरते निवासस्थान आहे. ही कल्याण गृह महाराष्ट्रात महाराष्ट्र राज्य परीविक्षा आणि अनुरक्षण मंडळ या संस्थेच्या नियंत्रणाखाली चालतात. चांगल्या रिमांड होमची महत्वाची वैशिष्ट्ये म्हणजे अलगीकरण, शिक्षण, प्रशिक्षण, मनोरंजनाच्या सुविधा, नियंत्रित आणि प्रभावी देखरेख होय. जिथे त्यांची चौकशी आणि पुढील कारवाई होईपर्यंत देखरेखीखाली ठेवले जाते. बालगुन्हेगारास जेव्हा पकडून न्यायालय समोर हजर केले जाते. तेव्हा त्याची संपूर्ण माहिती घेणे आवश्यक असते. ही माहिती प्राप्त होईपर्यंत त्याच्या दैनंदिन वर्तनावर लक्ष द्यावे लागते. यासाठी त्याला बाल अभिक्षण गृहात ठेवले जाते. म्हणूनच या ग्रहांना स्थानबद्धतेचे ठिकाण म्हणून पाहण्याऐवजी अधिक निरीक्षणाचे गृह म्हणून पाहिले जाते. बाल गुन्हेगार नेहमीसाठी बाल अभिक्षण गृहात राहत नाही. बालकाने केलेल्या गुन्ह्याचे स्वरूप सामान्य असेल तर बाल न्यायालयाच्या आदेशानुसार त्याला पालकांच्या स्वाधीन केले जाते. परंतु गंभीर गुन्हा असल्यास मात्र मुलांना दीर्घकाळ ठेवले जाऊ शकते. अशा बालकांच्या वर्तनाचे निरीक्षण करून केस स्टडी केली जाते व परिविक्षा अधिकाऱ्यांच्या सहाय्याने न्यायाधीश त्याबाबत निर्णय घेतात. त्यास अनुसरून मुलांना सुधारगृहात पाठवण्यात येते. बऱ्याच वेळा इथे बाल गुन्हेगारांबरोबरच बेघर, निराश्रीत, अनाथ, उपेक्षित बालकांना ठेवण्याची तरतूद आहे. भारतात १९९३ च्या आकडेवारीनुसार सर्व राज्यांमध्ये रिमांड होम अस्तित्वात नाहीत. १४ राज्यांमध्ये व एका केंद्रशासित प्रदेशात रिमांड होम होम आढळते. सर्वाधिक रिमांड होम महाराष्ट्रात आहेत. सुमारे १५४ निरीक्षण गृहांपैकी निम्म्याहून अधिक सरकारी संस्थांद्वारे चालवले जातात. तर काही ठिकाणी स्वयंसेवी संस्थांद्वारे ही चालवली जातात. या संस्थांना शासनाकडून ७५ टक्के अनुदान दिले जाते.

३. **प्रमाणित शाळा** (Certified School) : प्रमाणित शाळा या बाल गुन्हेगारीच्या समस्येवर मात करण्यासाठी आणि बालकांना सुधारण्याची संधी देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या विशेष शैक्षणिक संस्था आहेत. बाल न्यायालयातील निर्णयाप्रमाणे न्यायाधीश मुलांना कोणत्या सुधार संस्थेमध्ये ठेवायचे त्याचे मार्गदर्शन करतात. त्यासाठी त्यांची शारीरिक व मानसिक तपासणी केली जाते त्यांच्या गरजा आणि समस्यानुसार त्यांना योग्य गटात ठेवले जाते. अधीक्षक, शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने प्रमाणित शाळा चालवली जाते. प्रमाणित शाळा या शासनाच्या अनुरक्षण मंडळाद्वारे चालवल्या जातात. या शाळांचा उद्देश बालकांना सुरक्षित आणि संरक्षणात्मक वातावरण पुरवून त्यांना शिक्षण, व्यवसाय प्रशिक्षण आणि भावनिक आधार देणे आहे जेणेकरून ते पुन्हा गुन्हेगारीकडे न वळता समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होऊ शकतील. याबरोबरच या शाळांचा उद्देश बालकांना सुधारणे आणि त्यांचे पुनर्वसन करणे आहे. तसेच शिक्षेऐवजी बालकांच्या वर्तणुकीतील समस्यांचे मूळ शोधून त्यावर सकारात्मक बदल घडवण्यावर लक्ष केंद्रित करतात. या शाळा बालकांना गुन्हेगारी प्रवृत्तीच्या वातावरणापासून दूर ठेवतात आणि त्यांना सुरक्षित, प्रेमळ आणि संरक्षणात्मक वातावरण पुरवतात. या शाळांमधून बालकांना औपचारिक शिक्षण तसेच त्यांच्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते.

त्यामुळे त्यांना भविष्यात चांगले जीवन जगण्याची संधी मिळते आणि ते आर्थिकदृष्ट्या सक्षम बनतात. या शाळांमधून बालकांना प्रशिक्षित समुपदेशक आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने भावनिक आणि मानसिक आधार दिला जातो. त्यांच्या समस्या आणि गरजा समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन केले जाते. सामाजिक कौशल्ये विकसित करण्याबरोबरच या बालकांना सामाजिक नियम आणि जबाबदाऱ्या शिकवल्या जातात. त्यांच्यात आत्मविश्वास, आत्मसन्मान आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित केला जातो. त्यामुळे ते समाजात सहजपणे मिसळू शकतील. अनेक शाळा बालकांना त्यांच्या कुटुंबाशी पुन्हा जोडण्यासाठी प्रयत्न करतात. यासाठी कुटुंबाला समुपदेशन सेवा पुरवली जाते, जेणेकरून ते बालकांना स्वीकारण्यास आणि त्याला भावनिक आधार देण्यास तयार होऊ शकतील. या शाळांमध्ये औपचारिक शिक्षणाबरोबरच अनौपचारिक शिक्षण पद्धतीचा ही वापर केला जातो. बालकांच्या वयोगटांनुसार आणि शैक्षणिक स्तरानुसार अभ्यासक्रम तयार केला जातो. कला, क्रीडा आणि इतर मनोरंजनात्मक उपक्रमांनाही महत्त्व दिले जाते. बालकांना त्यांच्या आवडीनुसार आणि बाजारात मागणी असलेल्या व्यवसायांचे प्रशिक्षण दिले जाते. उदा. सुतारकाम, लोहार काम, विद्युत दुरुस्ती, संगणक प्रशिक्षण, टेलरिंग इत्यादी. बालकांमध्ये किती बदल झाला, किती शैक्षणिक प्रगती झाली आणि व्यावसायिक कौशल्यांचे नियमितपणे मूल्यांकन केले जाते. या आधारे त्याच्या पुनर्वसन योजनेत आवश्यक ते बदल केले जातात. जेव्हा बालकांना शाळेतून सोडण्याचा निर्णय घेतला जातो तेव्हा त्याची सामाजिक पार्श्वभूमी आणि कुटुंबाची परिस्थिती विचारात घेतली जाते. सोडल्यानंतरही काही कालावधीसाठी परिविक्षा अधिकारी त्याच्या संपर्कात राहतात आणि त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन आणि मदत पुरवतात.

४. **किशोर सुधारालय** (Borstal School) : मद्रास राज्यात १९२६ मध्ये सर्वप्रथम बोस्टल स्कूल विषयी कायदा पास करण्यात आला. बोस्टल स्कूल अधिनियमानुसार विविध राज्यात ङ्गकिशोर सुधारालयफ सुरू करण्यात आले. बोस्टल शाळा ही एक प्रकारची सुधारणा संस्था आहे जी १५ ते २१ वयोगटातील कायद्याचे उल्लंघन केलेल्या किशोरवयीन मुलांसाठी तयार केलेली आहे. मुलांना तुरुंगात पाठवण्याऐवजी त्यांच्यात सुधारणा घडवून आणणे व त्यांना समाजात पुन्हा स्थापित करणे हा त्या पाठीमागचा उद्देश आहे. भारतात या प्रकारच्या संस्थांना किशोर सुधारालय किंवा बोस्टल शाळा म्हणून ओळखले जाते. किशोर सुधारालयात किशोरांना दोन वर्षापेक्षा कमी आणि पाच वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी ठेवले जात नाही. त्यांना शिक्षण व औद्योगिक प्रशिक्षण दिले जाते. त्यांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक ते वातावरण व संधी उपलब्ध करून दिली जाते. किशोरांना वैद्यकीय मदत, मनोरंजन, शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली असते. त्यांच्यावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवून या कालावधीत बेकायदेशीर मार्गांचा त्याग करून समाजमान्य मार्गाने जगण्यास प्रवृत्त केले जाते. किशोर सुधारालय किंवा बोस्टल शाळा ही तरुण गुन्हेगारांना सुधारण्याची आणि त्यांना नवीन संधी देण्याची एक महत्त्वाची उपाय योजना आहे.

५. **परीविक्षा वस्तीगृह** (Probation Hostels) : परीविक्षा गृह ही एक प्रकारची निवासी संस्था आहे. या ठिकाणी कायद्याचे उल्लंघन केलेल्या परंतु तुरुंगात न पाठवलेल्या परिविक्षेवर सुटलेल्या अनाथ, निराश्रीत आणि ज्यांच्या आई-वडिलांची माहिती नाही अशा बाल अपचाऱ्यांना परिविक्षागृहात ठेवले जाते. मुलांना सुरक्षित वातावरण, निवास, भोजन आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक असलेले मार्गदर्शन पुरवले जाते. या कालावधीत परिविक्षा अधिकारी अशा किशोरांना व्यवसाय व नोकरी शोधण्यासाठी मदत करतात व त्यांनी पुन्हा कायदा विरोधी वर्तन करू नये व समाजसंमत मार्गाने जीवन व्यतीत करावे यासाठी प्रयत्न केले जातात.

त्याचप्रमाणे बाल गुन्हेगारास सहाय्य करण्याकरता, तसेच त्याच्या वर्तनासंबंधी अधून मधून अहवाल देण्यासाठी परिविक्षा अधिकारी नियुक्त केलेले असतात.

६. **सुधार शाळा** (Reformatory School) **:** भारतीय सुधार शाळा कायदा १८९७ ला पास करण्यात आला. त्यामध्ये मुलांना कारागृहात न पाठवता सुधार शाळांमध्ये पाठवण्याची तरतूद करण्यात आली. या शाळांमध्ये ७ ते १६ वयोगटातील गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्यास ठेवले जाते. या शाळेत त्यांना कमीत कमी ३ वर्ष आणि जास्तीत जास्त ७ वर्ष ठेवण्याची तरतूद आहे. या शाळेत बालकांची निवास, भोजन, कपडे इत्यादींची व्यवस्था केली जाते. सुधार शाळेवर अधीक्षक, प्रशिक्षक, डॉक्टर, काळजीवाहक इत्यादींची नियुक्ती केली जाते. तसेच मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण देखील दिले जाते.

७. **बालग्राम योजना** (Children's Village) : योग्य वेळी सुधारणात्मक उपचार न केल्यास आजचे बालापराधी उद्या अट्टल प्रौढ गुन्हेगार बनू नयेत यासाठी डॉ. हरमन मायनर यांनी १९६४ मध्ये ऑस्ट्रिया देशात बालग्राम योजना सुरू केली. भारतात पहिले बालग्राम १९६७ मध्ये हरियाणा येथे सुरू करण्यात आले. बालग्राम मध्ये प्रत्येक कुटुंबात १० याप्रमाणे २० कुटुंबातून २०० मुलांची सोय करण्यात आली. प्रत्येक कुटुंबाचा सांभाळ करणाऱ्या २० मातांची नियुक्ती करण्यात आली आहे. या योजनेचा उद्देश अशा कुटुंबातून बाल अपराध्यांना प्रेम मिळावे, त्यांच्यावर योग्य संस्कार व्हावे हा आहे. त्यानंतर महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान या राज्यातून बालग्राम योजना सुरू करण्यात आली. परंतु संपूर्ण देशात ही योजना सुरू करण्यात यश आले नाही.

**बाल गुन्हेगारी प्रतिबंधात्मक उपाय:**

वरील प्रमाणे बाल अपराध्यांची समस्या सोडवण्यासाठी शासनाने अनेक सुधारात्मक कार्यक्रम राबवले आहेत. परंतु भारतीय समाजव्यवस्था व तिचे बदलणारे स्वरूप पाहता प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवणे ही आवश्यक आहे.

१. कुटुंबांना आर्थिक आणि सामाजिक आधार देणे.

२. पालकांना मुलांच्या संगोपनाबाबत मार्गदर्शन करणे.

३. शाळांमध्ये मुलांसाठी समुपदेशन आणि मार्गदर्शन सेवा उपलब्ध करणे.

४. सामुदायिक स्तरावर बाल गुन्हेगारी प्रतिबंध कार्यक्रमाचे आयोजन करणे.

५. माध्यमांमधील हिंसक व अश्लील कंटेंट वर नियंत्रण ठेवणे.

६. मुलांसाठी शिक्षण, खेळ आणि मनोरंजनाच्या संधी वाढवणे.

७. मुलांच्या निरोगी व्यक्तिमत्व विकासाला आणि समायोजनाला मदत करणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करणे.

८. गुन्हेगारीला कारणीभूत ठरू शकणाऱ्या मुलांच्या वातावरणावर नियंत्रण ठेवणे.

९. समाजाच्या संस्थात्मक संरचनेत सुधारणा करणे उदा. कुटुंब, शेजारी, शाळा यासारख्या संस्थांमध्ये सुधारणा करणे.

१०. गरीब कुटुंबांची उत्पन्न पातळी वाढवणे.

११. मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

**४.४ सारांश:**

आधुनिक युगात वेगाने होणाऱ्या औद्योगीकरण व नागरीकरणामुळे सामाजिक परिवर्तनाशी जुळवून घेणे कठीण झाले आहे. परिणामस्वरूप इतर काही समस्यांबरोबरच बाल गुन्हेगारी या समस्येने गंभीर रूप धारण केले आहे. सामाजिक संस्थांच्या संरचनेमध्ये अमुलाग्र बदल होत आहे. कुटुंब विघटन, बदलती मूल्यव्यवस्था, चुकीचा आदर्श अनुसरण्यास युक्त समाजव्यवस्था परिवर्तनाला चालना देत आहे. जगात कोणीही गुन्हेगारीचे लेबल घेऊन जन्माला येत नाही. अपरिहार्य आणि सक्तीच्या परिस्थितीमुळे त्यांना गुन्हेगारी मार्गावर जाण्यास भाग पडते. परिस्थितीजन्य घटना व्यक्तीला गैर कृत्यांमध्ये सहभागी होण्यास भाग पाडतात. अशावेळी कळत-नकळतपणे बालकांच्या विचलित वर्तनास ही व्यवस्था कारणीभूत ठरत आहे. अपहरण, दरोडा, बलात्कार, खून, सामूहिक बलात्कार यासारख्या भयानक गुन्ह्यांमध्ये अल्पवयीन सहभागी झाल्याचे सिद्ध झाले आहे. काही तज्ञांच्या मते सध्याचे कायदे या समस्येचे निराकरण करण्यासाठी पुरेसे नाहीत. या मुलांवर गुन्हे केल्याबद्दल प्रौढांप्रमाणेच खटला चालवणे आणि शिक्षा देण्यासाठी कायद्यात सुधारणा करणे गरजेचे आहे. तथापि मानवतावादी दृष्टिकोनातून बालहक्क व बाल अधिकार महत्त्वाचे मानले जातात. अशावेळी प्रतिबंधात्मक उपायांवर जाणीवपूर्वक भर देण्याबरोबरच सुधारात्मक व पुनर्वसनात्मक प्रक्रियेवर अधिक लक्ष केंद्रित करणे व त्याचा आवाका वाढवणे गरजेचे आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न** (Check your Progress)

**प्रश्न १. योग्य पर्याय निवडा**

१. बालगुन्हेगारांना............ ही कायदेशीर संज्ञा वापरली जाते.

अ) बाल अपचारिता	ब) विधी संघर्षग्रस्त बालक

क) अल्पवयीन गुन्हेगार	ड) किशोर अपराधी

२. ङ्गएनसीआरबीफ च्या आकडेवारीनुसार ६४ टक्के बाल गुन्हेगार............ वयोगटातील आहेत.

अ) ७ते १२	ब) १० ते १४

क) १६ ते १८	ड) १८ ते २१

३. राज्यात सर्वात जास्त बाल अभिक्षणगृह (रिमांड होम) आहेत

अ) महाराष्ट्र	ब) राजस्थान

क) मध्य प्रदेश	ड) गुजरात

४. किशोरवयीन मुलांवर ............ चा प्रचंड प्रभाव असतो.

अ) समवयस्क	ब) आई वडील

क) कुटुंबीय	ड) शिक्षक

५. भारतात पहिले बालग्राम........ येथे सुरू करण्यात आले.

अ) महाराष्ट्र　　　　ब) हरियाणा

क) राजस्थान　　　　ड) गुजरात

**प्रश्न २. थोडक्यात उत्तरे लिहा**

१. बाल न्याय कायदा १९८६ नुसार कोणास बाल गुन्हेगार मानले जाते?

२. सर्वात प्रथम बाल न्यायालय कोठे स्थापन करण्यात आले?

३. संयुक्त राष्ट्र बाल अधिकाराच्या आंतरराष्ट्रीय करारात कशावर भर देण्यात आला?

४. भग्न कुटुंबाचे बालकांवर कोणते परिणाम होतात?

५. झोपडपट्ट्या बालगुन्हेगारीसाठी कशा पोषक आहेत?

६. समुदाय आधारित बाल सुधारणा कार्यक्रमांमध्ये कशावर भर दिला जातो?

७. परिविक्षागृहाचा महत्त्वाचा उद्देश कोणता?

८. प्रमाणित शाळा बाल गुन्हेगारांसाठी कोणते कार्य करतात?

९. महाराष्ट्रात बालअभिक्षणगृह कोणत्या संस्थेच्या नियंत्रणाखाली चालतात?

१०. भारतीय सुधार शाळा कायद्यात कोणती तरतूद करण्यात आली?

**४.५ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे** (Answer to Check your Progress)

**प्रश्न १. योग्य पर्याय लिहा**

१. विधी संघर्षग्रस्त बालक

२. १६ ते १८

३. महाराष्ट्र

४. समवयस्क

५. हरियाणा

**प्रश्न २. थोडक्यात उत्तरे लिहा**

१. बाल न्याय कायदा १९८६ नुसार सोळा वर्षापर्यंतची मुले व १८ वर्षापर्यंतच्या मुलीस बाल गुन्हेगार मानले जाते

२. सर्वात प्रथम बाल न्यायालय कलकत्ता येथे स्थापन करण्यात आले.

३. संयुक्त राष्ट्र बाल अधिकाराच्या आंतरराष्ट्रीय करारात बालकांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्यासाठी विशेष न्याय प्रणालीची गरज यावर भर देण्यात आला.

४. विघटित कुटुंबामध्ये मुलांचे योग्य समायोजन होत नाही. प्रेमाचा अभाव, योग्य मार्गदर्शनाचा अभाव, नियंत्रणाचा अभाव व असुरक्षिततेच्या भावनेतून मुलांचे अपसमायोजन होते.

५. झोपडपट्ट्या बालगुन्हेगारीसाठी पोषक ठरतात. कारण येथे उघडपणे वेश्यावृत्ती, जुगार, दारू, मादक पदार्थांचे सेवन अथवा व्यापार चालतो. अशा वस्त्यांमध्ये शिवीगाळ, भांडणे, मारामारी, हिंसा दृष्टीस पडते.

६. समुदाय आधारित बाल सुधारणा कार्यक्रमांमध्ये बालकांना त्यांच्या कुटुंबात व समाजात राहून सुधारण्याची संधी देण्यावर भर दिला जातो.

७. किशोरवयीन मुलांना तुरुंगात पाठवण्याऐवजी परिविक्षागृहात पाठवले जाते. येथे त्यांना व्यवसाय व नोकरीची संधी शोधण्यासाठी मदत व समाज संमत मार्गाने जीवन व्यतीत करावे यासाठी प्रयत्न करतात.

८. प्रमाणित शाळा बालकांना सुरक्षित व संरक्षणात्मक वातावरण पुरवून त्यांना शिक्षण, व्यवसाय प्रशिक्षण व भावनिक आधार देतात जेणेकरून ते पुन्हा गुन्हेगारीकडे वळणार नाहीत.

९. महाराष्ट्रात बालअभिक्षणगृह महाराष्ट्र राज्य परीविक्षा आणि अनुरक्षण मंडळ यांच्या नियंत्रणाखाली चालतात.

१०. भारतीय सुधार शाळा कायद्यात मुलांना कारागृहात न पाठवता सुधार शाळांमध्ये पाठवण्याची तरतूद करण्यात आली.

## ४.६ सरावासाठी प्रश्न (Exercise home Assignment)

**टिपा लिहा**

१. कुटुंब व बालगुन्हेगारी

२. बाल गुन्हेगारी व समवयस्क

३. बाल अभिक्षणगृह (रिमांड होम)

४. प्रमाणित शाळा

५. किशोर सुधारालय

६. परीविक्षा वस्तीगृह

**सविस्तर उत्तरे लिहा**

१. बालगुन्हेगारीचा अर्थ स्पष्ट करून बालगुन्हेगारीची कारणे लिहा

२. बाल गुन्हेगारी वरील सुधारात्मक उपाय सविस्तर लिहा.

## ४.३.२ सायबर गुन्हा: अर्थ, सायबर गुन्ह्यांची कारणे आणि सायबर गुन्ह्यांवरील उपाय.

## (Cyber Crime: Meaning, Causes and Remedies)

माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये संगणक, मोबाईल, इंटरनेट, विविध सॉफ्टवेअर्स आणि ॲप्लिकेशन्स, ऑनलाइन सेवा-सुविधा इत्यादींचा वापर वाढत गेला. या सर्वाचा सकारात्मक परिणामही दिसून आला. लोकांना एकाच ठिकाणावरून आपली जास्तीत-जास्त कामे संगणक आणि इंटरनेटच्या वापराने करता येऊ लागली. उदाहरणार्थ.-ऑनलाइन शॉपिंग, ऑनलाइन गेम्स, ई लर्निंग, ऑनलाइन बँकिंग, ऑनलाइन स्टडी, ऑनलाईन परीक्षा, ऑनलाइन सर्फिंग, ऑनलाइन बिल पेमेंट इत्यादी. या सर्व सुविधांमुळे वेळ, पैसा आणि श्रमामध्ये बचतही झाली. परंतु काही नकारात्मक परिणामही दिसून आले. त्यामध्ये सायबर गुन्हा एक महत्त्वपूर्ण सामाजिक समस्या म्हणून पुढे येत आहे. प्रत्येक समाजात प्रचलित असणारा कायदा आणि मूल्य यांच्या विरुद्धचे वर्तन म्हणजे गुन्हा होय. ज्या प्रकारचे कृत्य मानवतेच्या आणि मानवी समाजाच्या विरुद्ध असते, त्याला आपण गुन्हा म्हणू शकतो. गुन्हा ही संकल्पना स्थळ कालसापेक्ष असते. प्रत्येक समाजात नैतिक आणि सामाजिक मूल्यांमध्ये काही प्रमाणात विविधता दिसून येते. गुन्हे शास्त्रामध्ये गुन्हा, गुन्हेगार आणि गुन्हेगारी इत्यादींचा सखोल अभ्यास केला जातो. गुन्हा करणाऱ्याकडून गुन्ह्याला बळी पडलेल्या व्यक्तीवर अन्याय झालेला असतो म्हणून गुन्हेगाराला शिक्षा होणे क्रमप्राप्त ठरते.

सायबर गुन्ह्यांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. यावेळी तंत्रज्ञान हे माध्यम म्हणून वापरले जाते. तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे, गुन्हा करणारी व्यक्ती, म्हणजेच गुन्हेगार तंत्रज्ञानाचा आधार घेऊन आपल्या प्रत्यक्ष उपस्थिती शिवाय गुन्हा घडवून आणत असते.

सद्यस्थितीमध्ये संपूर्ण समाज व्यवस्थेसाठी इंटरनेटचा वापर अनिवार्य झाला आहे. प्रत्येक व्यक्ती संगणक, लॅपटॉप, मोबाइल किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक साधनांच्या माध्यमातून इंटरनेटचा वापर करून जगासोबत जोडलेला आहे. खाजगी, सहकारी, सरकारी क्षेत्र यामध्येही संगणक, इंटरनेटचा वापर अनिवार्य होत चालला आहे. सायबर गुन्ह्याचे नवीन प्रकार समोर येत आहेत. अशा सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी प्रत्येकाने दक्षता घेणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीमध्ये जगासोबतच भारतामध्ये सायबर गुन्हेगारी ही एक महत्वाची सामाजिक समस्या बनली आहे. सायबर गुन्हेगारीचा नकारात्मक परिणाम समाजावर होत आहे. म्हणून सायबर गुन्ह्याचा अर्थ समजून घेणे, सायबर गुन्ह्यांची कारणे आणि त्यावरील उपाय इत्यादींचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते.

**सायबर गुन्हा – व्याख्या व अर्थ :**

संगणक, इंटरनेट किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांचा माध्यम म्हणून वापर करून केलेला गुन्हा म्हणजे सायबर गुन्हा होय. सायबर गुन्हे करणाऱ्या व्यक्तींना सायबर गुन्हेगार असे म्हणतात. सायबर गुन्ह्यांमध्ये संगणकाचा माध्यम म्हणून वापर केला जाऊ शकतो. तसेच संगणकाला लक्ष्य (ATTACK) म्हणूनही वापरले जाऊ शकते.

१. ज्या प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये प्रत्यक्ष उपस्थित न राहता गुन्हेगारांकडून संगणक, मोबाईल, इंटरनेट इत्यादींचा माध्यम म्हणून वापर केला जातो आणि गुन्हा केला जातो, त्याला सायबर गुन्हा असे म्हणतात.

२. सायबर गुन्हा म्हणजे असा गुन्हा की, ज्यामध्ये संगणक इंटरनेटचा वापर करून बेकायदेशीर कृत्य केले जाते उदा. हॅकिंग, ऑनलाइन चोरी, ऑनलाईन फसवणूक करणे, बदनामी करणे माहितीची अदलाबदल करणे इत्यादी.

३. सायबर गुन्हा म्हणजे गुन्हेगार आपली ओळख लपवून किंवा बनावट ओळख तयार करून इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर करून गुन्हा करतो.

४. सायबर गुन्हा म्हणजे असे बेकायदेशीर कृत्य, की ज्यामध्ये संगणकाचा साधन म्हणून, लक्ष्य म्हणून किंवा साधन आणि लक्ष्य दोन्ही म्हणून वापर केला जातो.

वरील व्याख्यावरून सायबर गुन्ह्याचा अर्थ पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**सायबर गुन्ह्यांमध्ये...**

सायबर तंत्रज्ञान, संगणक, इंटरनेट इत्यादींचा माध्यम म्हणून वापर केला जातो, तसेच लक्ष्य म्हणूनही वापर केला जातो.

गुन्हेगार हा गुन्ह्याच्या ठिकाणी अप्रत्यक्षरीत्या उपस्थित असतो.

गुन्हेगार आपली ओळख लपवितो किंवा आपली बनावट ओळख निर्माण करतो.

सोशल मीडियाचा माध्यम म्हणून वापर केला जाऊ शकतो.

गोपनीय माहितीची चोरी, आदला-बदल, अश्लील मजकूर पसरविणे, बेकायदेशीर कृत्य करणे, पैसे चोरी, बदनामी इत्यादींसाठी संगणकाचा वापर केला जातो.

**सायबर गुन्ह्याचे प्रकार :**

माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर झाला. सुरुवातीला फक्त गोपनीय माहितीची चोरी करणे किंवा माहितीची अदलाबदल करणे इत्यादीपर्यंत मर्यादित असणारी सायबर गुन्ह्यांची व्याप्ती वाढत चालली आहे. उदा.- हॅकिंग, सोशल मीडियाच्या माध्यमातून एखादी व्यक्ती, संस्था, समूहाची बदनामी करणे, ऑनलाईन चोरी करणे इत्यादींचा समावेश सायबर गुन्ह्यांमध्ये झालेला आहे. सायबर गुन्ह्यांचे प्रकार आपणास पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील. यामध्ये प्रामुख्याने आर्थिक, फसवणूक, व्यवसायविषयक फसवणूक, सोशियल मीडियाशी संबंधित फसवणूक इत्यादींचा समावेश होतो.

**१. हॅकिंग (Hacking) :**

संगणक किंवा इतर इलेक्ट्रॉनिक सिस्टम मध्ये बेकायदेशीररित्या केलेला प्रवेश म्हणजे हॅकिंग होय.

ज्या व्यक्तीकडून संगणकाच्या सिस्टम मध्ये अनधिकृत प्रवेश केला जातो त्या व्यक्तीला हॅकर असे म्हणतात. हॅकिंगचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात. नैतिक हॅकिंग आणि अनैतिक हॅकिंग.

नैतिक हॅकिंग हे सरकारी मदत किंवा विविध गुन्हे उघडकीस आणण्यासाठी केले जाते.

अनैतिक हॅकिंग हे एखाद्या संगणकामधील माहिती चोरणे, माहितीची अदलाबदल करणे, माहिती लपविणे, मिळालेल्या माहितीचा गैरवापर करणे या उद्देशाने केले जाते. उदाहरणार्थ-ऑनलाइन बँकिंग संबंधित लॉग इन आयडी आणि पासवर्ड चोरी करणे इत्यादी.

**२. बाललैंगिक अपमानास्पद सामग्री (Child Sexually Abusive Material) (CS-M²):**

बालअत्याचार किंवा बालअश्लीलतेशी संबंधित सामग्रीचा (छायाचित्रे, चित्रफित) प्रसार करणे हा एक प्रकारचा सायबर गुन्हा आहे. आय.टी. कायद्याच्या कलम ६७ (ब) नुसार, बालकांसंबंधित अश्लील सामग्री इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रकाशित करणे, प्रसारित करणे शिक्षेस पात्र आहे.

**३. सायबर छळ/ सायबर बुलिंग – (Cyber Bullying)**

संगणक, लॅपटॉप, मोबाईल इत्यादींसारख्या इलेक्ट्रॉनिक किंवा संप्रेषण साधनांच्या माध्यमातून एखादी व्यक्ती किंवा समूहाला संस्थेला त्रास देणे, छळ करणे.

**४. सायबर स्टॉकिंग/ पाठलाग करणे – (Cyber Stalking)**

सायबर स्टॉकिंग म्हणजे समोरील व्यक्तीची इच्छा, होकार नसतानादेखील इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्या व्यक्तीशी संवाद साधण्याचा प्रयत्न करणे, त्या व्यक्तीचे अनुसरण करणे. उदा. इंटरनेट, ई-मेल,सोशल मीडियाच्या माध्यमातून अनधिकृत संदेश पाठविणे, त्रास देणे इत्यादी.

**५. ऑनलाइन रोजगार विषयक फसवणूक (Online Job Fraud)**

यामध्ये रोजगाराची आवश्यकता असणाऱ्या गरजू लोकांना जास्त पगार आणि चांगल्या रोजगाराची खोटी हमी किंवा आश्वासन देऊन फसविण्याचा प्रयत्न केला जातो. यामध्ये खोटी वेबसाईट तयार करून नोकरी, रोजगाराचे आमिष दाखवून ऑनलाईन फसवणूक केली जाते.

**६. फिशिंग – (Phishing)**

या प्रकारामध्ये एखाद्या व्यक्तीकडून फोन कॉलद्वारे ग्राहक आयडी, बँकेचा अकाउंट नंबर, एटीएम कार्ड वरील नंबर, एटीएम कार्डचा पिन, कार्ड समाप्तीची तारीख, CVV नंबर, ओटीपी इत्यादी प्रकारची वैयक्तिक आणि गोपनीय माहिती विविध प्रकारचे आमिष दाखवून काढून घेतली जाते आणि त्या माहितीचा वापर बँक खात्यांमधील पैसे चोरीसाठी केला जातो.

उदा. आपणास ऑनलाईन लॉटरी लागली आहे. आपल्या अकाउंटवर पैसे ट्रान्सफर करण्यासाठी आपला अकाउंट नंबर,बँकेचा अकाउंट नंबर, एटीएम कार्ड वरील नंबर, एटीएम चा पिन, कार्ड समाप्तीची तारीख, CVV नंबर, ओटीपी इत्यादी प्रकारच्या माहितीची मागणी केली जाते. थोड्या वेळानंतर, बँकेतील पैसे कट झाल्याचा संदेश आल्यानंतर सदरचा फोन कॉल हा फसवणुकी संदर्भातील होता असे लक्षात येते.

काही वेळा फोन कॉलद्वारे बँकेतून बोलत आहे असे भासवून एखाद्या व्यक्तीकडून एटीएम कार्ड अपडेट करण्यासाठी माहितीची विचारणा केली जाते आणि गोपनीय माहिती घेऊन गैरवापर केला जातो. त्यामुळे अशा प्रकारची कोणतीही वैयक्तिक आणि गोपनीय माहिती कोणत्याही परिस्थितीत फोनवरून अनोळखी व्यक्तीला सांगू नये. या सोबतच जाणीव-जागृती म्हणून बँक सुद्धा आपल्या ग्राहकांना आपला इंटरनेट बँकिंगचा पासवर्ड किंवा ओटीपी कोणासोबतही शेअर करू नये असा सल्ला वारंवार देत असते.

**७. बनावट अकाऊंट तयार करणे – (Identity Theft)**

हा सुद्धा एक सायबर गुन्हा आहे. सायबर गुन्हेगारीच्या या प्रकारांमध्ये आपली स्वतःची ओळख

लपविली जाते आणि बनावट ओळख तयार करून फसवणूक केली जाते. विशेषतः सोशल मीडियावर बनावट अकाऊंट तयार करून समोरील व्यक्तीची दिशाभूल करणे, छळ करणे, दबाव आणणे इत्यादी गोष्टी केल्या जातात. काहीवेळा एखाद्या व्यक्तीचे बनावट अकाऊंट तयार केले जाते आणि बेकायदेशीररित्या चुकीच्या माहितीचा प्रसार केला जातो. त्यामुळे ती व्यक्ती, समूह, समाजामध्ये तेढ निर्माण होऊ शकते.

**८. रॅन्समवेअर- (Ransomware)**

रॅन्समवेअर हा संगणक मालवेअरचा एक प्रकार आहे की, जो संगणक, लॅपटॉप, इत्यादीमध्ये विनापरवाना प्रवेश करतो आणि साठविलेली अत्यंत महत्त्वपूर्ण अशी माहिती, फाइल्स, स्टोरेज, मीडिया, डेटा इत्यादी हॅक करतो, लपवितो. हा सर्व डेटा पुन्हा मिळविण्यासाठी गुन्हेगारांकडून वापरकर्त्यास मागणी केलेली खंडणी भरण्यास सांगितले जाते.

**९. माहितीची चोरी करणे - (Data Thieft)**

एखादा संगणक किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक साधनांमधील माहितीची वापरकर्त्याला न माहिती होता गोपनीयपद्धतीने चोरी करणे. पेन ड्राईव्ह किंवा अन्य साधनाचा वापर करून संगणकाच्या सिस्टम मधील माहिती चोरी करणे इत्यादींचा समावेश यामध्ये होतो.

**१०. व्हायरस अटॅक - (Virus Attack)**

संगणक, मोबाईल किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांच्या सिस्टम मध्ये इंटरनेट, ई-मेल किंवा अन्य माध्यमा मधून वायरस पाठविला जातो आणि त्या सिस्टमवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. काहीवेळा त्या सिस्टम मध्ये बिघाड निर्माण केला जातो. सिस्टम वरील माहितीला (डेटा) नुकसान पोहोचविले जाते.

व्हायरस हा एक प्रोग्रॅम आहे, जो संगणकाच्या सिस्टमला नुकसान पोहोचविण्यासाठी तयार केलेला असतो. ट्रॉजन हासुद्धा एक विध्वंसक प्रोग्रॅम आहे. हा प्रोग्रॅम संगणकाच्या सिस्टममध्ये प्रवेश करतो आणि संगणकावरील बॅकडोअर एन्ट्रीज उघडल्या जातात. यामुळे संगणकाच्या सिस्टममध्ये इतर वापरकर्ता, प्रोग्रॅमला प्रवेश मिळतो आणि वैयक्तिक, गोपनीय माहितीची चोरी होऊ शकते. तसेच आपल्या संगणकाच्या सिस्टमवर सायबर गुन्हेगार नियंत्रण मिळवू शकतो.

**सायबर गुन्ह्याची कारणे (Causes of Cyber Crime)**

सद्यस्थितीमध्ये प्रत्येक क्षेत्रामध्ये डिजिटलायझेशनचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्याचप्रमाणे उपलब्ध असणाऱ्या तंत्रज्ञानाचा वापर करून व्यक्ती विकास व समाज विकास साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतू सायबर गुन्हे समाजाच्या विकासात एक अडथळा बनत आहेत. तंत्रज्ञानाचा गैरवापर करून सायबर गुन्हा केला जातो. सायबर गुन्हा ही एक महत्त्वपूर्ण सामाजिक समस्या बनत चालली आहे. सायबर गुन्ह्यांमुळे ऑनलाइन सुरक्षिततेला बाधा पोहोचते. म्हणून सायबर गुन्हे घडण्यामागील कारणांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

सायबर गुन्ह्याची कारणे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१. गुन्हेगाराला ओळख लपविता येणे शक्य आहे-**

सायबर गुन्ह्यामध्ये गुन्हा करणाऱ्याला जगाच्या कोणत्याही ठिकाणावरून इंटरनेट संगणकाच्या माध्यमातून

सायबर गुन्हा करता येतो. तसेच यावेळी गुन्हेगाराला गुन्हा घडण्याच्या ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहावे लागत नाही. तसेच स्वतःची ओळख लपवून बनावट अकाऊंट किंवा प्रोफाईल वरून गुन्हा केला जाऊ शकतो. अशा वेळी गुन्हेगारांना पकडणे कठीण बनते. उदाहरणार्थ–सोशल मीडियावर बनावट अकाउंट तयार करणे आणि त्याचा बेकायदेशीर वापर करणे इत्यादी.

**२. असुरक्षित संगणक सिस्टम –**

संगणक, मोबाईल किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करणाऱ्या व्यक्तीकडून अशा साधनाची योग्य ती काळजी न घेतल्यास त्या संबंधित असणारी सुरक्षितता धोक्यात येते. त्याचप्रमाणे अशा असुरक्षित सिस्टम वरती सायबर गुन्हेगारांकडून नियंत्रण मिळविणे किंवा सिस्टम मध्ये प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. त्यामुळे वापरकर्त्याचा आपल्या इलेक्ट्रॉनिक साधनांबाबतचा निष्काळजीपणा सायबर गुन्हेगारांसाठी संधी निर्माण करतो. उदा. आपल्या संगणकाची सिस्टम अपडेट न ठेवणे धोक्याचे ठरू शकते. तसेच आपल्या सिस्टमचा पासवर्ड गोपनीय न ठेवणे, सोपे सांकेतिक पासवर्ड वापरणे असुरक्षित ठरू शकते.

**३. अपुरी माहिती, प्रशिक्षण नसणे –**

वापरकर्त्याला संगणक, मोबाईल, सिस्टम आणि विविध ॲप्लिकेशन इत्यादी वापरासंबंधी असणारी माहिती अपुरी असणे. तसेच अशा प्रकारच्या सिस्टम आणि विविध ॲप्लिकेशन कसे हाताळावेत याबाबत प्रशिक्षण न घेता वापरकर्ता त्याचा वापर करतो. अशा वेळी काही चुका होऊ शकतात. उदा.– ऑनलाइन व्यवहारासाठी एखाद्या बँकेचे ऑनलाइन एप्लीकेशन वापरकर्ता डाउनलोड करतो. परंतु युजर आयडी आणि पासवर्ड हा गोपनीय ठेवावा लागतो. याबाबतीत वापरकर्ता जागरूक नसेल, तर सायबर गुन्हेगार त्याचा गैरवापर करू शकतात. अनेक वेळा वापरकर्ता आपल्या सिस्टीमवर एखादे ॲप्लिकेशन डाउनलोड करतो. अशावेळी ॲप्लिकेशनचा निर्माता सदर ॲप्लिकेशन वापराचे काही नियम आणि अटी, शर्ती (Terms and Conditions) सादर करतो. परंतू वापरकर्ता या सर्वांचे वाचन न करता किंवा समजून न घेता त्यामधील आय ॲग्री (I AGREE) मी सहमत आहे हा पर्याय निवडतो. यावेळी वापरकर्त्यांच्या संगणकावरील, मोबाईल वरील डेटा, कॉन्टॅक्ट, स्टोरेज, इमेज, फाईल अशा सर्व प्रकारची माहिती धोक्यामध्ये येऊ शकते.

**४. पुरावा नष्ट करणे सुलभ –**

सायबर गुन्हेगार एखादा गुन्हा केल्यानंतर त्या गुन्ह्याशी संबंधित सर्व माहिती इलेक्ट्रॉनिक सिस्टम, संगणकावरून नष्ट किंवा डिलीट करण्याचा प्रयत्न करतात. तसेच बनावट अकाउंट वापरून असा गुन्हा केला असेल, तर अशा गुन्हेगारांना पकडणे अवघड असते. सायबर गुन्ह्यावेळी सोशल मीडियामधील फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, इमेल वर बनावट अकाउंट तयार केली जाऊ शकतात आणि त्याचा वापर सायबर गुन्ह्यांसाठी केला जाऊ शकतो.

**५. द्वेषभावना –**

सायबर गुन्हा करण्या पाठीमागे द्वेषभावना हे सुद्धा कारण असू शकते. एखादी व्यक्ती, समूह किंवा संस्थेबाबत द्वेषभावना बाळगून चुकीची माहिती, अफवा पसरवून बदनामी करण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच यातून समाजात दुफळी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.

थोडक्यात वरीलप्रमाणे सायबर गुन्ह्यांची कारणे स्पष्ट करता येतील. या कारणांचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी प्रत्येकाने जागरूक असणे आवश्यक आहे. तसेच

आपल्या इलेक्ट्रॉनिक साधनासंबंधीची पूर्ण माहिती घेऊन त्याचा वापर करणे आवश्यक आहे.

मानव आपल्या गरजांच्या पूर्तीसाठी तंत्रज्ञानावर जास्तीत - जास्त अवलंबून आहे. कारण सर्व ऑनलाईन सेवा सहज उपलब्ध होत आहेत. उदाहरणार्थ ऑनलाईन खरेदी, ऑनलाईन गेमिंग, ऑनलाईन लर्निंग, सोशल नेटवर्किंग, ऑनलाइन जॉब, ऑनलाइन बँकिंग, ऑनलाइन चॅटिंग, ऑनलाइन सर्फिंग. या सर्व गोष्टी एकाच ठिकाणी बसून सर्वांना उपलब्ध होत आहेत. जगासोबत भारतामध्येही सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. या गुन्ह्यांमध्ये माहितीची बेकायदेशीररित्या चोरी करणे, सिस्टीममध्ये व्हायरसचा शिरकाव करणे, बाल लैंगिक सामग्रीचा प्रसार करणे, ऑनलाईन चोरी करणे इत्यादींचा समावेश होतो.

**सायबर गुन्ह्यांवरील उपाय ( Remedies on Cyber Crime )**

माहिती तंत्रज्ञानाचा वापर आपल्या दैनंदिन जीवनातील गरजांच्या पूर्तीसाठी आणि अत्यावश्यक सोयी-सुविधांसाठी करणे सद्यस्थितीत अनिवार्य ठरत आहे. सायबर गुन्ह्याची संकल्पना, प्रकार, कारणे अभ्यासल्यानंतर सायबर गुन्ह्यांवरील उपाय अभ्यासणे आवश्यक ठरते. भारत सरकारने याबाबत काही कायदेशीर उपायांचा अवलंब केला आहे. त्यासोबतच प्रत्येक व्यक्तीने स्वतः सायबर गुन्ह्यांला बळी पडू नये, यासंदर्भात दक्षता घेणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबतचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे :

सायबर गुन्ह्यांबाबतच्या उपायांमध्ये कायदेशीर उपाय, प्रतिबंधात्मक उपाय आणि उपचारात्मक उपाय अशा प्रामुख्याने तीन प्रकारे करता येतील.

कायदेशीर उपायांमध्ये भारत सरकारने वेळोवेळी सायबर गुन्हेगारी नियंत्रणात आणण्यासाठी केलेले कायदे व त्यामधील तरतुदी इत्यादींचा समावेश होतो.

प्रतिबंधात्मक उपायांमध्ये सायबर गुन्हा घडण्यापूर्वी, सायबर गुन्हे घडू नये, सायबर गुन्ह्याला आपण बळी पडू नये यासाठी घेण्यात आलेल्या काळजीचा, उपायांचा समावेश होतो.

उपचारात्मक उपायांमध्ये, सायबर गुन्हा घडल्यानंतर त्या गुन्ह्यात बळी पडलेल्या व्यक्तीने आपल्यावर झालेला अन्याय दूर करण्यासाठी, आपले नुकसान भरून काढण्यासाठी त्वरित करावयाच्या उपायांचा समावेश होतो.

**अ) कायदेशीर उपाय**

कायदेशीर उपायांमध्ये भारत सरकारने वेळोवेळी सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी विविध कायदे केलेले आहे. तसेच त्यामध्ये वेळोवेळी दुरुस्त्याही सुचविण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार पुढील कायद्यांचा आपणास अभ्यास करता येईल.

**माहिती तंत्रज्ञान कायदा २००० (Information Technology Act, 2000)**

माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे तसेच माहिती तंत्रज्ञानावरील अवलंबामुळे सायबर गुन्ह्यांमध्येही वाढ झाली. यामध्ये माहितीची चोरी, फसवणूक इत्यादी गुन्ह्यांचा समावेश होतो. माहिती तंत्रज्ञान संदर्भातील गुन्ह्यांसाठी स्वतंत्र कायदा निर्माण करण्याची आवश्यकता भासू लागली. म्हणून भारत सरकारने १७ ऑक्टोबर २००० पासून माहिती तंत्रज्ञान कायदा २००० लागू केला. या कायद्यामध्ये संगणक आणि इंटरनेटच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या सायबर गुन्ह्यांना शिक्षा देण्याची तरतूद करण्यात आली.

या कायद्यानुसार सायबर गुन्ह्यांच्या प्रकारानुसार शिक्षेची तरतूद पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

कलम ४३ नुसार, अन्य वापरकर्त्याच्या संगणकामध्ये अनधिकृतपणे प्रवेश करणे, यासाठी मनाई केली आहे.

कलम ६५ नुसार, संगणकातील डेटामध्ये अदला-बदल केल्यास, तीन वर्ष कारावास आणि दोन लाख रुपयांचा दंड अशा शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

कलम ६६ नुसार, संगणकावरील डेटा हॅक करण्याचा प्रयत्न केल्यास, तीन वर्षे कारावास आणि दोन लाख रुपये दंडाची तरतूद करण्यात आली आहे. तसेच संगणक किंवा इलेक्ट्रॉनिक डिवाइस मधून चोरी केलेल्या माहितीचा गैरवापर करणे, एखाद्याची संगणक वरील ओळख, पासवर्ड इत्यादींची चोरी करणे, त्याचप्रमाणे सायबर दहशतवाद्यांसाठी सुद्धा या कलमामध्ये शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे.

कलम ६७ नुसार, बालअश्लीलता ब्राउझ करणे, डाउनलोड करणे, तयार करणे, प्रकाशन करणे आणि वितरण करणे हा गुन्हा मानला आहे. यासाठी कारावास व पाच लाख रुपये दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.

कलम ७१ नुसार, संगणक, इंटरनेटचा वापर करून चुकीची माहिती प्रसारित केल्यास दोन वर्षे कारावास व एक लाख रुपये दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.

कलम ७२ नुसार, संगणकातील गोपनीय व वैयक्तिक माहितीला नुकसान केल्यास, दोन वर्षे कारावास व एक लाख रुपये दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.

कलम ७३ नुसार, एखाद्या अधिकाऱ्याची सहीची नक्कल केल्यास, दोन वर्षे कारावास आणि एक लाख रुपये दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.

**सुधारित माहिती तंत्रज्ञान कायदा-२००८ (Revised Information Technology Act, 2008)**

माहिती तंत्रज्ञान कायदा २००० मधील असलेल्या काही त्रुटी आणि उणिवा दूर करून सुधारित माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ लागू करण्यात आला.

या कायद्यानुसार, महिलांच्या संदर्भातील अश्लील चित्रफिती, दृश्ये प्रदर्शित करणे, त्यांचा प्रसार करणे, सोशल मीडियाच्या माध्यमातून त्रासदायक संदेश पाठविणे, महिलांचा अपमान करणे यासाठी तीन वर्षाच्या कारावासाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे.

**राष्ट्रीय सायबर सुरक्षा नीती - २०१३ (National Cyber Security Policy 2013)**

भारताने २ जुलै २०१३ मध्ये राष्ट्रीय सायबर सुरक्षा नीती लागू केली. या राष्ट्रीय सायबर सुरक्षा नीतीचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे सायबर हल्ल्यापासून बचाव करणे आणि सायबर सुरक्षा मजबूत करणे हा होय. या राष्ट्रीय सायबर सुरक्षा नीतीमुळे देशभरातील सायबर सुरक्षिततेचे संवर्धन केले जाईल.

थोडक्यात, सायबर गुन्हेगारी संदर्भातील भारतामधील कायदेशीर उपायांचा अभ्यास आपणास वरीलप्रमाणे करता येईल. सायबर गुन्ह्यांच्या प्रकारानुसार या कायद्यांमध्ये वेळोवेळी बदल झालेले आपणास दिसून येतात.

**ब) प्रतिबंधात्मक उपाय -**

सायबर गुन्हा घडण्यापूर्वी, सायबर हल्ला होऊ नये किंवा सायबर हल्ल्याला बळी पडल्यानंतर वापरकर्त्याने

घ्यावयाच्या काळजीचा यामध्ये समावेश होतो. यामध्ये वैयक्तिक तसेच सामाजिक जबाबदारीची जाणीव प्रत्येकाने ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

**आपला संगणक, मोबाईल, इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करत असताना घ्यावयाची दक्षता :**

१. आपण वापरत असलेला संगणक, मोबाईल, इलेक्ट्रॉनिक साधन इत्यादींचा वापर कसा करावा याचे प्रशिक्षण किंवा पूर्ण माहिती आपल्याला असणे अत्यंत आवश्यक आहे.

२. आपला संगणक, मोबाईल व इलेक्ट्रॉनिक साधनांना मजबूत (strong) पासवर्ड असावा.

३. नवीन सॉफ्टवेअर किंवा ॲप्लिकेशन डाऊनलोड, इन्स्टॉल करण्यापूर्वी त्या संबंधित सर्व नियम आणि अटी समजावून घेऊन सदर सॉफ्टवेअर किंवा ॲप्लिकेशन वापरावे. त्यामुळे आपल्याला सदर सॉफ्टवेअर वापराबाबतच्या मर्यादा कळतात.

४. आपल्या ऑपरेटिंग सिस्टम नेहमी अद्ययावत (अपडेटेड) ठेवाव्यात.

५. व्हायरसपासून बचावासाठी अँटीव्हायरस सॉफ्टवेअर इन्स्टॉल करावे. तसेच वेळोवेळी अँटी-व्हायरस सॉफ्टवेअर अद्ययावत (अपडेट) करावे.

**सोशल मीडियाचा वापर करत असताना घ्यावयाची दक्षता :**

सोशल मीडियामध्ये फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर, व्हाट्सअप, टेलिग्राम, युट्युब इत्यादींचा समावेश होतो. या सर्वांचा वापर करत असताना पुढीलप्रमाणे दक्षता घेणे आवश्यक आहे.

१. आपल्या अकाउंट वरती कोणत्याही प्रकारची गोपनीय माहिती अपलोड करू नये.

२. आपल्या अकाउंटचा युजर आयडी आणि पासवर्ड गोपनीय ठेवावा.

३. कोणत्याही प्रकारचा आक्षेपार्ह संदेश किंवा पोस्ट सोशल मीडियावरती अपलोड, डाउनलोड किंवा फॉरवर्ड करू नये.

४. आपल्या सोशल मीडिया अकाउंटचा पासवर्ड ठराविक कालावधीनंतर बदलावा.

**ऑनलाइन बँकिंग करत असताना घ्यावयाची दक्षता :**

१. ऑनलाइन बँकिंग करण्यापूर्वी किंवा कोणताही ऑनलाईन व्यवहार करण्यापूर्वी संबंधित बँकेकडून ऑनलाइन व्यवहाराबाबत दिलेली तांत्रिक माहिती समजून घ्यावी. बँकेने पुरविलेले बुकलेट किंवा दिलेल्या सूचना तंतोतंत पाळाव्यात.

२. सार्वजनिक संगणकावर इंटरनेट बँकिंगचा वापर टाळावा. कोणत्याही ऑनलाइन आकर्षक आणि फसव्या जाहिरातींना बळी पडू नये.

३. इंटरनेट बँकिंग लॉगिन आयडी आणि पासवर्ड कोणासही शेअर करू नये. एखाद्या संगणकावरील आपला ऑनलाइन व्यवहार सुरू असताना पासवर्ड सेव्ह करू नये. रिमेंबर पासवर्ड हा पर्याय निष्क्रिय करावा. इंटरनेट बँकिंगचा व्यवहार पूर्ण झाल्यानंतर आपले अकाउंट लॉग आउट करावे. सर्वात शेवटी आपण वापरलेली ब्राउझिंग हिस्टरी आणि टेम्पररी फाइल्स डिलीट कराव्यात.

४. इंटरनेट बँकिंग करीत असताना आपल्याला आलेला ओटीपी कोणासोबतही शेअर करू नये.

५. आपल्याकडून अनधिकृत फोन कॉल द्वारे किंवा ईमेल द्वारे ओटीपी ची मागणी होत असेल तर ओटीपी न देता लगेच संबंधितांविरुद्ध पोलिसांमध्ये तक्रार करावी.

**एटीएम कार्ड क्रेडिट कार्ड डेबिट कार्ड वापराबाबतची दक्षता :**

१. कार्ड मिळाल्यानंतर बँकेने पुरविलेला पासवर्ड शक्य तितक्या लवकर बदलून घ्यावा आणि गोपनीय ठेवावा.

२. आपल्या कार्डचा अनुक्रमांक, कार्ड समाप्तीची तारीख, पिन नंबर, CVV नंबर कोणासोबतही शेअर करू नका.

३. कार्डचा पिन नंबर म्हणून आपला मोबाईल क्रमांक, जन्मतारखेचे वर्ष, गाडीचा क्रमांक किंवा सहज ओळखता येईल असा सोपा क्रमांक ठेवू नये.

४. कोणतीही बँक आपल्या कोणत्याही ग्राहकाला कार्ड बाबतची माहिती किंवा कार्डचा पिन किंवा ओटीपी बाबतची माहितीची विचारत नाही. म्हणून अशा खोट्या फोन कॉल पासून सावध रहा.

५. कार्ड वापरण्यापूर्वी बँकेकडून कार्डवरील दैनंदिन व्यवहाराची मर्यादा निश्चित करून घ्या.

**पालकांनी घ्यावयाच्या दक्षता :**

१. ऑनलाइन जगता संदर्भात, सोशल मीडियाच्या जबाबदार वापरासंदर्भात आपल्या मुलांशी चर्चा करा, त्यांना शिक्षित करा, त्यांना मदत करा. इंटरनेट आणि ऑनलाइन गेम वापरत असताना गोपनीयता, मार्गदर्शक तत्वे सेट करा.

२. वापरत नसताना आपला वेब कॅमेरा झाकून (कव्हर) करून ठेवा.

३. आपल्या संगणकाची सिस्टम आणि अँटीव्हायरस अद्ययावत ठेवा.

**तरुणांनी घ्यावयाच्या दक्षता :**

१. आपल्या सोशल मीडिया अकाउंट वरील सेटिंग योग्य पद्धतीने निवडा. कारण आपण पोस्ट केलेली छायाचित्रे, संदेश आपल्या माहितीशिवाय वापरली जाऊ शकतात.

२. सोशल मीडिया वरती अनोळखी व्यक्तींची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नका.

३. सेटिंग मधून एखाद्या व्यक्तीला मित्रांच्या सूचीतून कसे काढावे (अनफ्रेंड), कसे ब्लॉक करावे, वापरानंतर सोशल मीडिया वेबसाइटवरून लॉग आउट कसे करावे या सर्व बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

४. आपले बनावट खाते तयार झाल्याचे आपल्या लक्षात आल्यास, ताबडतोब सोशल मीडिया सेवा प्रदात्यास माहिती देऊ शकता जेणेकरून खाते अवरोधित केले जाऊ शकते.

५. बनावट सोशल मीडिया अकाउंट्सपासून सावध रहा. सर्व खाती खरी नाहीत आणि खात्यांवरील सर्व माहिती सत्य नाही

६. आपले मोबाइल डिव्हाइस, पीसी सर्व्हिसिंग/ रिपेयरिंग/ विक्रीसाठी देताना काळजी घ्या. वैयक्तिक प्रवासी आणि मोबाइल डिव्हाइसमध्ये खाजगी माहिती असते. ती दुरुस्ती, सर्व्हिसिंग किंवा विक्रीसाठी

पाठविण्यापूर्वी खोडली जाणे आवश्यक असते.

**क) उपचारात्मक उपाययोजना –**

१. इंटरनेटवरती आपला अनधिकृत फोटो, आपल्या बाबतची अनधिकृत माहिती आढळून आल्यास याबाबत त्वरित कायदेशीर कार्यवाही करावी.

२. ऑनलाइन बँकिंग केल्यानंतर आपली फसवणूक झाली आहे, असे लक्षात आले तर त्वरित संबंधित बँकेशी संपर्क साधावा. तसेच कायदेशीर कार्यवाही करावी.

३. एटीएम, क्रेडिट, डेबिट कार्ड संदर्भात फसवणूक झाल्यास त्वरित बँकेशी संपर्क साधून आपले कार्ड ब्लॉक करावे.

४. बँकेचे संबंधित कोणतीही ऑनलाईन फसवणूक झाल्यास, एटीएम डेबिट, क्रेडिट कार्ड गेल्यास प्रत्येक बँकेने दिलेल्या हेल्पलाइन नंबर वरती संपर्क साधावा.

५. सोशल मीडिया अकाउंट वरती आक्षेपार्ह पोस्ट किंवा अनधिकृत संदेश आढळल्यास अशी पोस्ट, माहिती किंवा संदेश डिलीट करण्यासाठीचे पर्याय प्रत्येक सोशल मीडिया वेबसाईट वरती दिलेले असतात. या पर्यायांची माहिती करून घेणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ–फेसबुक, व्हाट्स–अॅप, इंस्टाग्राम अशा प्रकारच्या सोशल मीडिया वरती अपलोड केलेला मेसेज, पोस्ट, छायाचित्र डिलिट करण्याचा पर्याय उपलब्ध असतो. तसेच आपण पाठविलेला संदेश कोण पाहू शकते याबाबतचेही विविध पर्याय सोशल मीडिया वेबसाईटवरती उपलब्ध असतात.

**राष्ट्रीय सायबर गुन्हा तक्रार पोर्टल (National Cyber Crime Reporting Portal)**

सायबर गुन्ह्यांच्या तक्रारी ऑनलाईन नोंदविण्यासाठी भारत सरकारने नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल (https://cybercrime.gov.in) तयार केलेले आहे. या पोर्टलवरती सायबर गुन्ह्याबाबत ऑनलाइन तक्रार नोंदविता येते. प्रामुख्याने महिलांच्या संदर्भातील सायबर गुन्हे, बाललैंगिक अत्याचार संदर्भातील साधनसामग्रीच्या ऑनलाइन प्रसारा संदर्भातील गुन्हे, सोशल मीडिया संदर्भातील गुन्हे, ऑनलाइन आर्थिक गुन्हे, ऑनलाइन सायबर तस्करी, ऑनलाइन आर्थिक फसवणूक, रॅन्समवेअर, हॅकिंग, क्रिप्टोकरन्सी गुन्हे इत्यादी.

तसेच या पोर्टल वरती प्रत्येक राज्याचे सायबर गुन्हे संदर्भातील राज्यानुसार नियुक्त असलेले नोडल सायबर सेल अधिकारी आणि तक्रार निवारण अधिकारी यांची माहिती दिलेली आहे. भारतात इंटरनेट बँकिंग फसवणुकी संदर्भातील १७८५ तक्रारी /गुन्हे २०१७ मध्ये नोंदविले गेले.यामध्ये एकूण ७१.४८ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे आढळून आले आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न – २**

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. सायबर गुन्हा म्हणजे काय?

२. सायबर गुन्ह्यांचे कोणतेही दोन प्रकार सांगा.

३. हॅकिंग म्हणजे काय?

४. व्हायरस म्हणजे काय?

५. भारतामध्ये सुधारित माहिती तंत्रज्ञान कायदा कोणत्या साली अस्तित्वात आला ?

### ४.४ सारांश

थोडक्यात, सायबर गुन्ह्यावरील विविध उपाय स्पष्ट केल्यानंतर आपणास असे दिसून येते, की सायबर गुन्ह्यांबाबत कायद्यामध्ये विविध तरतुदी आहेत. दिवसेंदिवस या सायबर गुन्ह्यांचे नवनवीन प्रकार समोर येत आहेत. तसेच सायबर गुन्ह्यांच्या प्रमाणामध्येही सातत्याने वाढ होत आहे. या सायबर हल्ल्याला बळी पडू नये यासाठी व्यक्तिगत आणि सामाजिक जबाबदारी ओळखून सायबर गुन्ह्यांबाबत जागरूक असणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या प्रत्येकाने जागरूकतेने तंत्रज्ञानाचा वापर केला तर यापासून कोणताही धोका नाही.

इंटरनेटचा वापर सुरक्षितता आणि दक्षता बाळगून करणे आवश्यक आहे. आज जगातील प्रत्येक क्षेत्र इंटरनेटने प्रभावित झालेले दिसून येते. सरकारी कार्यालय, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, बँकिंग क्षेत्र, व्यवसाय व रोजगार, व्यापार, दळणवळण, विविध खाजगी संस्था इत्यादींमध्ये इंटरनेटचा वापर अनिवार्य झाला आहे. तसेच मोबाईल, टॅबलेट इत्यादींच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीच्या हातामध्ये संपूर्ण जगाशी संपर्क साधता येईल असे साधन पोहोचले आहे. या वैयक्तिक वापराच्या मोबाईल, टॅबलेट, संगणक किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक माध्यमा संदर्भातील सर्व सेटिंग आणि त्या इलेक्ट्रॉनिक साधनावर असणारी सर्व एप्लीकेशन याबाबत आपण जागरूक असणे आवश्यक आहे. थोडक्यात, भारतीय समाजातील सामाजिक-वैधानिक समस्यांमध्ये सायबर गुन्हेगारी ही एक महत्त्वाची समस्या दिसून येते.

**स्वयं-अध्ययन प्रश्न – २**

१. ज्या प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये प्रत्यक्ष उपस्थित न राहता गुन्हेगारांकडून संगणक, मोबाईल, इंटरनेट इत्यादींचा माध्यम म्हणून वापर केला जातो आणि गुन्हा केला जातो, त्याला सायबर गुन्हा असे म्हणतात.

२. हॅकिंग (Hacking), व्हायरस अटॅक **(Virus Attack)** .

३. संगणक किंवा इतर इलेक्ट्रॉनिक सिस्टम मध्ये बेकायदेशीररित्या केलेला प्रवेश म्हणजे हॅकिंग होय.

४. व्हायरस हा एक प्रोग्रॅम आहे, जो संगणकाच्या सिस्टमला नुकसान पोहोचविण्यासाठी तयार केलेला असतो.

५. भारतामध्ये सुधारित माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ साली अस्तित्वात आला.

### ४.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. सायबर गुन्हेगारीचा अर्थ आणि सायबर गुन्हेगारीची कारणे स्पष्ट करा.

२. सायबर गुन्हेगारी वरील उपाययोजना स्पष्ट करा.

**४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ :**


१. आगलावे प्रदीप, भारतीय समाज संरचनात्मक प्रश्न आणि सामाजिक समस्या, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, २०२४

२. जी. एल. शर्मा, 'सामाजिक मुद्दे', रावत पब्लिकेशन जयपुर, २०१७

३. खडसे भा.कि. 'भारतातील सामाजिक समस्या', मंगेश प्रकाशन, नागपूर २००९

४. राम आहुजा, 'सामाजिक समस्या, रावत पब्लिकेशन जयपुर,२०००

५. Ram Ahuja, Social problems in India, Rawat publication, Jaipur 2021

६. साळीवकर संजय, सामाजिक समस्या आणि समाज सुधार चळवळ, श्री मंगेश प्रकाशन नागपूर, २०१६


❑❑❑